# हाकारा

वर्ष पंधरावे ❑ अंक दुसरा

एप्रिल - जून १९९४



# महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

**स्फूर्तिस्थान / प्रेरणा :** *कै. प्रा. गं. बा. सरदार*

– : कार्यकारी मंडळ : –

**अध्यक्ष** : डॉ. पी. व्ही. सुखात्मे (पद्मभूषण)

**उपाध्यक्ष** : प्रा. व्ही. जी. पेंढारकर

**मुख्य सचिव** : प्रा. रा. के. मुटाटकर

**सहसचिव** : डॉ. पराग माणकीकर

**खजिनदार** : डॉ. व्ही. एस. कुलकर्णी

**सभासद** : डॉ. एन. एस. देवधर

: डॉ. बी. व्ही. भानू

: डॉ. मिलिंद बोकील

: डॉ. एस. जी. देवगांवकर

: ॲड. पद्माकर वळवी

कष्टकरी जनता, भूषण,भारता, वंदन करितो पददलिता !

**महाराष्ट्र मानव विज्ञान परिषदेचे त्रैमासिक**

# हाकारा

## — अनुक्रमणिका —


संपादकीय

१) आदिवासींची चळवळ : अस्मिता अन् समस्या
: वाहरु सोनवणे — १

२) ओळख आदिवासींची - भाग १, २, ३, ४, ५ — १०

३) आदिवासी आत्मसन्मानाची चळवळ - आढावा व आक्षेप
: बळवंत वळवी — २३

४) आदिवासी आत्मसन्मानाची चळवळ व मानव मुक्ती लढा
: ॲड. माधव मोरे — २६

५) आदिवासी एकता परिषद : शोध आणि बोध
: पुष्पा गावीत — ३०

६) निसर्गपुत्रांची स्वयत्त राज्याकडे ओढ
: श्रावण मोडक — ३२

७) आदिवासींची चळवळ : समाजपरिवर्तन चळवळ
: वाहरु सोनवणे — ३६

८) आदिवासी एकता परिषदेची स्थापना कशासाठी?
: कालिदास कोकणी — ३९



वर्ष पंधरावे : अंक - दुसरा
एप्रिल - जून १९९४

**संपादक**
रामचंद्र मुटाटकर

**कार्यकारी संपादक**
ग. शां. पंडित

**मुखपृष्ठ कला**
पुरुषोत्तम आगाशे

मूल्य रु. १५/-

**पत्रव्यवहाराचा पत्ता**
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.
फोन : ३३७२१९

**प्रकाशक**
रा. के. मुटाटकर
सचिव, महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद यांच्यासाठी
**मे. ओमेगा ऑफसेट**
२ व ३, एमरॉल्ड कार्नर
टिळकवाडी,
बेळगांव - ५९०००६.
फोन : ४२४१२४
येथे छापून पुणे येथे प्रसिध्द केले



अंकात व्यक्त झालेल्या लेखकांच्या विचारांशी किंवा मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# संपादकीय...

'हाकारा' त्रैमासिक केवळ आदिवासी विषयक प्रश्नांना वाहिलेले असल्याने आदिवासी एकता परिषदेच्या निमित्ताने त्याबाबत काही लेख व विचार मांडण्याची संधी मिळाल्याबाबत आम्ही खूष आहोत.

आमच्या मते आदिवासी-बिगर आदिवासी कार्यकर्ते ही गंभीर बाब नसून जगाच्या पाठीवर भांडवलशाहीचा 'विजय' किंवा प्रादुर्भाव व भारताची त्या दृष्टीने वाटचाल ही चिंतेची बाब आहे. सर्वच गरीब, आदिवासी अथवा बिगरआदिवासी त्यात होरपळत आहेत. गरीब माणूस हा मनाने व शरीराने गुलाम होत आहे. परंतु आदिवासी समुदाय त्या गुलामगिरीच्या छायेत वावरत आहेत.

मानवशास्त्रात, प्रत्येक मानवी समुदायाची स्वतंत्र संस्कृती, भाषा व अस्मिता असते हे प्रतिपादिले आहे. आदिवासींचीही स्वतंत्र संस्कृती, धर्म, भाषा, अस्मिता असते हे ओघाने आलेच. ऐतिहासिकदृष्ट्या बघितले तर राष्ट्रांची व राज्यसंस्थांची उभारणी ही जादा उत्पादन, बाजारपेठ व त्यावर शस्त्रांच्या आधारे वचक ठेवणाऱ्या झुंडशाहीतून निर्माण झाली आहे. जेव्हा समुदायाची अस्मिता गमावली जाते तेव्हा त्याचा कणा मोडतो, मान आडवी पडते व समुदायाचे विश्व निराशेने ग्रासते. त्याचे पुनरूत्थान करण्यासाठी आपल्या संस्कृतीबद्दल आत्मविश्वास निर्माण करणे अगत्याचे ठरते. ब्रिटीशांच्या संपर्कातून भारताला ग्रासलेला निराशावाद दूर करण्याचे कार्य टिळक, विद्यासागर, रॉय इत्यादी अनेक सामाजिक व राजकीय पुढाऱ्यांनी केले. त्यानिमित्ताने समाजातील कीड निपटून काढण्याचे कार्य फुले, आंबेडकर या पुढाऱ्यांनी केले. त्यांच्या प्रेरणा आजही वाटचाल करीत आहेत. स्त्रीला स्वातंत्र्य व सन्मानाची वागणूक मिळवून देण्याचे कार्यही चालूच आहे.

आदिवासींचा वेगळा विचार करण्याचे कारण, त्यांची संस्कृती भिन्न आहे. कोणत्या परिस्थितीत स्वतंत्र राज्य किंवा सार्वभौम राष्ट्राची मागणी पुढे येते हे अध्ययनाचे विषय आहेत. आदिवासी समूह वेगवेगळ्या भाषावार प्रांतात विभागले गेले. तरी 'मुख्य प्रवाहात' राहणाऱ्या अस्पृश्य-दलित लोकांची जेवढी सामाजिक पिळवणूक झाली, तेवढी वेगळ्या पडलेल्या आदिवासींची झाली नाही. हिंदू कुटुंबसंस्थेतील थोरल्या भावाची किंवा बिग ब्रदरची भूमिका घेऊन मुख्य प्रवाहात येण्ययाचे आवाहन करताना व आधुनिक प्रशासन, राष्ट्राचा निसर्गसंपत्तीवरील मालकीहक्क प्रस्थापित करण्याच्या प्रक्रियेत आदिवासी निसर्गातून मिळणाऱ्या अन्नास मुकले. त्याच प्रक्रियेत धर्म, भाषा इ. संस्कृतीस जपणाऱ्या मूल्यांवर आक्रमण होत आहे. पण निवडणूक प्रक्रिया बघितली तर काही आदिवासी पुढाऱ्यांचा जातीयवादी पक्षांना पाठिंबा आहे असे दिसते. त्याचे कारण शोधले पाहिजे. संस्कृतीचे संवर्धन करण्यासाठी स्वत: निवडणूकीच्या रिंगणातून बाहेर राहून आपली आत्मिक शक्ती दाखवून पुढारीपण मिळविल्याशिवाय साध्य होणार नाही. विधानसभेत सोडवणूक होणारे हे प्रश्न नाहीत.

फार मोठ्या प्रमाणावर बिगर-आदिवासी जातीसमूह स्वत:ला अनुसूचित जमातीत अंतर्भाव करून आदिवासींचे पुढारीपण मिळवू इच्छितात, ही बाब आदिवासी-बिगरआदिवासी कार्यकर्त्यांच्या प्रश्नापेक्षा मोठी व गंभीर आहे. कोणते राजकीय पक्ष व त्यांचे आदिवासी पुढारी, मंत्री त्यातून सुटलेले आहेत?

अस्मितेच्या चळवळी स्वत:ला चालवाव्या लागतात. ब्रिटीशांविरुद्धच्या स्वातंत्र्यलढ्यात सुरुवातीस वैचारिक मार्गदर्शन करण्यास काही ब्रिटीश नागरीकांची साथ होती. पण पुढे भारतीय पुढाऱ्यांनी ती चळवळ स्वबळावर यशस्वी केली. आदिवासीत तसे एकमुखी नेतृत्व निर्माण होण्याची ऐतिहासिक गरज आहे. त्या निमित्ताने सर्व आदिवासी एक असतात, वेगवेगळे समुदाय असले तरी त्यांची संस्कृती एकजिनसी असते हे पटविण्याची गरज आहे.

आदिवासी एकता परिषदेला सामाजिक एकता निर्माण करण्याचेही कार्य करावे लागेल. त्याकरिता जे अध्ययन, संशोधन व प्रकाशन करावे लागेल त्यास आमची साथ राहील. मूळ प्रश्नांना बगल देऊन जर कार्यकर्ते आपसात भांडावयास लागले तर चळवळींचे बळ कमी होईल व विभाजन करून वर्चस्व ठेवणाऱ्यांचे हितसंबंध बळकट होतील. तसे होऊ नये ही सदिच्छा.

**- रा. के. मुटाटकर**

महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन तसेच परिषद व हाकाराचे संपादक सहमत असतीलच असे नाही.

# आदिवासींची चळवळ : अस्मिता अन् समस्या

वाहरू सोनवणे

*आदिवासी चळवळ आता आपले स्वतंत्र अस्तित्व ठेवून एक वादळ बनू पहाते आहे. आदिवासींची अस्मिता जागृत झाली असून त्याला स्वतंत्र आयाम देण्यासाठी आदिवासी एकता परिषदेची स्थापना करण्यात आली आहे. परिषदेची ध्येय-धोरणे आणि उद्दिष्टचे विषद करण्यासाठी जिल्ह्या-जिल्ह्यातून कार्यकर्त्यांना प्रशिक्षित करण्यात येत आहे. त्यानिमित्त आदिवासींचे प्रश्न व अस्मिता या संदर्भातील विचारमंथन...*

आदिवासींच्या प्रश्नांसाठी आणि आदिवासींच्या विकासासाठी आदिवासींनीच पुढे यावे, संघटित व्हावे, हक्कासाठी संघर्ष करावा, प्रश्न घडवावे, आदिवासी अस्मितेची चळबळ आदिवासींनीच पुढे न्यावी, असे म्हटले तर प्रत्येकांना याचा हादरा बसतो आणि अनेक शंका-कुशंकांचे बादळ त्यांच्या मनात धुम रहायला लागते, अनेक प्रश्नांची चिन्हे घेऊन काढतीला येतात आणि "हे काय करतील! वेगळे हे असे, यांच्यात कुबत नाही म्हणून वखतील, हिणवतील तर एक एकाचे उसणं काढून 'हा असा, तो तसा...' असे म्हणून काढतील.

खरं म्हणजे त्यांच्यापुढे सर्वात मोठा आणि सर्वात महत्त्वाचा प्रश्न असतो की, आदिवासी चळवळीत आमचे स्थान काय आणि आमचा रोल काय राहील? त्यांच्या मनातली हीच भीती त्यांना बेचैन करत असते आणि अनेक शंका-कुशंकांना फाटे फोडत असते.

तर काही बिचकत बिचकत म्हणतील, आदिवासी प्रश्नासाठी आदिवासीच उठत असतील तर चांगली गोष्ट आहे पण-पण ते उठले पाहिजे, टिकले पाहिजे, अशा तऱ्हेने शक्य पूर्ण होता होता शंका घेऊन टाकतात. आदिवासी स्वतःच्या बळावर चळवळ करतील त्यावर त्यांचा अजिबात विश्वास नाही आणि समजा काही आदिवासी कार्यकर्त्यांनी प्रयत्न केला तर ते चुकतील. कारण आदिवासींना आमच्या इतका अनुभव कुठं आहे? चळवळ चालविण्याची अक्कल नाही. ती बुद्धी आमच्यात आहे. आम्ही विचार करू शकतो, वैचारिक भूमिका घेऊन चळवळीला दिशा देऊ शकतो हा 'अहम' त्यांच्या मनात खोलवर रुजलेला असतो आणि यालाच जर कोणी आव्हान देत असेल, त्यांचे नेतृत्व नाकारून आदिवासी स्वतःच उठत आहेत आणि पुढे येण्याचा निर्धार करत आहेत, एकूण त्यांना हादरा बसणे साहजिक आहे. मनाला बसलेल्या हादऱ्याने दुखावलेले दुःख धरून बसत नाही तर त्यात आपले वर्चस्व आणि नेतृत्व कसे प्रस्थापित होईल याबाबत त्यांची धडपड सुरू होते. 'मी कसा आपला जीव धोक्यात टाकून आदिवासींचे काम केले' हे एकदा दोनदा नव्हे पटेनात किंवा 'हो' म्हणेपर्यंत सांगत राहतील आणि काही आदिवासी चळवळींची गंभीर दाद घेऊन याबाबत योग्य तो विचार करतील तेही तेवढेच खरं.

आजही आदिवासी समाजाच्या अनेक समस्या आहेत, या समस्या सोडविण्याकरिता आदिवासी

समाजात वेगवेगळ्या विभागात त्या संघटना, गट काम करीत आहेत आणि आदिवासी समाजाला न्याय मिळावा अशी धडपड करीत आहेत, असे नव्हे तर शासनही आदिवासींसाठी, त्यांचा विकास व्हावा, त्यांना न्याय मिळावा असा प्रयत्न करीत आहे,' असे असताना फक्त आदिवासींनीच आदिवासी प्रश्नांसाठी एकत्र यावे म्हणून 'आदिवासींचे स्वतंत्र व्यासपीठाची गरज का?' असा प्रश्न उपस्थित होतो.

या प्रश्नांची उत्तरं द्यायची असतील तर इतिहासात जावे लागेल. आदिवासी व बिगर आदिवासी तथाकथित सुसंस्कृत, सभ्य समाज यांचे इतिहासातील नाते काय? आदिवासींची वैशिष्ट्यपूर्ण जीवन पद्धती व संस्कृतीचे स्थान यांचे कसे चित्र उभे राहते याच्यावर विचार करावा लागेल आणि यातूनच स्वतंत्र अशा वेगळ्या व्यासपीठाची गरज काय? ते स्पष्ट होईल.

आज महाराष्ट्रभर आदिवासी पट्ट्यात काम करणारी प्रत्येक चळवळ आपापल्या विचाराने कुवतीने आपआपल्या पद्धतीने चळवळीचे काम करीत आहेत. आदिवासींवरील अन्याय-अत्याचार, पोटाचा प्रश्न याशिवाय शिक्षण, आरोग्य यासाठी सुद्धा लढले आहेत. एवढेच नव्हे जीव धोक्यात टाकून आदिवासींसाठीची न्यायाची लढाई लढले आहेत. धडपड केली आहे याबाबतची जाणीव आहे. ते स्थान आणि तो मान त्यांना दिलाच पाहिजे पण आदिवासींमध्ये चाललेल्या ह्या चळवळीचे नेतृत्त्व हे बिगर आदिवासींच्या हातात असल्यामुळे किंवा बिगर आदिवासी पक्षाच्या हातात असल्यामुळे ही चळवळ आदिवासींवरील अन्याय-अत्याचार व पोटाच्या प्रश्नापलिकडे गेलेली आहे, असे दिसत नाही. आदिवासींमध्ये काम करणाऱ्यांनी प्रामाणिकपणे आदिवासींचे प्रश्न सोडवण्यासाठी जिवाची बाजी लावलेली असणार हे मान्य करून सुद्धा आदिवासींचे मूळ प्रश्न राहतातच. स्वाभिमानाची भावना जागवण्यापेक्षा 'अवलंबत्वाची' भावना निर्माण करून आपले वर्चस्व प्रस्थापित करत असतात आणि म्हणून आदिवासींची मूलभूत संस्कृती आणि आदिवासी अस्मिता यासाठी आदिवासींचे जीवनसत्त्व घेऊन, स्वाभिमानाची चळवळ केलेली आहे असे दिसत नाही. या अंगाला स्पर्श करत आदिवासींच्या जीवन गाभाऱ्यात जावून त्या जीवनातील, जीवन मूल्यांवर कोणी नजर टाकलेली दिसत नाही आणि म्हणून आजही आदिवासींकडे बघण्याचा तुच्छ दृष्टिकोन व्यवहारात जीवंत आहे आणि म्हणून आज आदिवासीला "लुच्चा, लफंगा, लंगट्या, बिनडोक, दारूड्या, चोर-दरोडेखोर" म्हणून हिणवले जाते. आदिवासी समाजाला हीन लेखण्यापलिकडे सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या समाजात आदिवासीला काहीच स्थान नाही?

आदिवासींना हिणवणाऱ्यांना फक्त चंद्राचा डागच दिसला, त्यांना प्रकाश दिसला नाही. प्रकाश बघण्याची त्यांच्यात कुवत नसावी का?

आदिवासी जीवनात, अनेक अशी जीवनमूल्ये आहेत की जे मानवी जीवनाला भूषण ठरतील. सुंदर बनवतील.

आदिवासींमध्ये अशी परंपरा आहे की, आदिवासीला एखादी वस्तू गहाण ठेवायची असेल किंवा कोणताही करार करायचा असेल तर गावातील दोन-पाच माणसं बसली आणि तिथं असा व्यवहार होतो की, तुझा विश्वास माझ्यावर आणि माझा विश्वास तुझ्यावर बस्स...! ... झाला व्यवहार! पण स्वतःला सुसंस्कृत समजणाऱ्या समाजात वरीलप्रमाणे कोणताही व्यवहार झाला तर माणसावर माणूस म्हणून विश्वास ठेवत नाही, लगेच स्टॅम्प लिहून घेतात. त्यांचा विश्वास कागदावर, माणसावर नाही. कागदावर विश्वास ठेवणारी संस्कृती चांगली की, माणसांवर माणूस

म्हणून विश्वास ठेवणारी संस्कृती चांगली? आदिवासी संस्कृती माणसावर माणूस म्हणून विश्वास ठेवते!

आदिवासींमध्ये एक समतेची सार्वजनिक परंपरा आहे. "आपण! तुम्ही! अहो! अशी बहुमानाचे स्तोम माजवणारी विशेषण आदिवासी भाषेत नाहीत. आदिवासी एकमेकांकडे पहात असताना ते मुळात मैत्रिच्या नात्याने पाहतात मग तो म्हातारा असो की, लहान मुलगा असो, बाप असो की आजा असो.

आदिवासींमध्ये भीक मागण्याची परंपरा नाही. आदिवासींच्या घरात आंधळा, लंगडा, लुळा-पांगळा असला तरी त्याचा द्वेष करीत नाही. त्याला आपल्या घरात बरोबरीचे स्थान देऊन सामावून घेतात. घरात कितीही दारिद्र्य असेल तरी त्याला भीक मागू देणार नाही. आदिवासीही भीक मागत नाही, आदिवासींचे देवही भीक मागत नाहीत. सभ्य समजले जाणारे समाजातील लोक आंधळे, पांगळे, लुळे लोक भीक मागतात. हातात पोथी आणि बगलेत झोळी घेऊनही भीक मागतात. त्यांचे देव सोन्या-चांदीचे असले तरीही भीक मागतात. देवाच्या दरवाज्याशी दान (भीक) पेटी (किंवा पेट्या) ठेवलेल्या असतात.

स्वतः सभ्य समजणाऱ्या समाजात, सासू-सासऱ्यांचा त्रास, नवऱ्याचा छळ झाला तर त्या सुनेला जीव देणं, अंगावर रॉकेल ओतून आत्महत्त्या करण्याशिवाय दुसरा पर्यायच उरत नाही. पण आदिवासींमध्ये आदिवासी सासूसासऱ्यांच्या किंवा नवऱ्याच्या छळाला कंटाळून सून आत्महत्त्या करत नाही आणि जीवही देत नाही. का? आदिवासी स्त्री कोणते जीवन मूल्य घेऊन जगत असते.

आदिवासी स्त्री नवऱ्याला देव मानत नाही. देव मानून किंवा धनाच्या लोभाने सर्व छळ सहन करावा, अशी परंपरा आदिवासींना नाही. नवऱ्याचा छळ आणि सासू-सासऱ्याच्या त्रासात झिजून झिजून मरण्यापेक्षा त्या नवऱ्याला सोडणे आणि दुसरा जोडीदार (नवरा) निवडणे, पसंतीच्या नवऱ्याबरोबर जीवन जगणे आदिवासी स्त्रीला अधिक पसंत पडते. ह्या व्यवहाराला आदिवासी समाज मान्यता देतो, बहिष्कार टाकत नाही.

आदिवासीत सामूहिक जीवनमूल्य, आदरभाव करण्याची जीवन पद्धती अशी कितीतरी मानवी जीवनमूल्ये आदिवासी जीवनात आहेत. ज्यांना उजाळा मिळालेला नाही आणि म्हणूनच आज आदिवासींना हिणवले जाते. ज्यांची नजर स्वच्छ नाही ज्यांच्या मनामध्ये आदिवासींबद्दल द्वेषच आहे त्यांना फक्त दोषच दिसणार, त्यांना आदिवासी जीवनातील मानवी मूल्यं कसे दिसणार?

आदिवासींमधली सगळीच मूल्यं, सगळ्याच परंपरा चांगल्या आहेत असे आम्ही मानत नाही आणि दावाही करत नाही. इतरांप्रमाणेच आदिवासींमध्ये सुद्धा अंधविश्वास आहे. आदिवासी स्त्रीला डाकीण म्हणून ठेसून मारले जाते, इथे अंधविश्वास आणि पुरुष प्रधानता आहे. याच्या विरोधातही आवाज उठविला पाहिजे. अंधविश्वास आणि पुरुष प्रधानता झुगारून देण्यासाठी जागृत कार्यकर्त्यांनी समाजाला प्रवृत्त केले पाहिजे आणि इतर समाजातील चांगली मूल्ये असतील तर ती मूल्ये मोकळ्या मनाने आणि आनंदाने स्वीकारली पाहिजेत. पण "मुख्य प्रवाहात या" असे म्हणणाऱ्यांना आमचे सांगणे आहे की, आमचे आम्ही सुधरू पण तुम्हीही सुधरा! आणि मानवी संस्कृती प्रस्थापित करत पुढे जाऊ या!!

भारताच्या घनदाट जंगलात, पहाड-पर्वतात, दऱ्याखोऱ्यांमध्ये आदिवासी आपले जीवन जगत होता. त्या जंगलावर, त्या विभागावर आदिवासींचाच अधिकार होता, सत्ता होती. फळे-फुले, लाकूड, शिकार इत्यादी बाबत कोणाच्या परवानगीची गरज पण नव्हती. खैबर खिंडीतून आर्य भारतात

आले. रथ, बरशी, कुऱ्हाडी, गाई-घोडे, गुराढोरांचा फौजफाटा घेऊन आले आणि प्रहिला हल्ला त्यांनी आदिवासींवर केला.

शेती करण्यासाठी, गुराढोरांना चारायला मोकळे रान मिळावा म्हणून आपल्या जवळ असलेल्या घोडे आणि शस्त्रांच्या बळावर आदिवासींचे जंगल, जमिनीवर आर्य लोक अतिक्रमण करू लागले. आदिवासींच्या जंगलातून आणि जमिनीतून आदिवासींना हाकलून लावले. आर्यलोक यज्ञ (होम) करायचे आणि 'हा विभाग आमचा झाला' अशी घोषणा करायचे तेव्हा त्यावेळचे आदिवासी आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करू लागले त्यामुळे आर्यलोक हैराण झाले. तेव्हा आर्य लोकांनी त्यावेळचे सत्ताधारी त्यांचा राजा श्री. रामचन्द्राची मदत मागितली. रामचंद्रजीच्या नेतृत्वाने त्यावेळच्या आदिवासींची 'राक्षस' म्हणून कत्तल केली, त्यांना चिरडून काढले. हे राक्षस कोण होते? हे राक्षस म्हणजे त्यावेळचे आदिवासी.

आज सिनेमा किंवा टी.व्ही. बघताना देखील आजचा आदिवासी माणूस सिनेमामध्ये राक्षसांना मारले तर टाळ्या वाजवतो, आनंद व्यक्त करतो; इतकी खोल 'राम संस्कृती' आदिवासींमध्ये मुरवली जात आहे आणि मानवी मूल्यांसकट आदिवासी संस्कृती आणि तिचा इतिहास पुसला जात आहे.

इतिहासाची पानं उलटवून बाकीचे चित्र राहिले तर काय दिसते? आदिवासींच्या मुलाला शिक्षणाचा अधिकार नाही. जिद्दीला पेटून एकलव्याने मातीचा पुतळा करून त्याचा गुरू केला आणि धनुष्यबाण चालवण्यात अर्जुनापेक्षाही हुशार ठरला! आदिवासीचे हुशार होणे कसे परवडणार? द्रोणाचार्यालाही खपले नाही. गुरु दक्षिणेच्या कपटी डावानी एकलव्याचा अंगठा तोडून त्या पिढीतल्या आदिवासींना दडपून टाकले. आदिवासींचा इतिहास रक्ताने रंगून गेला तेव्हा द्रोणाचार्य खलनायक होता असे इतिहासात कुठं सापडत नाही.

गुलाम भारताच्या इतिहासात स्वातंत्र्याच्या लढाईत खाज्या नाईक, तंट्या भील, रामदास महाराज, भागोजी नाईक, बिरसा मुंडा, राणी दुर्गावती इ. अशा अनेक आदिवासी क्रांतीवीरांनी रक्त सांडले. पण प्रस्थापित्त इतिहासकारांनी इतिहासाच्या पानावर आदिवासी वीरांची दखल घेतली नाही.

आपल्याकडे एक विचित्र गोष्ट आहे. संस्कृती म्हणजे धर्म असा काहीतरी समज आहे.

कारण आदिवासींना कोणताही तथाकथित धर्म नाही. आदिवासी अमूक एका धर्माचे आहेत म्हणून त्यांच्यावर शिक्का मारणे आम्हाला मंजूर नाही. आदिवासी हिंदू धर्माचे आहेत, असे गृहीत धरून चालणे हे आमच्यावरचे सरळसरळ धार्मिक आक्रमण आहे. भारत देशातील आदिवासी जमाती या विविध आदिवासी जमातीच आहेत. त्यांना स्वतःची अशी स्वतंत्र वेगळी संस्कृती आहे या आदिवासी समूहाचे निसर्गाशी स्वतंत्र असे नाते आहे आदिवासी समूह अंतर्गत माणसामाणसाचे संबंध या समूह संस्कृतीच्या ऐतिहासिक प्रक्रियेतून निर्माण झालेले आहेत. आदिवासी समूह संस्कृतीतील स्त्री-पुरुष संबंध हे देखील वेगळे दाखविता येतील असे आहेत. या आदिवासींच्या श्रद्धा ज्या दैवताशी जोडल्या आहेत, त्या निसर्गाभिमुख मुख्यतः आहेत. हिंदू, मुस्लिम, ख्रिश्चन धर्मश्रद्धा आदिवासी समूह संस्कृतीवर लादण्याचा प्रयत्न जिथे, जितक्या प्रमाणात झाला, तिथे तितक्या प्रमाणात आदिवासी समूह जीवनावर त्या त्या धर्म भावनाची उपरी निर्मिती झाली आहे.

आर्य रामाने आदिवासी समूह संस्कृतीची नायिका असलेल्या त्राटिका हिचे हात पाय तोडून केलेली विटंबना म्हणजे राक्षसणीचा निःपात असे म्हणून रामाचा गौरव केला जात असेल तर

स्वाभिमानी भूमीपुत्र आदिवासींना ते कसे मान्य होईल? त्याकाळातील आदिवासी समूह संस्कृतीतील लढणाऱ्या शूर गण नायक व गण नायिकांना दुष्ट राक्षस राक्षसीणी ठरवून यज्ञ करणाऱ्या आर्य रामाची पूजा करण्याचे आमच्यावर कोणी लादणार असेल तर स्वाभिमानी आदिवासी गप्प बसणार नाहीत.

आम्हाला माहीत आहे की, भारतातील अनेक आदिवासी समूह किंवा आदिवासी व्यक्ती यांनी ख्रिश्चन, मुस्लीम किंवा हिंदू धर्म स्वीकारलेला आहे किंवा त्यांच्यावर असे धर्म संस्कार लादले गेलेले आहेत. उत्तरपूर्व भारतात ख्रिश्चन धर्माचा प्रभाव आदिवासींवर आहे. काही ठिकाणी मुस्लीम तर काही ठिकाणी हिंदू धर्मांचा प्रभाव ही आदिवासींवर दिसून येतो.

हे धर्म संस्कार कशा प्रकारे लादले गेलेले आहेत खालील उदाहरणावरून स्पष्ट व्हायला हरकत नाही -

आदिवासींना शिक्षण द्यायचे, हुशार करायचे असा हेतू सांगून ख्रिश्चनांचे आदिवासीत काम चालू आहे. आदिवासी भागात, दूर जंगलात, डोंगर दऱ्यात, अवघड ठिकाणी सुद्धा मोठ्या प्रमाणात शाळा काढल्या, दवाखाने काढलेत आणि आदिवासी मुलांना शिकवले, हुशार केलेत, त्यांच्या आरोग्याची काळजी घेतली ही चांगली गोष्ट! पण त्यांच्या या चांगल्या गोष्टीच्या पडद्याआड त्यांनी आदिवासींना ख्रिश्चन धर्म शिकवण्याचेही काम केले. आदिवासींना त्यांचे जीवन, त्यांच्या संस्कृतीकडे पाठ फिरवून ख्रिश्चन धर्म आणि संस्कृती आत्मसात करण्यास भाग पाडले जाते आणि बहुसंख्य आदिवासींना ख्रिश्चन धर्मात ओढून घेतले जाते.

कोणालाही कोणत्याही धर्माचा प्रचार करायचा आणि कोणत्याही धर्मात जायचा अधिकार आहे. पण फसवून धर्मात घेणे म्हणजे लोकशाहीला सोडून आहे. कल्याणाचे, विकासाचे प्रश्न सोडवण्याचे गाजर दाखवून धर्मात घेण्याचा प्रश्न थांबलेला नाही. 'आमच्या धर्मात या, आम्ही तुमचे प्रश्न सोडवतो.' असे प्रत्येक धर्मवाले म्हणतात आणि आपल्याला आदिवासीचा मोठा हिस्सा (वाटा) मिळावा अशा प्रकारची जणू त्यांच्यात स्पर्धा सुरू झाली आहे. तेव्हा आदिवासी हिस्से-वाटे पाडून घेण्यासारखी चीजवस्तू झाले आहेत का? कोणी पण यावे लुटून न्यावे, हाक नाही ना बोंब नाही ही अवस्था बदलायला पाहिजे. आपले अस्तित्व टिकवायला पाहिजे.

संस्कृती नष्ट करण्याचा हा प्रकार वेगवेगळ्या मार्गाने केलेला आहे. प्रेमाने, धर्माने, संरक्षणाच्या, विकासाच्या किंवा एखाद्या प्रलोभनाच्या नावाने किंवा सरळ दादागिरीच्या जोरावर हिंदू संस्कृती आदिवासीत मुरवण्याचा प्रयत्न झालेला दिसतो. वेगवेगळ्या भागात वेगवेगळ्या प्रकारे हा प्रयत्न झालेला आहे, असे दिसून येते. काही भागात आदिवासींनी फारसा विरोध केला नाही, पण जिथं जिथं विरोध केलेला आहे, तिथं तिथं आजही आदिवासी संस्कृती टिकून आहे, असे आपल्याला दिसून येते. आज वर्तमानात उभे राहून नजर फिरवली आणि आदिवासी देवतांचा शोध घेतला तर आदिवासी देवता कुठं आहेत? असा प्रश्न पडतो. आदिवासी देवता धूळ खात पडली आहेत असे दिसते. याचे कारण असे की, धर्मांध लोक मुद्दामहून जाणीवपूर्वक हिंदू, ख्रिश्चन, मुसलमान इत्यादी धर्मांचे देवी-देवतांचे आकर्षण आदिवासींमध्ये वाढवत गेले आहेत. म्हणून आज आदिवासींच्या घरात आदिवासी देवता ऐवजी हिंदू राम-कृष्ण किंवा मुसलमानांचे पीर, ख्रिश्चनाचे येशू इत्यादींचे फोटो सापडतील पण वाघ देव, डोंगऱ्या देव, राजा पानठा, राणी काजळ, इंदी राजा, हुडोव देव या बरोबरच भारताच्या वेगवेगळ्या विभागातील जमातींचे त्यांच्या देव-देवतांचे फोटो (काही अपवाद वगळता) सापडणार नाहीत.

याचे कारण आदिवासी देवी देवता पुसून काढण्याचा व्यवस्थित प्रयत्न चाललेला आहे. धुळे जिल्ह्यामधील हिंदू धर्मवाल्यांच्या चाललेल्या गुप्त प्रयत्नांच्या उदाहरणावरून हे लक्षात येईल.

धुळे जिल्ह्यातील खान्देश मधला आदिवासींचा सर्वात मोठा देव म्हणजे राजा पानठा, गांडा ठाकूर, आणि राणी काजळ! पण या बाबतीत आदिवासींची दिशाभूल करण्याचे प्रकार चाललेले आहेत. राजा पानठा म्हणजे अर्जुन, राणी काजळ म्हणजे द्रोपदी आणि गांडा ठाकूर म्हणजे कृष्ण! अशा तऱ्हेचा खुलासा दिला जातो. तेव्हा आदिवासींनाही पटल्यासारखे वाटते, एवढेच नाही तर त्यांना मनोमनी बरेही वाटते, सुखावतात. कारण ते तसे वर्णन करून फुलवून सांगत असतात. पण इथं लक्षात ठेवायला पाहिजे की, आदिवासींचे देवता राजा पानठा, गांडा ठाकूर, आणि राणी काजळ यांची कहाणी वेगळी आहे आणि महाभारतातील अर्जुन, कृष्ण आणि द्रोपदीची कहाणी वेगळी आहे. राजा पानठा हा राजा पानठाच आहे तो अर्जुन असूच शकत नाही. राणी काजळ ही राणी काजळच आहे ती द्रोपदी असूच शकत नाही. आदिवासी देवतांचे स्वतंत्र असे आपले अस्तित्व आहे पण याकडे दुर्लक्ष केले जाते. आणि राजा पानठाची संस्कृती पुढे आणण्यापेक्षा अर्जुनाच्या संस्कृतीचाच आग्रह धरला जातो का?

आदिवासीत 'इंदल' हा उत्सव आदिवासींचा देव इंदिराजाच्या नावाने केला जातो. ह्या उत्सवात 'कळंब' झाडाच्या तीन फांद्या एका मैदानात फूट, दीड फुटाच्या अंतरावर एका लाईनीत रोवतात आणि धान्य पसरवले होते. कुवाऱ्या मुलीकडून पुजारी पूजा करून घेतो आणि रात्रभर त्या पूजेच्या भवती आसपासच्या खेड्यावरून आपले सगे सोयरे, शेकडो हजारो लोक ढोलाच्या तालावर नाचत असतात. दिवस मावळल्यापासून तर दिवस उगवेपर्यंत धुंद होऊन नाचतात आणि पूजेचे बकरं कापतात. मटनाच्या जेवणाची मेजवानी करतात. या उत्सवामागे पीकात (धान्यात) बरकती यावी अशी आदिवासी लोकांची भावना आहे. तर याबाबतही विकृत प्रचार सुरू आहे. म्हणे सत्यनारायण आणि इंदल एकच आहे आणि म्हणून काय केला, तर सत्यनारायण केला तर इंदलचे पुण्य मिळते आणि इंदल केला तर सत्यनारायणचे पुण्य मिळते. दोन्ही एकच आहे. असे सांगून ते म्हणतात की इंदल करू नका त्याऐवजी सत्यनारायण करा. तेव्हा त्यांना आमचे सांगणे आहे की, इंदल आणि सत्यनारायण जर एकच असेल तर मग तुम्ही सत्यनारायण बंद करा आणि आपण सर्वांनी इंदल करू या तुम्हीही ढोल गळ्यात घाला. असे म्हटल्यावर का बरं चिडतात?

आदिवासींची देवी 'याहा मोगी' या देवीचे हिंदुकरण करण्याचा प्रयत्न चालू आहे. 'देव मोगरा येथील 'याहा मोगी' देवी ही महाभारतातील द्रौपदीचा अवतार असल्याची आख्यायिका आहे - (सकाळ १९ फेब्रु. ९३)

अशा तऱ्हेने आदिवासी देवांचे नाव पुसून हिंदूचे देव तेच आदिवासींचे देव 'हीच' शिकवण दिली जात आहे.

आदिवासी हिंदू नाहीत 'हिंदूकोड बिल' आदिवासींना लागू नाही, हे इथं लक्षात घ्यायला हवे.

पूर्वीचे आदिवासी, नव्हे अजूनही काही आदिवासी आमने सामने भेटल्यावर 'हाजाके वार्लासके' म्हणून एक दुसऱ्याचे स्वागत करतात. ते राम राम करत नाहीत किंवा नमस्कारही करत नाहीत. बिहार आणि मध्यप्रदेश मध्ये काही जमातीत आजही 'जोहार' करतात पण अनेक विभागातील अनेक जमातीमधील त्यांचा स्वतंत्र असा 'नमस्कार' मुद्दाम पुसण्यात येत आहे आणि त्या जागी 'राम-राम' हा नमस्कार रुजवण्यात येत आहे. रूजवत आहेत.

१९४० च्या आसपास खान्देशात (धुळे जिल्ह्यात) आदिवासींमध्ये गुलाम महाराज नावाचा एक संत होऊन गेला. संत गुलाम महाराज यांनी आपल्या भक्तांना 'राम राम' करा म्हणून कधीच सांगितले नाही. एक दुसऱ्याला भेटल्यावर 'आपकी जय' नमस्काराची ही नविन परंपरा सुरू केली. त्या भागात अजूनही ही परंपरा आहे.

आज आदिवासीतल्या शिकलेल्या तरुणांना प्रतिष्ठेचं प्रलोभन देऊन सांगतात, अरे; तुम्ही मुलं शिकलेली, सवरलेली आहात. तुम्ही तुमच्या 'त्या' मागासलेल्या पद्धतीने लग्न करणार? तुम्ही प्रतिष्ठित आहात, लग्नात ब्राह्मण बोलवा, ब्राह्मणाकडून लग्न लावून घ्या अशा तऱ्हेने आदिवासी तरुणांची मनं वळवली जातात.

आदिवासींच्या लग्नात 'ब्राह्मण' लग्न लावत नाही. ब्राह्मणांना दारू चालत नाही(?) आदिवासींचे लग्न आदिवासी मधलाच प्रधान पुजारी किंवा आदिवासी स्त्री लावत असते. लग्न लावणाऱ्यांना वेगवेगळ्या विभागात वेगवेगळ्या नावाने ओळखले जाते. पण आता काही आदिवासी तरुण आपल्या लग्नात ब्राह्मण बोलावणे आपली प्रतिष्ठा समजतात. ही मूल्यं जाणीवपूर्वक रुजवली जात आहेत म्हणून आज ठाणे जिल्ह्यात काही आदिवासी ब्राह्मणांकडून लग्न लावून घेताना दिसतात.

आदिवासी हे इथल्या भूमीचे खरे खुरे स्वामी आहेत. मूळ मालक आहेत. हे मान्य केले पाहिजे. आदिवासींना तथाकथित कोणताच धर्म नाही हे प्रथम मानले पाहिजे. जन्म, मृत्यू, विवाह प्रसंगी करायचे विधी मात्र बहुसंख्य आदिवासी (अपवाद वगळता) आदिवासी पद्धतीनेच करतात. विवाह करताना आदिवासींना काझी किंवा ब्राह्मण लागत नाही. कोणतेही धार्मिक कर्मकांड आदिवासी करत नाहीत. हिंदू धर्मातील कर्मकांडाचा त्याग विज्ञानाच्या नव्या डोळसपणांनी आदिवासींनी केला आहे असे नव्हे तर आदिवासी हिंदू नव्हेतच व नाहीत हे त्याचे खरे कारण आहे. आदिवासींच्या अंधश्रद्धा, आदिवासीतील भगत, आदिवासीतील बडवा हे सगळे हिंदूधर्म संस्कारातून निर्माण झालेले नाही ते आदिवासींच्या मागासपणातून, गरजेतून व दारिद्र्यातून आले, टिकवले गेले आहेत. पाऊस पडून रान हिरवे झाल्यावर आदिवासी त्यांच्या पद्धतीने वाघदेवावर नियती पुजतो मगच हिरवा पाला तोंडात टाकतो. हिंदूच्या ऋषिपंचमीशी याचा काही संबंध नाही. आदिवासी जीवनातील आनंदाच्या, दुःखाच्या प्रसंगी मोहाची दारू पितो. आदिवासींचा भगत (पुरोहित) दारू पिऊनच घुमतो. हिंदू धर्मात पुजारी चोरून मारून दारू पितात. पण धर्माच्या नियमात हे निषिद्ध आहे! अशा कितीतरी गोष्टी सांगता येतील. तेव्हा ज्या आदिवासी पुढाऱ्यांना स्वाभिमान सोडून हिंदू म्हणून घेणे आवडत असेल त्यांनी खुशाल तसे म्हणून घ्यावे पण आदिवासी हिंदूच आहेत असा सांगण्याचा अट्टाहास त्यांनी करू नये. ज्या आदिवासींनी ख्रिश्चन धर्म स्वीकारला असेल त्यांनी ख्रिश्चन धर्माची उपासना जरूर करावी, जे आदिवासी इस्लाम धर्माचे झाले असतील त्यांनी मुसलमान धर्माप्रमाणे अल्लाला भजावे. धर्म न स्वीकारलेले किंवा कोणत्याच धर्मात न गेलेले अशा आदिवासींनी मात्र स्वतःला कोणत्याही धर्माचे म्हणवून घेऊ नये. नुसते आदिवासी असेच म्हणावे. आदिवासींना ते हिंदू आहेत म्हणून हिंदू धर्मात कोंबण्याचा मूर्ख प्रयत्न किंवा संधीसाधू आपमतलबी प्रयत्न करू नये. कोणताच धर्म अजून न स्वीकारलेल्या किंवा अशा धार्मिक आमिष, आक्रमणाला बळी न पडता अजूनही नुसते आदिवासी संस्कृतीचा योग्य तो अभिमान (दुराभिमान व अलगतावादी नव्हे) बाळगणाऱ्या बहुसंख्य आदिवासींना स्वतःला आदिवासीच म्हणवून घ्यायला आवडते. आमच्या काही मागासलेपणांतून आम्हाला नक्कीच बाहेर पडायचे आहे. विकसित व्हायचे आहे. राष्ट्र घडणीत महत्त्वाची भूमिका



15393 2A

पार पाडायची आहे. पण कोणत्याही धर्माच्या वर्चस्वाची आम्हाला मुळीच गरज नाही.

धर्मांतर आणि संस्कृती नष्ट करण्याच्या प्रयत्नाच्या पलिकडे 'आदिवासींची नजरच काढली जाण्याचा' एक प्रचंड मोठा धोका निर्माण झाला आहे. आपली नजर काढून दुसऱ्याच्या नजरेने बघावे, दुसऱ्याच्या डोळ्यांनी बघावे असे होणे सुद्धा आदिवासींची फसगत आणि धोका सिद्ध होणार आहे. म्हणून आपल्या अस्मितेचा शोध घेणारा आदिवासी इथंच सावध झाला पाहिजे.

आदिवासींवर अन्याय, अत्याचार होतो याबाबतच्या लढाईत दुसरा आपल्यासाठी लढतो आणि आपण आपल्यासाठी लढतो यात मूलभूत फरक आहे. दुसऱ्याने आपल्यासाठी सहानुभूती दाखवून किंवा जिव्हाळा दाखवून लढूच नये का? त्यांनी आदिवासीला न्याय देण्यासाठी जरूर प्रामाणिकपणे लढावे. पण यात हेही लक्षात घ्यावे की, दुसऱ्यांनी आपल्यासाठी करत असलेल्या लढाईत आणि आपल्या न्यायासाठी आपणच सुरू केलेली लढाई यात धार कोणत्या लढाईला असणार? अर्थातच आदिवासीने आदिवासींसाठी लढलेली लढाईच आदिवासींना जास्त न्याय देऊ शकेल.

इथं असा प्रश्न उभा राहू शकतो की, दूषित समाज व्यवस्थेमध्ये आदिवासी प्रामाणिकपणे न्यायाची लढाई लढू शकेल? कृपया अशी शंका घेऊ नका. आदिवासींवर विश्वास ठेवून बघा, विश्वास ठेवणं जड जात असेल तर यावरून हे स्पष्ट व्हायला हरकत नाही की, आदिवासींना किती दडपून ठेवले आहे!

न्यायासाठी उभा ठाकलेला आदिवासी या प्रश्नांची सोडवणूक करतच पुढे जाईल!

चळवळीच्या या वाटचालीत आदिवासी चुकणारच नाही का? चुकणार नाही, कोण म्हणतोय? आम्ही चुकतच नाही, असा कोणाचा दावा आहे? प्रत्येक पक्ष, गट, संघटना आपल्या प्रत्येक अधिवेशनात आपल्या कार्याची चर्चा करत असताना आपल्या चुका कुठं आणि कशा झाल्यात, त्या चुका दुरूस्त करून पुढेच जाण्याचा ते निर्धार करत असतात. चुका तेही करतात मग आदिवासी न्यायाची, अस्मितेची चळवळ पुढे रेटताना थोडं चुकला तर बिघडले काय? तुम्हाला चुका करण्याचा अधिकार आहे, मग आम्हाला का नाही? आम्हालाही चुकण्याचा अधिकार हवा, चुका दुरूस्त करून पुढे जाण्याचा अधिकार हवा. आम्ही तो अधिकार घेणार आणि पुढे जाणार!

बिगर आदिवासींनी आदिवासीत कामच करू नये का? तर ज्यांना ज्यांना आदिवासीत काम करावे असे वाटते त्यांनी-त्यांनी खुशाल काम करावे आमचे काही म्हणणे नाही. आमचे म्हणणे एवढेच की, आदिवासी जमातीतील नेतृत्त्वाला वाव द्या, संधी द्या, त्यांच्यातल्या उर्मींना, सुप्त शक्तींना मोकळे वातावरण द्या. ज्याच्यातून त्यांचे नेतृत्व फुलू शकेल ज्यातून त्यांचा विकास होऊ शकेल आणि त्याच्या प्रश्नांसाठी तोच विचार करू शकेल. त्या प्रश्नांसाठी तोच लढेल. ते सामर्थ्य विकसित होण्यासाठी मदत करावी. तो जीवनाच्या सर्वक्षेत्रात स्वावलंबी कसा होईल याचा विचार करावा.

आदिवासींच्या प्रश्नांसाठी, आदिवासींची चळवळ पुढे नेताना आदिवासी चळवळीने आपले अस्तित्व उभे करूनच पुढे गेले पाहिजे. शिक्षण घ्यायचे असेल तर सरकारी किंवा कोणाच्या तरी शाळेत शिकावे. आरोग्याबाबत उपचार करायचा असेल तर सरकारी किंवा कुणाच्या तरी खाजगी दवाखान्यात उपचार करायचा. काम उद्योग, शिक्षण, आरोग्य, साहित्य, कला इत्यादी जीवनातील प्रत्येक क्षेत्रात पर्यायी व्यवस्था आपले



I5993 2B

अस्तित्व 'म्हणून उभे केले पाहिजे. तीच आपल्या चळवळीची दिशा निश्चित करावी. दुसऱ्यांच्या दयेवर जगून आदिवासींची प्रगती होणार नाही.

शासनाने आदिवासींसाठी अनेक सोयी सवलती देऊ केलेल्या आहेत. आपल्यातल्या बऱ्याच लोकांना असे वाटते की, 'शासनाने देऊ केलेल्या सोयी सवलतीसाठी सुद्धा भांडावे लागते आणि त्या मिळाल्या की बस, असा विचार करतात पण या सोयी सवलतीच्या पलिकडे आदिवासी जीवनाचे जीवन स्वप्न काय असेल काय असू शकेल, याचा विचार केला पाहिजे.

आदिवासीमधील एक पिढी शिकून पुढे गेली आहे आणि दुसरी पिढी शिकून उंबरठ्यावर आहे. या दोघा पिढीतले... आदिवासी आज कोणत्या अवस्थेत आहेत आणि त्यांची ती अवस्था का आहे हे... समजून घेतले पाहिजे.

पहिल्या पिढीतले आदिवासी शिकले सवरले आणि काही कर्मचारी होऊन, अधिकारी होऊन सरकारच्या दरबारी गेलेत, तर काही सरकारच्या दरबारात न जाता समाजाच्या नावाने समाज कार्याच्या चळवळीत पडले आणि समाजाच्या न्यायाची लढाईत जुंपून घेतले. अशा तऱ्हेने या दोन्ही पिढ्या जोडून घेतल्यानंतर यातून आज समाजाला काय मिळाले?

या दोन्ही पिढीतल्या लोकांच्या मनात समाजाबद्दल काय स्थान होते. त्यांचे समाजाबद्दलचे आपले काय स्वप्न होते आणि त्या स्वप्नापर्यंत पोहचण्यासाठी त्यांनी काय प्रयत्न केलेत, कसे प्रयत्न केलेत, त्यांच्या प्रयत्नाचे काय झाले हे या परिस्थितीत समजून घेतले पाहिजे.

त्यांची समाजाबद्दल फुलत जाणाऱ्या उर्मींना कशी साथ मिळाली. कोणत्या अवस्थेत कोणते वळण मिळाले याबाबत ही नीट समजून घेतले पाहिजे. त्याशिवाय चळवळीतले अडथळे आणि चळवळीची दिशा स्पष्ट होणार नाही.

पदवीधर आदिवासी तरुणाला किंवा कर्मचाऱ्याला स्वतःला आदिवासी म्हणवून घ्यायला लाज का वाटते? शाळेत न गेलेल्या भाऊला भाऊ, बहिणीला बहिण किंवा आई वडिलांना, आई-वडिल म्हणून ओळख द्यायला लाज का वाटते? लाज वाटण्याची ही मूल्ये आदिवासीच्या मनात कोणी पेरली आणि का पेरली याचा बारकाईने शोध घेणे आवश्यक आहे.

आदिवासी मुक्तीच्या लढ्यात अडथळा ठरणारे मूल्य, दोष चळवळीत किंवा त्या चळवळीतल्या व्यक्तित असेल ते तसेच ठेऊन आदिवासीला आदिवासींची अस्मितेची चळवळ पुढे रेटता येणार नाही.

आदिवासी नेतृत्वाने हे लक्षात ठेवायला हवे की, कोणी आपल्याकडे बोट दाखवत असेल तर आपली मान झुकता कामा नये. ताठ मानेने आणि एका निर्धाराने आदिवासी मुक्तीची चळवळ ही मानव मुक्तीच्या दिशेने जात आहे हा विश्वास दिला पाहिजे.

हा विश्वास देत असताना आमच्या चळवळीची भूमिका आणि दिशा स्पष्ट करायला पाहिजे.

समाजाला जागृत करू, संघटित होऊ त्यातून एक शक्ती उभी करू व या शक्तीच्या जोरावर दुबळ्यांवर राज्य करू अशी आमची भूमिका नाही.

आम्हाला फक्त आमच्या इतिहासाचे गुणगान करायचे नाही. आम्हाला भविष्य घडवायचंय. आम्हाला वेगळी चूल मांडायला नव्हे, तर आमच्या अस्मिते सकट, सर्वांच्या खांद्याला खांदा लावून ताठ चालता यावे म्हणून!

# आदिवासी एकता चळवळीचे वैचारिक मंथन!

वाहरू सोनवणे

*धुळे जिल्ह्यातील अक्कलकुवा तालुक्यातील मेवास अंकुश विहीर येथे दि. १५ व १६ जानेवारी १९९४ रोजी चार राज्यातील आदिवासींच्या प्रतिनिधींचे एकता संमेलन भरले होते. त्यानिमित्त आदिवासींच्या समस्यांचा उहापोह करणारी ही लेख मालिका देत आहोत.*

आज आदिवासींचे अनेक प्रश्न आहेत. रोजगारांचा प्रश्न, धरणे, खाणी, कारखाने, आणि राखीव जंगलाची घोषणा केल्यामुळे ह्यातून निर्माण होणारा विस्थापनाचा प्रश्न, आरोग्याचा प्रश्न, शिक्षणाचा प्रश्न, फॉरेस्ट जमिनीचा प्रश्न, हस्तांतरीत जमिनीचा प्रश्न, अन्याय, अत्याचाराचे प्रश्न इत्यादी अनेक प्रश्न आहेत. या प्रश्नांसाठी दैनंदिन जीवनामध्ये झगडावे लागते आणि संघर्ष करायलाच हवा. या प्रश्नांशी संघर्ष करीत असताना याच्याही पुढे जाऊन माणसाच्या माणुसकीचा शोध घेतला पाहिजे आणि म्हणून आपण कोण आहोत? आपली ओळख काय? असे अनेक प्रश्न आहेत, ज्याच्यात आदिवासींचे माणूसपण सामावलेले आहे.

या धरतीचा पहिला माणूस आदिवासी आहे. आणि तोच मागासलेला आहे, असे मानले जाते आणि म्हणून सर्व धर्म, पक्ष, गट, संघटना पंथांचे काही लोक आदिवासींच्या विकासाच्या गप्पा मारीत आहेत आणि स्वतःलाच मिरवत आहेत. आदिवासींचे अस्तित्व नष्ट करीत आहेत. एवढेच नव्हे तर आदिवासीत फूट पाडून आदिवासीलाच आदिवासी विरुद्ध उभे करतात आणि आपसात भांडायला लावतात. कधी कधी या भांडणात आदिवासींचा जीवही जातो. मुडदे पाडले जातात. याचे दुःख त्यांना वाटत नाही. आदिवासीत काम करतात म्हणून त्यांना प्रतिष्ठा मिळते. पण आदिवासी आहेत तिथंच आहेत. गुणात्मक दृष्टीने आदिवासींचा सर्वांगीण विकास झालेला नाही. एवढेच नाही तर शासनाच्या पातळीवर सुद्धा हाच व्यवहार बघायला मिळतो. आपल्या मानवी हक्कांच्या प्रति आदिवासी जागृत असेल आणि आपले हक्क पदरात पाडून घेण्यासाठी आदिवासी जर का आंदोलन करीत असेल तर ते आंदोलन दाबून काढण्यासाठी सुद्धा बऱ्याचवेळा किंवा अशा वेळीही आदिवासीच अधिकाऱ्यांना आदिवासी विरुद्ध उभे केले जाते. आणि गोळीबार झाला तर मग हेच म्हणतात बघा - आदिवासीवर आदिवासी अधिकारी गोळ्या झाडतो. इथही आदिवासी बदनाम होतो. इथे हे लक्षात घ्यायला पाहिजे की, या व्यवहाराच्या मागे कोणत्या शक्तीचा हात आहे. अशा वेळी त्याच शक्तीला जबाबदार धरले पाहिजे. पण असे का व्हावे याचा शोध घेतला पाहिजे.

आदिवासींचा मूळ धर्म "आदिवासी धर्म" असताना आपमतलबी धर्मांध लोकांनी आदिवासीला वेगवेगळे प्रलोभन दाखवून कोणाला हिंदू केले (हिंदू कोड बिल आदिवासींना लागू नाही) कोणाला मुसलमान केले तर कोणाला ख्रिश्चन, अशा रीतीने आदिवासींना भाजीपाल्यासारखे वाटून घेतले आहे. याचप्रमाणे राजकीय क्षेत्रात सुद्धा

संरक्षण आणि विकासाच्या नावाखाली आदिवासींना वेगवेगळ्या पक्षात, गटात, संघटनेत, पंथात वाटून घेतलेले आहे. आणि म्हणून त्यांच्याच संस्कृतीच्या वर्चस्वाखाली जगत असताना आदिवासी अस्तित्व, आदिवासी संस्कृती आणि संस्कृतीतील सर्वात अधिक असलेले मानवी मूल्य नष्ट होण्याचा धोका निर्माण झालेला आहे.

आदिवासी जंगलाचा राजा होता, पण इंग्रज सरकारने कायदा केला आणि आदिवासींच्या अधिकारातील जंगल, नैसर्गिक साधन-संपत्ती वरचे अधिकार कायद्याने खालसा करण्यात आले. इंग्रज सरकारने जंगल आपल्या ताब्यात घेतले. आदिवासी आपल्याच जंगलात परका झाला. चोर झाला. आदिवासींची आणखी भयानक स्थिती अशी की, जिथं जिथं आदिवासी वस्ती करून राहतो, तिथं तिथं विकासाच्या नावाखाली धरणे बांधली जात आहे, खाणी खणल्या जात आहेत. कारखाने काढली जात आहे. आणि राखीव जंगलाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात आदिवासी विस्थापित होत आहे. आदिवासींची जमीन काढली जात आहे. आदिवासीला आपली मसानवटी सोडावी लागत आहे. आपल्या जन्मभूमीतून आदिवासींना हाकलून लावले जात आहे. ज्या साधन संपत्तीवर आदिवासी जगत असतो, तीच साधन संपत्ती आदिवासींच्या हातातून काढून घेतली जात आहे. आदिवासींना इतके दुबळे केले जाते की, अन्याय-अत्याचाराच्या विरुद्ध कधीच उठू नये. अशा परिस्थितीत मन मानेल तसे आदिवासींवर राज्य केले जाते, आणि मग आदिवासीकडे सहन करण्याशिवाय दुसरा पर्याय नसतो. मग अशा अवस्थेतला आदिवासी स्वाभिमानी जीवन जगण्यापेक्षा सुरक्षित जीवन जगण्यासाठी कोणाचा तरी आधार घेतो, लाचार होतो, आणि स्वतःचे अस्तित्व विसरून जातो.

आदिवासी समाजावर अन्याय झाला तर आदिवासी समाजाकडून "आदिवासी समाज" म्हणून प्रतिकार करताना दिसत नाही. आणि आदिवासींच्या विकासाचे दावे करणारे वेगवेगळ्या पक्ष, गट, संघटना, पंथ इत्यादी त्यांच्या त्यांच्या परीने भूमिका घेत असतात. आदिवासी समाजाची शक्ती एक संघ नसल्यामुळे होणारा परिणाम परिणामकारक ठरू शकत नाही. आणि समाजाला भोगावा लागणारा अन्याय सहन करावा लागतो. आणि म्हणून ज्यांना 'आदिवासी' म्हणून आदिवासी समाजाबद्दल विचार करावासा वाटतो, त्या सर्वांनी पक्ष, गट, संघटना, पंथांचे राजकारण कायम ठेवून देखील त्याच्याही पुढे आदिवासी म्हणून एकत्र येणे अति आवश्यक आहे.

या जगात कुत्रेही जगतात. आपल्याला कुत्र्यासारखे जगायचे नाही. आपल्याला आपल्या इज्जतीने जगायचे आहे. सन्मानाने राहायचे आहे. जीवनात आपल्याला मानव प्रतिष्ठा हवी असेल तर जगाच्या व्यवहारात बरोबरीचे स्थान हवे असेल तर वर्चस्ववादी संस्कृतीशी संघर्ष करीत असताना आर्थिक विषमता, राजकीय विषमता यांच्या विरोधात उभे राहून समतावादी समाज जीवनासाठी संघर्ष करावा लागेल.

आदिवासी समाजातील दोष दूर करून मानव मुक्तीच्या लढाईत संपूर्ण समाजाला आदर्श ठरावीत अशी जी मानवी मूल्य आहेत, त्यावर प्रकाश टाकत आपण जर एकत्र येऊ शकलो तर नक्कीच प्रस्थापितांचा आदिवासींकडे बघण्याचा दृष्टिकोन बदलेल.

देशाच्या, जगाच्या कानाकोपऱ्यात वेगवेगळ्या बोली भाषेत बोलणाऱ्या वेगवेगळ्या आदिवासी जमाती आहेत. त्यांच्यात कोणी उच्च नाही. कोणी निच नाही. सर्व आदिवासी एक आहोत. याची जाण आपण सर्वांनी ठेवली पाहिजे. या चातुवर्ण्य समाजव्यवस्थेच्या मूल्यांना बळी पडून कोणी उच्च

निचता मानीत असेल तर ही गोष्ट आपण आपल्या मनातून काढून फेकली पाहिजे.

आदिवासींना इतिहासात 'राक्षस' म्हणून मारले, कत्तली केल्या. कपट नीतीने एकलव्याचा आंगठा कापला, स्वातंत्र्याची लढाई लढून सुद्धा आदिवासी क्रांतीविरांचे इतिहासात नाव नाही. आदिवासी जंगलचा राजा, त्यांचे जंगल खालसा करून आपल्याच जंगलात आपणच चोर झाला. आणि आजही आदिवासीला चोर - दरोडेखोर, जंगली, वनवासी म्हणून हिणवले जाते. चिरडले जाते. भारत सरकारच्या प्रतिनिधीने १९८७ साली युनोच्या बैठकीत "भारतात आदिवासी नाहीत" अशी मांडणी केली आहे. आणि म्हणूनच १० **डिसेंबर १९९२ ते १० डिसेंबर १९९३ हे वर्ष "आदिवासी वर्ष" म्हणून युनोने जाहीर केले. पण भारत सरकारने साजरे केले नाही. ही बाब गंभीर आहे.**

आदिवासीत दर्जेदार अलिखीत साहित्य आहे. गाणी-म्हणी, गोष्टी, नाटके, कला-कौशल्य इत्यादी मौखिक पातळीवर पिढ्यानुपिढ्या चालत आल्या आहेत. असे अलिखीत साहित्याला लिपीबद्ध करून नवीन प्रेरणा जोडल्या गेल्या पाहिजेत. आदिवासी साहित्य पुढे आले पाहिजे आणि आपला इतिहास आपणच लिहिला पाहिजे.

आदिवासींचे दु:ख, वेदना आणि हक्क मांडण्यासाठी, आदिवासी जीवनातील मानवी परंपरा जपण्यासाठी, आपला आवाज आपल्या बोली भाषेत मांडले पाहिजे. आपल्या बोली भाषेतल्या संकल्पना आपल्याला सहज समजतात आणि मनाला भिडतात आणि म्हणून त्यासाठी आदिवासी लिपी तयार करून आदिवासींचा इतिहास आदिवासी साहित्याची निर्मीती केली पाहिजे.

शिक्षणाचे महत्त्व आपण जाणले पाहिजे. शिक्षणामुळे आधुनिक जगाला आणि आपल्या हक्काला समजून घेण्याची कुवत वाढते. म्हणून आपण आपल्या मुलामुलींना शाळेत पाठविले पाहिजे.

आजपर्यंत ज्याच्यावर विश्वास टाकला त्यांनीही आदिवासींना न्याय दिलेला नाही. असाही अनुभव आलेला आहे. आदिवासींना अनेक प्रकारे फसवले गेले आहे. फसवत आहे. नाना प्रकारे अन्याय-अत्याचार सहन केला आहे. करत आहेत. अनेक जखमांच्या वेदना घेऊन आजचा आदिवासी बोलायला लागला आहे. गर्जायला लागला आहे. दुसऱ्यांवर अवलंबून आता खूप झाले, आदिवासींच्या प्रश्नांसाठी, आदिवासींच्या विकासासाठी, आदिवासींनी पुढे आले पाहिजे. आदिवासी जीवनाचे सुंदर भविष्य घडविण्यासाठी आदिवासींनीच पुढाकार घेऊन त्यांनीच निर्णय घ्यायला पाहिजे. कोणत्याही प्रकारची कुटनीती वा डावपेच न आखता एक दुसऱ्याला समजून घेऊन विश्वासपूर्ण एकतेची बांधणी करण्याचा निर्धार आदिवासी एकता परिषद करीत आहे.

आम्हाला इतरही भान आहे. जगात एक स्थित्यंतर घडत आहे, त्याचे आहे. आधुनिक जग किती पुढे आहे याचेही आहे, आणि किती मागे गेले याचेही आहे. आमची संस्कृती जपण्याच्या नावाखाली आम्हाला टोपल्या विणत ठेवणार असाल तर ते आम्ही खपवून घेणार नाही. आम्ही शिकणार आहोत. आम्ही इंजिनिअर होणार आहोत, वैमानिक होणार आहोत, साहित्यिक होणार आहोत, आणि सामाजिक कार्यकर्तेही; त्यामुळे आमची संस्कृती नष्ट होते असे नव्हे तर आम्हाला एक विश्वास आहे, तो महत्त्वाचा आहे, आम्ही जी मूल्ये जपायचा प्रयत्न करतोय ती याही परिस्थिती महत्त्वाची आहेत. शिकताना इंजिनिअर - कामगार बनताना आम्ही ती टाकून देणार नाही. नव्या परिस्थितीत ती कशी राबवता येईल त्याचा

*(पुढील मजकूर पेज नं. १५ वर)*

# ते भिल्ल चोरी करत! (?)

प्रा. चामुलाल राठवा

माझ्या लेखाचे शीर्षक असलेले हे वाक्य इयत्ता चौथीच्या मराठी बालभारतीच्या अठराव्या धड्यातील व्याकरण विभागातील असून वचन बदलून पुन्हा लिहिण्यासाठी घेतलेले आहे. (पाठ अठरावा, सिंधुदुर्ग पान ७४ व्याकरण विभाग वचन बदलून वाक्ये पुन्हा लिहा (क) ते भिल्ल चोरी करत.) मूळ चौदाव्या पाठातील पहिल्या परिच्छेदात आलेले असून त्या वाक्यात बदल करून ते अठराव्या पाठाच्या व्याकरण विभागात घातलेले आहे. (पहा : पाठ चौदावा, देवी अहिल्याबाई होळकर, पान अठ्ठावीस, पहिला परिच्छेद) या दोन्ही पाठात आलेल्या भिल्लांबद्दलच्या या वाक्याबद्दल माझी प्रतिक्रिया व्यक्त करण्यासाठी मी हा मनोगत वजा लेख तयार केलेला आहे.

चौदाव्या पाठाच्या पहिल्या परिच्छेदातील मूळ वाक्य असे आहे, 'माळव्यातील काही भिल्ल लोक चोऱ्या करत, डाके घालत, वाटसरूंना लुटत...' याच मोठ्या वाक्यातून, ते भिल्ल चोरी करत हे वाक्य तयार करून व्याकरण विभागात घातलेले आहे.

चौदावा पाठ हा सती अहिल्याबाई होळकर यांच्याबद्दल आहे. तिच्या आदर्शपणाबद्दल आणि महानतेबद्दल दुमत असण्याचे कारण नाही. अहिल्यादेवी होळकर यांनी महाराणा प्रतापनंतर इतिहासात प्रथमच आदिवासींबद्दल कल्याणकारी योजना राबविल्या हे सर्वांनाच मान्य करावे लागेल. परंतु एकीकडे अहिल्याबाईंचे व त्यांच्या कार्याचे उदात्तीकरण करीत असताना, दुसऱ्या बाजूला भिल्लांच्या इतिहासाचे अपुरे व विकृत दर्शन मुलांना घडवायचे हे योग्य वाटत नाही.

त्याकाळात माळव्यातील काही भिल्ल लोक चोऱ्या करत, डाके घालत, वाटसरूंना लुटत. मग काही भिल्ल लोक काय करीत? काही भिल्ल लोक शेती करीत, पशूपालन करीत व लष्करी व्यवसायही करीत असत. त्यांचाही उल्लेख करायला हवा. काही भिल्ल चोऱ्या करत एवढेच ठासून लिहिण्याचे प्रयोजन काय? माळव्यातील काही भिल्ल चोऱ्या करत, ही जगाच्या इतिहासातील एकमेवाद्वितीय अशी गोष्ट आहे काय? काही भिल्ल चोऱ्या करत. डाके टाकत, वाटसरूंना लुटत, मग काही भिल्ल काम करत हे मुलांना कसे समजेल? त्या काळात चोऱ्या करणे, डाके टाकणे, वाटसरूंना लुटणे हे भिल्लांचे पिढीजात धंदे होते काय? आजचे शिक्षण हे मूल्याधिष्ठित शिक्षण आहे असे म्हटले जाते. मग पुस्तकातल्या या लिखाणातून आमच्या मुलांनी त्यांचे पूर्वज चोऱ्या करीत एवढेच शिकायचे काय? आणि त्यातून कोणते संस्कारमूल्य आमच्या मुलांनी घ्यावयाचे? माळव्यातील भिल्ल हे मूलतः चोर, डाकू व वाटमारी करणारे होते असे लेखकाला अभिप्रेत आहे काय? जर तसे नसेल तर भिल्ल चोरी का करीत, डाके का घालत, वाटसरूंना का लुटत? हेही लेखकाने मुलांना समजून सांगितले पाहिजे. भिल्ल चोर, डाकू व दरोडेखोर बनण्यास कोणती परिस्थिती कारणीभूत झाली हे मुलांना समजायला हवे.

१४ व्या व १८ व्या पाठांच्या लेखकांनी काही भिल्ल चोऱ्या करत किंवा ते भिल्ल चोरी करत सारखी वाक्ये घेताना या पुस्तकाचा अभ्यास करणारी भिल्लांची मुलेही हजारोंच्या संख्येने असतील याचा अजिबात विचार केलेला दिसत

नाही. पाठ्य पुस्तक निर्मिती मंडळातील तज्ज्ञ अभ्यास करणाऱ्यांनी भिल्ल मुलांची प्रतिक्रिया काय असू शकते याचा विचार अजिबात केलेला दिसत नाही. आपण भिल्ल आहोत. आपले पूर्वज चोऱ्या करीत, डाके टाकत, वाटसरूंना लुटत त्यांच्यातले आपणही. अशी न्यूनत्वाची भावना भिल्ल मुलांच्या मनात निर्माण होणार नाही काय? आणि भिल्लांच्या मुलांबरोबर शिकणाऱ्या इतर समाजाच्या मुलांची ही वाक्ये वाचल्यानंतर भिल्लांबद्दल काय धारणा बनेल? भिल्लांच्या मुलांबद्दल, त्यांच्या मनात निर्माण झालेली भावना त्यांनी त्या मुलांसमोर उघडपणे व्यक्त केली तर? त्याचा भिल्ल मुलांवर काय परिणाम होईल? भिल्ल मुलांच्या मनात कुंठा किंवा न्यूनत्व निर्माण करण्याचा हा अनिष्ट प्रकार नाही काय? कारण हा एका मुलाचा प्रश्न नसून इयत्ता ४ थीत शिकणाऱ्या हजारो भिल्ल मुलांचा आहे.

ते भिल्ल चोरी करत या वाक्यातील भिल्ल या शब्दाच्या जागी दुसऱ्या एखाद्या जाती जमातीचे नाव आले असते तर त्या जाती जमातीच्या लोकांच्या भावना दुखावल्या गेल्या असत्या व त्यांनी महाराष्ट्र पाठ्य पुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाकडे तक्रार नोंदवली असती. या पुस्तकातून ही वाक्ये काढून टाकण्यास बजावले असते; त्यासाठी दडपण आणले असते व प्रसंगी आणखी बरेच बरेवाईट प्रकार केले असते. आणि आज पासून शंभर/दीडशे वर्षांपूर्वीच्या एखाद्या भिल्ल नायकाने हीच वाक्ये वाचली असती तर त्याबद्दल जबरदस्त प्रतिक्रिया व्यक्त केली असती; कारण त्या काळचा भिल्ल समाज जरी अशिक्षित होता तरी आत्मप्रतिष्ठा व अस्मिता नावाची चीज त्यांच्याठायी होती. आत्मसन्मान, आत्मप्रतिष्ठा व अस्मितेची जपणूक करण्यासाठी याच भिल्लांनी इंग्रजांसारख्या बलवान राज्यकर्त्यांशी दोन हात केले आहेत. जाती वाचक शिवीगाळ कानी पडताच अंगावरचा सरकारी गणवेष भिरकावून नोकरीचा राजीनामा देणारे भिल्ल नायक त्या काळात होते. मी भिल्लांच्या भावनांना हात घालण्यासाठी हे लिहीत नाही. माझ्या लिहिण्याचे तात्पर्य एवढेच आहे की, भिल्लांनाही भावना असतात व त्या दुखावल्या जाऊ शकतात. पण अलिकडे इतरांच्या मानाने त्यांच्या अंगी सहनशिलता जास्त असल्याने भिल्लांबद्दल काहीही बोलले तरी जगाच्या बाजारात खपत असले तरी त्यांच्या सहनशिलतेची परीक्षा पाहणे योग्य होणार नाही.

हे सर्व विस्ताराने लिहिण्याचे कारण असे की, आज शासकीय पातळीवरून आणि अन्य काही पातळ्यांवरून आदिवासींना राष्ट्राच्या 'मुख्य प्रवाहात' आणण्याच्या दृष्टिने जोरात प्रयत्न चालू आहेत. भिल्लांनीही इतर आदिवासींबरोबर मुख्य प्रवाहात यावयाचे आहे हे ओघाने आलेच. म्हणून आदिवासींनी मुख्य प्रवाहात यावे अशी अपेक्षा असेल तर 'मुख्यप्रवाहवाल्यांनी! आदिवासीकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन बदलला पाहिजे.

या देशातल्या भिल्लांनी चोऱ्या करणे, डाके घालणे, वाटसरूंना लुटणे याव्यतिरिक्त इतिहास काळात दुसरे काहीच केलेले नाही काय? इतरांप्रमाणे भिल्लांनाही इतिहास आहे. पश्चिम व मध्य हिंदुस्थानातील बऱ्याच राजवटींना भिल्लांनी परकीय आक्रमणांच्या वेळी मदत केली आहे. देशाच्या स्वातंत्र्य लढ्यात देखील त्यांचे महत्त्वाचे योगदान आहे. इंग्रजांसारख्या प्रबळ सत्तेला आदिवासींनीच सर्वप्रथम सशस्त्र आव्हान दिलेले आहे. याकामी भिल्ल, गोंड, नाईकडा, संथाल, महादेव कोळी, रामोशी हे अग्रेसर होते. हे विसरता येणार नाही. देशकार्याला मिळालेले हे योगदान, प्राथमिक स्तरावर शिक्षण घेणाऱ्या आदिवासी व बिगर आदिवासी मुलांना त्यांच्या क्रमिक पुस्तकांद्वारे व्यवस्थित व सोप्या भाषेत समजून देणे अत्यावश्यक आहे. त्याच्याने आदिवासी मुलांबद्दल व आदिवासींबद्दल

बिगर आदिवासी मुलांना जवळीक वाढण्यास मदत होईल व आदिवासी मुलांच्या मनातील कुंठा व न्यूनत्वाची भावना काढून टाकता येऊ शकेल. आज आदिवासी इतरांना परका मानतात तर बिगर आदिवासी आदिवासींना परका मानतात. हा प्रकार कमी करून त्यांच्यातील ही परकेपणाची दरी कमी करण्याचा प्रयत्न काही प्रमाणात यामार्गाने करता येईल. एकीकडे राष्ट्रीय एकात्मतेच्या गप्पा मारायच्या, देशाच्या अखंडतेची स्वप्ने बघायची आणि दुसरीकडे मात्र आपल्याच बांधवांचे विकृत चित्र जगापुढे उभे करायचे या प्रकाराला काय म्हणावे? आदिवासींनी मुख्य प्रवाहात यावे अशी हाकारी करणाऱ्यांना आदिवासींनी मुख्य प्रवाहात येताना आपली अस्मिता आत्मसम्मान बाजूला ठेऊन यावे असे अभिप्रेत आहे काय?

माझा हा मनोगत वजा लेख पूर्ण करताना मी पुन्हा असे म्हणेन की, आजचे शिक्षण हे जर मूल्याधिष्ठित शिक्षण असेल तर पाठ्यपुस्तके तयार करताना त्या वर्गात शिकणाऱ्या सर्व जाती-जमाती व समाजातील मुलांच्या आशा, आकांक्षा व भावना यांचा विचार व्हावा. एकाच पाठात एका समाजाचे उदात्तीकरण तर दुसऱ्या समाजाचे विकृतीकरण असे होऊ नये, पण ते होत आहे ही खेदाची गोष्ट आहे. फक्त पाठ्य पुस्तकातूनच नव्हे तर इतर प्रासंगिक लेखांतूनही हे प्रकार होत असतात. या लेखाद्वारे मी पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळाला अशी विनंती करू इच्छितो की, पाठ्यक्रम बदलून नवीन पुस्तके तयार होत असता त्यांनी आपल्या तज्ज्ञाकडून या पुस्तकांचे बारकाईने परीक्षण करून घ्यावे. इयत्ता ४ थी च्या पुस्तकातील वरील दोन्ही पाठातून ते भिल्ल चोरी करीत हे वाक्य काढून टाकावे. जर ते काढायचे नसेल तर त्या पाठाच्या लेखकांनी अहिल्याबाईच्या चरित्राचा पुन्हा व्यवस्थित अभ्यास करून भिल्ल चोरी का करीत, डाके का टाकत हेही सोप्या भाषेत मुलांसमोर मांडावे, भारतीय समाजातील फक्त भिल्लच चोरी करीत, असे या व्याकरणातील वाक्यांद्वारे लेखकांना मुलांच्या मनावर ठसवायचे आहे काय? तसा उद्देश असेल तर लेखकाने दादोबा पांडुरंग यांचे श्री. प्रियोळकर यांनी प्रसिद्ध केलेले चरित्र व आत्मचरित्र वाचावे म्हणजे भिल्लांबरोबर आणखी कोण डाके व दरोडे टाकण्याचे काम करीत हे समजायला थोडी मदत होईल.

*(पेज नं. १२ वरून पुढे चालू)*

आमचा शोध थांबणार नाही. कारण ती मूल्य एक मुक्त मानवी समाजाचे-भविष्य घडवायला मदत करणारी आहेत. ते आमचं एकट्याचं काम नाही, सर्व दलित, शोषित, श्रमिक, स्त्रियांनी मिळून उभं करायचे आहे, आम्हाला फक्त आमच्या इतिहासाचं गुणगान करायचे नाही, आम्हाला भविष्य घडवायचे, आम्हाला वेगळी चूल मांडायला नव्हे तर आमच्या अस्मितेसकट सर्वांचे खांद्याला खांदा लावून ताठ चालता यावे म्हणून.

सर्वसाधारण अशी भूमिका घेऊन या शिबीरात आदिवासी संस्कृती जतन, अस्मिता, आत्मसन्मान, स्वयंनिर्णय, शिक्षण, स्वावलंबन, मानव व निसर्ग मुक्ती इ. विषयांवर चर्चा होईल. या विषयावर मांडणी करण्यासाठी महाराष्ट्र, गुजराथ, मध्यप्रदेश, राजस्थान इ. राज्यातून मान्यवर तज्ज्ञ, विचारवंतांना आमंत्रित करण्यात आले आहे.

या शिबीरात आदिवासी कार्यकर्ते, लोकप्रतिनिधी, कर्मचारी, आधिकारी, विद्यार्थी समाजसेवक इत्यादींचा आदिवासी समाजाचे प्रतिनिधी म्हणून सहभागी व्हावे अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# भामरागडच्या गर्भातील माडियांच्या अंधश्रद्धा

कुसुम अलाम

आदिवासी गिरीकुहरात, रानावनात, समूहाने राहणारा. निसर्गाच्या सहवासात असताना निसर्गाचे अनेक चमत्कार घटनांचे ते साक्षीदार, निसर्गाच्या अलौकिक शक्तींच्या सामर्थ्याने ते अवाक् होतात. साहजिकच निसर्गाविषयी त्यांच्या मनात कुतुहल, आदर, भीती असणारच. अलौकिक शक्तीवरचा विश्वास व त्या शक्तींना संतुष्ट करण्यासाठी केले जाणारे कर्मकांड म्हणजेच जादू. आदिवासींमध्ये धर्माबरोबरच जादूचे स्थान अत्यंत महत्त्वाचे आहे. अलौकिक शक्तींना आपल्या नियंत्रणाखाली आणून तिच्या सहाय्याने हवी तशी हवी ती कामे (चांगली-वाईट) करून घेण्यासाठी जादूचा उपयोग केला जातो.

जादू करताच शुभ-अशुभ, वाईट, दुष्ट समजल्या जाणाऱ्या दिव्य प्राण्यांचे सहाय्य घेतले जाते. दिव्य प्राण्यांची हमखास मदत मिळावी म्हणून विशिष्ट क्रिया, विधी, मंत्र विद्यांचा वापर केला जातो, म्हणजेच जादू केली जाते. शुभ कार्यासाठी पांढरी जादू भगताकडून केली जाते. पाऊस पाडणे, शत्रूंचा नाश करणे, दिव्य प्राण्यांना आपल्या नियंत्रणाखाली आणणे, इत्यादी. तोंडात पाणी घेऊन फव्वारे उडविणे म्हणजे तशीच क्रिया होऊन पाऊस पाडतो अशी त्यांची समजूत. केसं, लाल मिरच्या जाळल्याने महाभयंकर रोगांचा प्रतिबंध करता येतो असे ते मानतात. गावाच्या वेशीवर जनावराचे डोके टांगल्याने त्या गावावर येणारी संकटे टळतात अशीही त्यांची समजूत. हा सर्व पांढऱ्या जादूचा प्रकार होय. तर शत्रूंची प्रतिमा, बाहुली वगैरे करून तिला इजा केल्यास शत्रूंना इजा होते आणि त्याचा नाश होतो. एखाद्या स्त्रीचे केस जाळून तिला हळूहळू मारणे, एखाद्या मुलाचा प्राण घेणे, घर जाळणे, स्वत:साठी विजय मिळवणे या मुद्यात्मक गोष्टीसाठी काळी जादू वापरतात. संघर्षमय प्रतिकूल परिस्थितीत झगडता झगडता जगणाऱ्या माडियांच्या मनात या जादूने व मंत्राने आत्मविश्वास वाढायला लागतो.

रानटी जीवन जगणाऱ्या माडियांना निवाऱ्याचा अभाव, खाण्यात अपुरे अन्न, निल्कृष्ठ प्रतिचे अन्न, अंगावर घालायला अपुरे वस्त्र, अंथरुण पांघरूणाचा अभाव यामुळे त्यांना अरिष्टांना बळी पडावे लागते. आणि त्याला ते देवाचा कोप समजतात. त्यातून मग कोंबडे, बकरे, नवस देण्याची प्रथा सुरू झाली. कोप घालविण्यास भगताच्या मदतीने पूजा केली जाते. देवदेवतांची कृपा किंवा पूर्वजांच्या रागामुळेच रोग उत्पन्न होतात असे ते मानतात. मग गंडे, दोरे, ताईत, मंतरलेले तांदूळ कोंबडे-बकरे नवस हे कृत्य करतात. रोग वाढू लागतो. मग ते भक्तांकडे धाव घेतात. मृत्यू आल्यास देवाच्या अवकृपेने हे असे घडले, असे ते मानतात. डॉक्टरने रोग्यांचं निदान करणं म्हणजे : देवाचं काम माणसाच्या चामड्याच्या हाताने करणे होय असे ते मानतात, म्हणूनच देवी, कॉलरा, पटकी प्रतिबंधक लस टोचणाऱ्या डॉक्टरांच्या पथकाला त्यांच्या ह्या अंधश्रद्धेमुळेच बरेचदा माघार घ्यावी लागते.

लग्न झालेल्या स्त्रीने रंगीत कपडे वापरू नयेत, अंगात चोळी घालू नये, तिने अंगात चोळी घालणे म्हणजे देवाचा दंडक मोडणे होय. उघड्या

अंगाने वावरायचे. लग्न झालेल्या बाईने जर का आपली छाती झाकली तर तिला मुलं होणार नाहीत; झालीच तर ती जगणार नाही, अशा बाईच्या शेतात धान्य रुजायचे नाहीत, रुजलेतच तर वाढणार नाही आणि वाढलेच तर त्याचे केवळ फोलपट हाती येणार असे ते मानतात.

रजस्वाला स्त्रीने (मासिकपाळी असलेल्या) कुणाच्याही दृष्टीला पडू नये. नाहीतर विपरीत घडेल अनर्थ होईल. ह्या समजुतीने तशा स्त्रीला एका झोपडीत पाठवतात, ती झोपडी गावातच एका बाजूला असते. किंवा स्त्री पहाटेच उठून नाल्याच्या आसपास गावाबाहेर जंगलात जाते व अंधार पडेपर्यंत तिकडेच असते.

एखाद अरिष्ट घडलेलं असल्यास ते अरिष्ट कोणामुळे ओढवलं असावं याची चौकशी केली जाते. उदा. एखाद्या मनुष्याचा मृत्यू झाल्यास तो कशामुळे मेला असेल? याची चौकशी पुजाऱ्याकडे, भगताकडे केली जाते. त्याने समजा सांगितले की, 'अ' व्यक्ती हा 'ब' व्यक्तीने जादूटोणा केल्याने मरण पावला असेल तर त्याची सत्यता पडताळून पाहण्यासाठी 'वेठा' बघितला जातो. म्हणून अनेकजण मिळून जंगलात येऊन शिकार शोधतात. समजा शिकार मिळाली तर 'ब' ने जादूटोणा केल्याचे सिद्ध होते. नाहीतर पुन्हा येऊन पुजाऱ्याकडे चौकशी केली जाते. किती दिवस शिकार शोधायला जायचे हे घरासंबंधीचे प्रश्न असल्यास घरचा प्रमुख व गावाचा प्रश्न असल्यास गावाचा 'बुमयाल' व पेरमा ठरवतो. हे सर्व पंच कमेटी ठरवतात.

एखाद्या घरी चोरी झाली असल्यास पुजाऱ्याला बोलावून चोरी करणारा शोधला जातो. शोधायची पद्धत अशी की, पितळी अथवा कसलाही गुंडा (कळशी) उपडा ठेवतात. त्यावर धान कांडायचा मुसळ उभा ठेवतात व ज्याने चोरी केली असा संशय असतो त्याचे नाव घेऊन मुसळास धरलेला हात सोडतात. समजा मुसळ काही काळ स्थिर राहलेच तर त्या व्यक्तीने चोरी केली असे समजले जाते. हे काम पुजारी करतो.

जादूटोणा कुणी केल्याचा संशय असल्यास, 'कासा' ह्या धातूने 'परात' भिंतीला उभे टेकवून ठेवतात या तांब्याचे नाणे त्याच्या पृष्ठभागात स्पर्शून सोडतात. सहसा ते खाली पडते. एखादेवेळेला ते नाणं त्या सपाट पृष्ठभागाला चिकटते त्यावेळेस ज्या व्यक्तीचं नाव घेतलं असेल त्या व्यक्तीने जादूटोणा केला असावा असे ते समजतात.

जळता कापराचा तुकडा पाणी भरलेल्या तांब्याच्या पात्रात सोडतात तो कधी बुडतो तर कधी तरंगतो. हा तुकडा जेव्हा तरंगतो तेव्हा नाव घेतलेली व्यक्ती जादूटोणा करीत आहे असे गृहीत धरतात. परिसरात (भागात) एखादी वाईट घटना घडली व ती जादूमुळे घडली असा संशय असल्यास 'ओदे' चा शोध घेणं सुरू होतं, ह्या ओदेने जादू केली असं समजलं जातं. समजा एखाद्या निरपराध व्यक्तीला पकडलं गेलं आणि तो आपण 'ओदे' नाही असे सांगत असेल तर त्याला ते सिद्ध करावे लागते. त्याची रीत अशी की, ह्या तथाकथित ओदेला पाण्यात पूर्णपणे बुडवून ठेवले जाते. हे पाणी म्हणजे नदी, तळं ह्यांच्या काठावरचा भाग असतो. हा 'ओदे' काठालगतच्या झाडाचा बुंधा, वेल किंवा मूळ धरून श्वास कोंडून पाण्याखाली राहतो. जोपर्यंत काठावर असलेल्या एखाद्या व्यक्तीने मारलेला बाण दुसरी व्यक्ती आणत नाही त्यापूर्वी ज्याचेवर 'ओदे' असल्याचा आरोप आहे अशी व्यक्ती पाण्यात पाण्याबाहेर येवू नये म्हणून त्याच्या आईकडून नात्यातील मंडळी त्याला पाण्यात ढकलत जातात. ह्या मंडळीत विशेषतः 'मामा' असतात.

*(पुढील मजकूर पेज नं. १९ वर)*

# आदिवासींचे (तिव्हार) सण

**वीरसिंग पाडवी**

आदिवासी संस्कृती आगळी वेगळी असून आजपर्यंत आदिवासींनी आपली संस्कृती टिकवून धरली आहे. आपल्या संस्कृतीप्रमाणे त्यांची जीवन पद्धती, रूढी, रीवाज व तिव्हार वेगळे आहेत. संस्कृतीचा वेगळेपणा म्हणजे त्यांचे जीवन व सृष्टी निसर्गाशी एकरूप आहेत. निसर्गातील झाडे, वेली, गवत आणि अन्न-धान्य यांना महत्त्व आहे. त्यांना देव मानलेले आहे. त्याची पूजा आजही करतात. मंदिरातील सोन्याच्या देवापेक्षा निसर्गातील या विविध वनस्पतींना जास्त महत्त्व देतात.

आदिवासी बोली भाषा प्रमाणे (निलीचारी, निवकी) व वाघदेव ह्या तिव्हारांना खूप मोठं स्थान आहे. निलीचारी किंवा निवफी म्हणजे हिरव्या रंगाचे गवत, ओलं गवत दोन - तीन इंच जमीनीपासून वर वाढल्यावर म्हणजे गुरांचा चारा खाण्यासारखा झाल्यावर 'निलचारी तिव्हार' साजरा करतात. तो आप-आपल्या गावात एक दिवस ठरवून साजरा करतात.

निलीचारी तिव्हार पूजा झाल्याशिवाय आदिवासी जमातीचे लोक जंगलातील हिरवा चारा (ओले गवत) कापून घरी आणत नाहीत. घरात एक गवताची काडी देखील ठेवणार नाहीत. एवढेच काय त्यावेळेस गुरंढोरं जंगलातून चरून येतात तेव्हा ते हिरवा चारा खाऊन येतात, त्यांचं (शेण) घरात सारवायला घेत नाहीत. स्वतः आदिवासी माणूस हिरवी भाजी-पाला खात नाही. इतके महत्त्व आहे.

तिव्हार साजरा करायच्या आधी गावातील प्रतिष्ठित लोक ठरवतात, आता चारा मोठा झाला आहे, गुरे ढोरे जंगलातून आता हिरवा चारा खाऊन येतात, तर आता निलीचारी किंवा निवफी पूजली पाहिजे म्हणून एक दिवस निवडतात. विशेष करून तो दिवस बुधवार निवडतात व गावात प्रत्येक घरी यथाशक्ती प्रमाणे वर्गणी करतात. त्या वर्गणीच्या पैशातून पुजेचे सामान खरेदी करून नारळ, उदबत्ती, एक-दोन कोंबड्या, एखादे अंडे वगैरे आणतात त्याला फारसा खर्च येत नाही. ठरलेल्या दिवसाची वार्ता सर्वांना माहीतच झालेली असते. तरी देखील दवंडी दिली जाते. त्या दिवशी कोणीही कामाला जात नाही. सर्व घरीच असतात. गावातील प्रतिष्ठित एकत्र जमतात निलीचारीच्या देवाच्या ठिकाणी जातात. हे ठिकाण गावाच्या बाहेर, वस्तीच्या बाहेर असते. त्या ठिकाणी मंदिर, मूर्ती वगैरे नसतात. दहा, बारा दगड गोटे ठेवलेले असतात. झाडाच्या बुंध्याच्या जवळ असतात. गावाचा पुजारी आधी सर्व देवाची पाणी टाकून आंघोळ घालतो, नंतर पूजा करतो. हिरवे गवत थोडसं उपटून देवाच्या येथे ठेवून तो पूजा करतो. त्याठिकाणी गावातील सर्व शेतकऱ्यांच्या औत ढकलण्याच्या काठ्या (पुरानं) आपआपले स्वतः आणून पूजेसाठी ठेवलेले असत. काठी, (पुरानं) बरोबर प्रत्येक माणूस आपल्या घरातून असेल ते थोडसं धान्य आणत असतो. सगळ्यांचे धान्य एका ठिकाणी ठेवले जाते. तसेच गावातील गुराखी (ढोलक्या) सर्व गावातील सर्वांचे गुरे चारणारा त्या दिवशी त्याला मानाची सुटी असते. तो पण आपली ढोरं चारण्याची काठी घेऊन त्या ठिकाणी उपस्थित असतो. त्याला 'गोवाल' असे आदिवासी भाषेत

म्हणतात. (गो=गाई, वाल=पाळणारा) या अर्थाने गोवाल असे म्हणतात.

पुजारी आपली पूजा करताना सर्व देवांची नावे घेऊन पूजा करतो. - गावदेवता, गावशिवाऱ्या, गाव पांढरं, गाव मेंढ्या, पुजपावा, वाघदेव, नागदेव, विजातराणी, गाजण गोटा, निलीचारी, अन्नदेव, आगदेव, पाणदेव, अशी देवांची आराधना करून विनंती करून सांगतो, "आजपासून आम्ही पूजा करून मोकळे होत आहोत."

हिरवाचारा घरी आणणारा, हिरवी पालेभाजी खाणारा कोणालाही दगा फटका व्हायला नको, त्रास व्हायला नको, आम्ही कच्च्या मातीचे माणसे आहोत. (कांचा का दुकानचे कांची माणूस) आहोत. चुकल्यास माफ करायचे. आजपासून तुझी पूजा (गारहा) देत आहोत. म्हणून पूजा करतो. पळसाच्या किंवा गावाच्या पानामध्ये पूजा ठेवतो, प्रत्येक देवाच्या ठिकाणी ठेवायला पाठवितो. नैवेद्य पूजा झाल्यावर सर्व आपआपल्या घरी परततात. प्रत्येक माणूस स्वतः घरी आपल्या परीने सण साजरा करतात. त्याच वेळेला (गाव उजळणी देखील) करतात. गाव उजळणीला काही ठिकाणी माऊली म्हणतात. त्यादिवशी गावातील कुटुंबे सर्व जंगलात जाऊन स्वयंपाक करून खातात. एक रात्री जंगलातच शेतामध्ये राहतात. बायका-मुले सर्व पूर्वीच्या काळी कॉलरा (पटकी), प्लेग अशी रोगाची साथ यायची त्यामुळे गावचे गाव साथी मध्ये सापडून मृत्यूमुखी पडायचे अशा साथी पावसाळ्याच्या सुरुवातीलाच व्हायच्या, त्या रोगजंतूंच्या किंवा साथीच्या तडाक्यात आपण सापडू नये, या हेतूने ही प्रथा होती. ती आजही आदिवासी जमातीने जतन करून ठेवली आहे. व आपआपल्या रीवाजाप्रमाणे आगळे-वेगळे (तिव्हार) उत्सव ते आजही साजरे करत आहेत.

◆ ◆ ◆

---

*(पेज नं. १७ वरून पुढे चालू)*

सख्खे नसल्यास चुलत, चुलत नसल्यास दूरचे. जर का हा तथाकथित 'ओदे' तीर परत आणण्यापूर्वी पाण्याबाहेर आला तर तो नक्कीच आहे हे समजून त्यास शिक्षा होते. या मागची श्रद्धा (अंध!) अशी की, पाण्यात असणाऱ्या जलपऱ्या (कविमय) ह्या ज्याच्या पोटात मंत्र आहे त्यास वाईट म्हणून पाण्यात जास्त राहूच देत नाहीत, स्वहस्ते पाण्याबाहेर ढकलून देतात. जे 'ओदे' नसतात व ज्यांना दीर्घकाळ श्वासही रोखता येत नाही त्यांची काय अवस्था होत असेल याची कल्पनाच केलेली बरी!

श्रद्धा निरीक्षक सापेक्ष कालमानापरत्वे बदलत जाणाऱ्या अर्थांचा शब्द. एखाद्या वस्तूबद्दल आपणास फार आकर्षण अन् तितकेच अज्ञान असले की, त्या वस्तूवर आपली श्रद्धा बसते. अज्ञानाची पुटं हळूहळू विरू लागली की, आकर्षणाची प्रखरता कमी होते. कालांतराने ज्ञानात भर पडते व आजपर्यंत श्रद्धेय असलेली व्यक्ती, संरचना, पद्धती, ज्ञान, श्रद्धा, अंधश्रद्धा ह्यांच्या आवर्तनात सापडते. हे कालचक्र असंच सुरू आहे आणि राहणारही आहे. आज आदिवासींच्या ज्या श्रद्धा आहेत त्यांना आपण थोडेफार सुधारलेले असल्याने अंधश्रद्धा मानतो. आमच्या प्रगतीशिलांच्या श्रद्धांना आमच्यापेक्षा सुधारलेले जे आहेत ते अंधश्रद्धा मानतात हे असं चालायचंच.

"जेव्हा ज्ञानाचा प्रकाश सकल आदिवासींमध्ये पसरेल तेव्हा ह्या अनेक अंधश्रद्धा कालबाह्य होतील. याचा श्रीगणेशा झालेला आहे."

हे कार्य नेटाने पुढे नेऊन एकही अंधश्रद्धा जीवंत राहणार नाही असा याप्रसंगी प्रण करू या.

◆ ◆ ◆

# आदिवासी एकतेची आवश्यकता व दिशा

ॲड. माधव मोरे

आदिवासी एकतेची आवश्यकता भासली नाही, याचे कारण आदिवासीने कोणालाही परके मानले नाही. स्वतः वर्चस्ववादी नसल्याने इतरांनी बाळगलेला आपल्या बाबतचा दृष्टिकोन तसाच असावा असे मानून व्यवहाराकडे दुर्लक्ष केले. परंतु आज आपल्या पिढ्या सुरक्षित राहतील किंवा नाही असा प्रश्न उभा आहे. जीवन जगण्याच्या साधनांचा नाश विस्थापन जमिनीचे हस्तांतरण यातून जीवन पद्धतीचा सामाजिक मूल्यांचा व पर्यायाने आदिवासी संस्कृतीचा नाश उघड दिसत आहे. शोषित, वंचित, उपेक्षित आदिवासींच्या दबलेल्या आवाजाला खऱ्या अर्थाने वाट करून देण्यासाठी काळाने आपल्याला एकत्र येणे भाग पाडले आहे.

आज आदिवासी समाजाचे अस्तित्वच नाकारले जात आहे. आदिवासी भारताचा स्वयंभू नागरिक आहे. भारताच्या प्रगतीत त्याचा हिस्सा आहे असे मानले जात नाही. कारण त्याला सहभागी करून न घेता प्रजा दक्ष राजा आदिवासी प्रजेच्या विकासाची, सवलतीची जाहिरातबाजी करत आहे. मागास कमजोर वर्गाच्या कल्याणाच्या घोषणा करून व सर्वसाधारण प्रश्न ठरवून सर्वसाधारण पद्धतीने ते सोडविण्याचे प्रयत्न करत आहे.

परंतु सर्वसाधारण पद्धतीत प्रथम वरच्या थरातील लोकांना प्राधान्य द्यावे लागेल व त्यांच्या कल्याणासाठी आदिवासींचे सर्व प्रकारे शोषण चालू ठेवावे लागेल यालाच या देशाची प्रगती, विकास म्हटला जातो. यात आदिवासीला स्थान आहे कोठे?

भारत सरकारचा आदिवासीबाबतचा दृष्टिकोन, भारत सरकारचे आंतरराष्ट्रीय संघातील स्थायी शिष्ट मंडळाने जाहीर केला आहे. व भारतातील आदिवासीचे अस्तित्व नाकारले आहे. भारतात अनुसूचित जमाती आहे, आदिवासी नाहीत, आदिवासींचे अलग प्रश्न नाहीत, समाज म्हणून वेगळे मुलभूत अधिकार नाहीत, व आंतरराष्ट्रीय संघाने आदिवासींच्या हक्कांचा जागतिक जाहीरनामा प्रसिद्ध केला, तो भारतात लागू नाही, त्यामुळे आंतरराष्ट्रीय आदिवासी वर्ष भारत सरकारला साजरे करण्याची गरज भासली नाही.

इंग्रजांनी ट्राईब म्हटले, त्याआधी निरनिराळी कमीपणा आणणारी नावे ठेवून आपले वर्चस्व आबाधित ठेवण्यासाठी भाकड कथा रचून बौद्धिक वर्चस्वाला धार्मिक आधार देऊन अपमानित जीवन लादले व सांस्कृतिक आक्रमणातून सामाजिक व राजकीय हद्दपारी आदिवासी समाजाच्या वाट्याला आली.

आतापर्यंत आदिवासी या शब्दाचा अर्थाबद्दल किस काढण्याचा प्रयत्न कोणी केला नाही. म्हणून त्याबद्दल प्रश्न उपस्थित झाला नाही. परंतु ऐतिहासिक सत्य नाकबूल करून जर एखाद्या मानव समूहाचे अस्तित्व नाकारण्यात येत असेल तर, त्या समूहाचे मानव म्हणून नागरिक म्हणून जगण्याचे सर्व अधिकार धोक्यात येतात. याची जाणीव स्वतःला आदिवासी म्हणवणाऱ्या समूहाला झाली आहे व त्यामुळे आपल्या अस्मितेचा शोध घेऊन आपली ओळख टिकविण्याचा प्रयत्न हा समाज करू लागला आहे.

आदिवासींच्या ओळखीची भौगोलिक, ऐतिहासिक, वांशिक, भाषिक व सांस्कृतिक वैशिष्ट्ये आहेत. आणि तीच महत्त्वाची आहेत, त्यामुळे आदिवासींचे वेगळेपण टिकून आहे. व ती वैशिष्ट्ये प्रकट करण्यासाठी वेगळ्या पद्धतीची

आवश्यकता आहे.

आदिवासींना एकत्र आणून सुरक्षिततेची भावना निर्माण करणारी कोणती पद्धत आहे? कोणते तत्त्वज्ञान आहे? कोणती दिशा आहे? हे ठरविताना भूतकाळाचा सारांश, वर्तमान परिस्थितीची कारणे, भविष्याची चिंता हवी, कोणत्याही तत्त्वज्ञानात कमी अधिक प्रमाणात समाजाबद्दल जाणीव, भविष्याचे स्वप्न आणि ते सफल करणेसाठी उपयोगात आणावयाच्या निर्णायक पद्धती याचा समावेश असतो.

तत्त्वज्ञानाने भारलेला लहान समूह सुद्धा यशस्वी झाले. व ज्यांना एकत्र आणणारे तत्त्वज्ञान नव्हते असे समूह जगाच्या पाठीवरून नष्ट झाले. म्हणून आदिवासी समाजाचे तत्त्वज्ञान हा समाज निर्माण झाला व सर्व प्रकारचे शोषण, दडपण, आक्रमण यातून टिकून आहे. नव्हे आपली संस्कृती, नृत्य व जीवन पद्धती सुद्धा टिकवून ठेवली त्यामागे कोणते तत्त्वज्ञान होते? याच्या मुळाशी आपण गेलो पाहिजे. कोणतेही खरे तत्त्वज्ञान लोकांच्या कष्टातून, दु:खातून, त्याच्या बद्दलच्या ममता व करूणा यातून निर्माण होते. ममता असेल तर समता असेल, तेथेच एकता असू शकेल. हस्तीदंती मनोऱ्यात बसून पंच तारांकित संस्कृतीच्या वर्चस्ववादी लोकांनी प्रसार माध्यमातून मोठ्या आवाजात जाहीर केलेले तत्त्वज्ञान या ठिकाणी गैर लागू आहे.

आपला इतिहास काय आहे याबाबत आदिवासी समाजाला आपल्या परंपरेतून बनलेल्या स्वभावातून नैसर्गिक स्वातंत्र्याच्या ओढीतून ज्ञान होऊ शकते. जो काही थोडा इतिहास उपलब्ध आहे. त्यावरून आदिवासींच्या अस्तित्वाचा काळ फार जुना आहे, व सर्व वर्चस्ववादी व वसाहतवादी संस्कृती विरुद्ध संघर्षाचा इतिहास आदिवासींच्या खात्यावर आहे. आतापर्यंत इतरांच्या तत्त्वज्ञानाचा अनुभव त्यांनी घेतला आहे. व त्यांना त्यांच्या सांस्कृतिक ओळखीच्या उगमाकडे वाटचाल केल्याशिवाय पर्याय नाही. त्यासाठी सांस्कृतिक आक्रमण व वर्चस्वातून आदिवासी संस्कृती नष्ट करण्याच्या प्रयत्नात असलेल्या उघड अथवा गुप्त शक्तींची ओळख होणे आवश्यक आहे. शतकानुशतके ज्या शक्ती आदिवासी हा पूर्ण विकसित मानव आहे असे न मानता त्यांनी निर्माण केलेल्या साच्यात ओतून निर्जीव करण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यांचेपासून आदिवासी सावध होत आहेत. ही सर्वात महत्त्वाची घटना आहे. सामाजिक व ऐतिहासिक पृथ:करणाने त्या शक्तीची ओळख करून घेण्याचा प्रयत्न चालू आहे., त्यात जागृती व पुनर्जागृतीची कठोर साधना आवश्यक आहे.

एकमेकांच्या जीवन पद्धतीबद्दल आदर, आपसात सहकार्य व सहअस्तित्व ही आदिवासींची पद्धत आहे. त्याला छेद देणारी कोणतीही पद्धत आदिवासींना परवडणारी नाही. सांस्कृतिक एकतेची ऐतिहासिक जाणिवेवर एकता आधारलेली असते. आणि जर आपली ओळख टिकवायची असेल तर प्रत्येक प्रकारच्या अधिकारशाही, सत्तेचे केंद्रीकरण, सांस्कृतिक वर्चस्व आणि साचेबंद आर्थिक नियोजन याविरुद्ध तोंड द्यावे लागेल.

आदिवासी बाबत भारत सरकारचा नकारात्मक दृष्टिकोन असला तरी ढेबर कमिशनने व्याख्या करताना आंतरराष्ट्रीय श्रमिक संघाने अनुसूचित जमातींनाच आदिवासी म्हटले आहे. असे स्पष्ट केले आहे. जागतिक बँकेने भारताच्या संदर्भात अनुसूचित जमातीचा आदिवासी लोक असाच अर्थ ध्वनीत होतो अशी मान्यता दिली आहे. आंतरराष्ट्रीय श्रमीक संघाने १९५७ साली आदिवासींच्या सुरक्षिततेचा दस्तऐवज १०७-वर भारताने १९५८ साली २७ मान्यता देणाऱ्या देशाबरोबर प्रथम सही केली आहे. त्याची अंमलबजावणी - जून १९५९ पासून होणार होती. हे विशेष लक्षात ठेवण्यासारखे आहे.

आंतरराष्ट्रीय श्रमीक संघाने जो १९८९ मध्ये ठराव केला तो दस्तऐवज नं. १६९ वर सही

करण्याचे नाकारले आहे. तो ठराव सांस्कृतिक नैसर्गिक साधने व सामुहिक ओळख असे हक्क आदिवासींना देतो.

भारतातील अस्तित्व न मानण्यामागे जागतिक आदिवासी हक्कांचा जाहीरनामा मान्य करावा लागू नये हा उद्देश स्पष्ट होतो. यालाच अनुसूचित जाती जनजाती आयोगाने आपल्या २९ व्या अभिप्रायमध्ये 'घटनात्मक संकट' म्हटले आहे.

आदिवासींना आपली सुरक्षितता धोक्यात आहे असे वाटते. त्यांची निर्माण शक्ती उपभोगाला आणता येत नाही व भविष्य बनविण्यात अडथळे येतात. आदिवासी संस्कृतीत पुरोगामी प्रणाली, राष्ट्राचा गौरव वाढविण्याची बीजे आहेत, नव्हे त्यांच्या मार्गदर्शक शक्तीनुसार संधी मिळाली तर संपूर्ण देशाच्या सांस्कृतिक रचनेसाठी एक नमुना ठरू शकतो.

जगातील आदिवासींपैकी २३ टक्के आदिवासी भारतात आहेत. व भारतातील ६ करोड आदिवासींची संयुक्त राष्ट्रसंघात नोंद आहे. भारतात ७ टक्के आदिवासी लोकसंख्या असली तरी २० टक्के जमिनीवर त्यांचा हक्क आहे. परंतु कायदा करून ४० ते ८० टक्के आदिवासींची मान्यता काढून घेणेत आली. ४० ते ५० लाख बेकायदेशीर अतिक्रमणे ठरवून असहाय्य केले गेले. ८५ टक्के लोक दारिद्र्यरेषेखाली जीवन जगत आहेत. आज जंगल जमीन ही आदिवासींच्या भविष्याचा विचार करता उद्योग धंद्यांना कच्चा माल उत्पादनाचे साधन मानले जाते व उत्पादनाच्या साधनापासून वंचित करून दारिद्र्यात ढकलले जात आहे. जास्तीत जास्त आदिवासी विस्थापित होत आहेत. जमिनीचा कायदा झाला अंमलबजावणी अभावी कायदा पुस्तकातच राहिला व अनेक प्रकारे आदिवासींना हद्दीकडे काढले जात आहे.

आदिवासी आपल्या मानवी हक्कासाठी झगडत आहेत. त्यांच्या परंपरागत वहिवाटी हक्कासाठी त्यांची मागणी आहे. पिढ्यान्‌पिढ्या उपभोगात असलेली जीवन जगण्याची आदिवासींची साधने सार्वजनिक मालकीची कशी? मनाई तहकुबी, पुनरावलोकन, हक्क नोंदीत बदल, मजूर कायद्याचे उल्लंघन या सर्व पद्धतींचा उपयोग आदिवासींना वंचित ठेवण्यासाठी केला जात असता आदिवासी ताठपणे मानवी प्रतिष्ठेचे जीवन जगू शकत नाही. याचा गैरफायदा घेण्यासाठी सर्व टपलेले आहेत.

या सर्व भूतकाळातील गोष्टी वर्तमानस्थिती विचारात घेऊन आदिवासीला भविष्याला सामोरे जाण्यासाठी समर्पण भावनेने पुढे जावे लागणार आहे. तत्पूर्वी अडचण किंवा आर्थिक प्रश्नांची सोडवणूक म्हणजे विकास म्हणता येणार नाही. राजकीय प्रक्रियेचा दिशाहीन भोवऱ्यात सापडलेला आदिवासी सर्व आदिवासींची दिशा चुकवू शकतो. आज भ्रष्टाचार हा शिष्टाचार झाला आहे. पैसा शक्ती अधिकार याचा दूर उपयोग ही सत्तेवर राहण्याची किंवा सत्ता बळकाविण्याची तात्त्विक भूमिका आहे.

आदिवासींनी प्रथम सामाजिक सांस्कृतिक वर्चस्व झुगारले पाहिजे आणि कोणत्याही प्रकारे वर्चस्ववादी सत्तापिपासु राजकारणी लोकांच्या साठमारीला बळी पडता कामा नये. म्हणून आदिवासी एकता परिषदेच्या दिशा ठरवताना सामाजिक, सांस्कृतिक, बौद्धीक व राजकीय वर्चस्व गाजवणाऱ्यांना त्यांचे ठिकाण दाखविण्यासाठी तत्पर राहून आदिवासींचे मानव म्हणून नागरीक म्हणून व्यक्तीगत व सामुहिक हक्क पदरी पाडण्यासाठी, गाव पातळीपासून सुरुवात केली पाहिजे. आणि पाळी आलीच तर असहकार, प्रतिकार आणि संघर्ष या तिन्ही मार्गांचा अवलंब करावा लागेल. कोणत्या वेळी कोणता मार्ग स्वीकारावा हे परिस्थितीवर अवलंबून राहील, परंतु प्रबोधन सातत्याने व्हावे, जेणे करून दिशा चुकविणाऱ्यांना संधी मिळू नये.

# आदिवासी आत्मसन्मानाची चळवळ : एक आढावा व अपेक्षा

**बळवंत वळवी**

पुरातन काळापासून आदिवासी समाजावर पुढारलेल्या समाजाकडून अत्याचार होत आले आहेत. मोहेंजोदाडो आणि हडप्पा येथील उत्खननात सापडलेले अवशेष हे उच्च संस्कृतीप्रत पोहोचलेल्या आदिवासी समाजाच्या जीवनमूल्यांचे प्रतीक होते. पुढे आर्य आले त्यावेळीदेखील आदिवासींची संस्कृती आणि जीवनमान उंचावलेले होते. आर्य-अनार्यांच्या लढ्यामुळे भोळ्या-भाबड्या व पापभिरू आदिवासींचा पराजय झाला. त्यांना घरदार सोडून परागंदा व्हावे लागले. जंगलाचा आसरा घ्यावा लागला.

पुढे वैदिक काळात ब्राह्मणी संस्कृतीचे वर्चस्व प्रस्थापित होऊन चातुर्वर्ण्य पद्धती अस्तित्वात आली. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य आणि शूद्र या वर्ण पद्धतीची मनु-संस्कृती अस्तित्वात आली. या काळात आदिवासींच्या वाट्याला जे शूद्र अभद्र आणि किळसवाणे जीवन आले ते दैवदत्त आहे आणि तेच एकमेव आहे, त्याला पर्याय नाही, उच्च समाज सांगेल तेच जीवनकर्तव्य आहे, अशी आदिवासींची धारणा झाली. त्या मनोभूमिकेतून आदिवासी आजपर्यंत मुक्त झालेला नाही. शिकलेला असो वा अशिक्षित. सहनशीलता, स्थितीशीलता हेच त्यांचे गुण आणि या चौकटीतच त्याचा जीवनक्रम! नवे जग असावे, नव्या सुधारणा व्हाव्यात असे ज्याला वाटले तो तथाकथित सुधारलेल्या समाजाच्या दृष्टीने शहाणा किंवा दीडशहाणा! अशा शहाण्या लोकांची ही 'आदिवासी आत्मसन्मानाची चळवळ' असे आपण म्हणू या.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आदिवासी आणि मागासवर्गीयांच्या उद्धारासाठी काही घटनात्मक अधिकार दिले. हळूहळू आदिवासींना आत्मसन्मान कळू लागला. तशा चळवळी सुरू झाल्या, भूमीहीनांचा संघर्ष, किमान वेतन (मजुरी) संघर्ष, धरणग्रस्तांचा संघर्ष आणि या सर्वांतून प्रेरित होणारी आदिवासींची आत्मसन्मानाची चळवळ! या चळवळीमध्ये आदिवासी, तसेच बिगर आदिवासी कार्यकर्तेही आहेत. ब्राह्मण आहेत, मराठा आहेत, कोळी-माळी सर्वच आहेत. ही चळवळ देशव्यापी बनवायची आहे. या चळवळीत बिगर आदिवासी कार्यकर्त्यांचा सहभाग हा एक अत्यंत महत्त्वाचा विषय आहे.

याबाबत आदिवासी कार्यकर्त्यांमध्ये दोन विचारप्रवाह असण्याची शक्यता आहे. आदिवासी मुक्ती लढा ही एक सामूहिक चळवळ आहे. त्यामुळे चळवळीला सर्वसमावेशक व व्यापक स्वरूप असावे, की आदिवासी कार्यकर्त्यांनीच ही चळवळ पुढे चालवावी? सामूहिकरीत्या लढले जाणाऱ्या चळवळीत यशाचे नेमके श्रेय कोणाला मिळते? अथवा कोणाला दिले जावे, असा एक मुद्दा उपस्थित होऊ शकतो. श्रेय-अश्रेय हा मुद्दा वेगळा ठेवून चळवळीने सामूहिकरीत्या अंतिम ध्येयाकडे वाटचाल करावी काय, असाही एक विचार असू शकतो.

आतापर्यंतच्या आदिवासी चळवळीकडे दृष्टी टाकली तर असे दिसते, की या चळवळीत बिगर आदिवासी कार्यकर्त्यांचा मोठा सहभाग राहिला आहे. धुळे जिल्ह्यातील या चळवळीकडे बघितले तर असे दिसते, की १९७३-७४ च्या दरम्यान

श्रमिक संघटनांनी मंत्रालयावर काढलेल्या प्रचंड मोर्च्यामुळे राज्य शासनाने पुढे कमाल जमीन धारणा कायदा करून हजारो भूमिहीन आदिवासींना त्यांच्या गेलेल्या जमिनी परत मिळवून दिल्या. या यशात बिगर आदिवासी कार्यकर्तेही मोठ्या संख्येने सहभागी होते. ज्येष्ठ विचारवंत शरद पाटील यांनी साक्रीत आणि कुमार शिराळकर यांनी त्यांच्या इतर सहकाऱ्यांसह प्रचंड कष्ट उपसले आहेत. डॉ. बाबा आमटेंनी भामरागड परिसरात महारोगी आणि आदिवासींसाठी केलेल्या कार्याला तोड नाही. ठाण्यात गोदूताई परुळेकरांनी जशी जागृती केली तशी खान्देशात ठक्करबाप्पा, बाळूभाई मेहता आणि आचार्य भिसे यांनी शैक्षणिक चळवळीतून आदिवासीमध्ये जागृती केली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलित होते. आदिवासी नव्हते. परंतु त्यांच्यामुळेच आपण आज चळवळीसाठी लिहू बोलू शकतो. धुळ्यात बोराडी-रोहिणीसारख्या दुर्गम भागात शिक्षणाच्या सोयी करून कर्मवीर व्यंकटराव रणधीर यांनी मोलाचे कार्य केल्याने आदिवासी तरुण पुढे गेले आहेत. व्यापक विचार केला तर ही यादी मोठी होईल.

अगदी आताचाच विचार केला, तर नर्मदा सागर धरणामुळे सर्वस्वी उद्ध्वस्त झालेल्या महाराष्ट्र, गुजरात आणि मध्य प्रदेशातील असहाय्य आदिवासी जनतेची गाऱ्हाणी शासन दरबारी व जगाच्या वेशीवर टांगण्यासाठी श्रीमती मेधा पाटकरांनी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. या चळवळीला यश किती मिळाले हा मुद्दा गौण असून, पाटकर व त्यांच्या सहकाऱ्यांनी थोड्याफार प्रमाणात आदिवासींचे पुनर्वसन घडवून आणण्यात शासनाला भाग पाडले आणि भारतीय आदिवासी समस्या व पर्यावरणाच्या प्रश्नाला जागतिक पातळीवर नेले.

बहुतेक राजकीय पक्ष आदिवासींचा राजकारणासाठी वापर करतात. आदिवासींच्या आत्मसन्मानाच्या लढ्यामध्ये असे होणार नाही, याची काळजी घ्यावी लागेल. याबाबतीत माझाही अनुभव क्लेशदायकच आहे. आम्ही १९७७-७८ च्या दरम्यान धुळे जिल्ह्यातील पदवीधर आदिवासी कर्मचाऱ्यांना एकत्र करून 'आदिवासी गाईडन्स ब्यूरो' ही संस्था निर्माण करून नोकरी सांभाळून जनजागृतीचे कार्य करीत होतो. परंतु ही संस्था नष्ट होण्यामध्ये एका बिगर आदिवासीचा मेंदू काम करीत होता. त्याने आदिवासी कार्यकर्त्यांमार्फतच हे घडविले. यातील अनेक कर्मचाऱ्यांच्या अल्प काळात दूर-दूर बदल्या झाल्या. मला मात्र त्यावेळी आदिवासी कल्याण खात्याची नोकरी सोडावी लागली. दुसरी नोकरी पत्करल्यानंतर आदिवासींना एकत्र येण्यासाठी काही टक्के धार्मिक व काही टक्के सामाजिक कार्य व्हावे, यासाठी नंदुरबार येथे देवमोगरा देवीचे मंदिर बांधण्यासाठी पुढाकार घेतला. भूमिपूजनाचा कार्यक्रम ज्या कार्यकर्त्याच्या हस्ते पार पडला त्याच्या विरोधातील कार्यकर्त्यांनी लगेच माझी तडकाफडकी बदली केली होती.

नोकरी नसलेल्या आदिवासी युवकांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची! कोणतीही चळवळ पुढे चालवायची तर त्यासाठी आर्थिक पाठबळ पाहिजे. ते नसेल तर आपण पुन्हा मूळ पदावरच येणार. मग हे होणार कसे, हा एक गंभीर प्रश्न आहे. आपल्यामध्ये देखील विचारवंतांची कमतरता आहे. लेखकांची संख्या नगण्य आहे. त्यांच्या भावना, त्यांचा आवाज हे एक प्रकारचे अरण्यरुदन आहे. आदिवासी लेखकाने लिहिलेले वाचणारे किती? ऐकणारे किती? आणि त्यावर विचार करणारे किती? हाही एक प्रश्न आहे. आदिवासी लेखकांचे वाचकही बहुसंख्येने बिगर आदिवासीच असतील. असे असेल तर आदिवासी लेखकांना चळवळीसाठी वैचारिक पार्श्वभूमी कशी काय तयार करता येईल? अशा परिस्थितीत या आदिवासी आत्मसन्मानाच्या चळवळीला एकाचवेळी अनेक आघाड्यांवर लढावे लागेल.

निग्रो चळवळीचा इतिहास पाहिला, तर त्या ठिकाणीदेखील जेम्स वेल्डन, बुकर टी वॉशिंग्टन, रिचर्ड राईट, राल्फ एहिसन, डब्ल्यू. डी. क्लर्क यांच्यासारखे शेकडो लेखक कवी आणि विचारवंत निर्माण झाले आणि यांच्याच जोडीला डॉ. मार्टिन ल्युथर किंग, डॉ. नेल्सन मंडेला यांच्यासारखे असिम त्यागाची तयारी ठेवणारे कार्यकर्ते निर्माण झाले. म्हणून मग असे वाटते -

१) आदिवासी आत्मसन्मानाची चळवळ ही आर्थिक प्रगतीच्या चळवळीशी निगडित असली पाहिजे. या चळवळीचा आर्थिक पाया भक्कम असायला पाहिजे. यासाठी उत्पन्नाचे मार्ग निश्चित केले पाहिजेत. २) नोकऱ्यांशिवाय स्वतंत्रपणे आदिवासी तरुण उद्योग व्यवसाय करू शकेल, असे वातावरण व परिस्थिती निर्माण केली पाहिजे. महाराष्ट्रापुरता विचार केला, तर प्रत्येक आदिवासी तालुक्यातून प्रत्येकी १०० पदवीधरांना एकदम स्वतंत्र उद्योग व्यवसाय मिळवून दिला पाहिजे. या युवकांचा चळवळीशी संबंध असेल असे साधारण एक लाख आदिवासी युवक येत्या पाच-दहा वर्षात स्वतःच्या पायावर उभे राहून चळवळीत प्रत्यक्ष - अप्रत्यक्ष सहभागी होतील. ३) नोकरीतून निवृत्त झालेले आदिवासी अधिकारी कर्मचारी यांनाही या चळवळीत मोठ्या प्रमाणावर सहभागी करून घ्यावे. ४) आर्य येण्यापूर्वी मोहेंजोदाडो - हडप्पा या वैभवशाली संस्कृतीचा मालक आदिवासी होता. मग आज आदिवासी असा का? याचा इतिहास आदिवासींना लेखी स्वरूपात दिला गेला पाहिजे. ५) चळवळीचे म्हणजेच एकूण आदिवासी समाजाचे काय मागणे आहे आणि आदिवासींच्या आशा-आकांक्षा व स्वाभिमानाने जगण्याची इच्छा यांची पूर्ती कशी करता येईल याबाबतचा एक 'आदिवासी जाहीरनामा' तयार करावा लागेल. हा जाहीरनामा सर्व समाजासाठी असल्यामुळे याला सर्व प्रमुख कार्यकर्ते सत्ताधारी, बिगर सत्ताधारी, विरोधी पक्षीय कार्यकर्ते या सर्वांची मान्यता असेल. यासाठी सर्व थरातील सर्व पक्षीय आदिवासी कार्यकर्त्यांची एक परिषद महाराष्ट्राच्या मध्यवर्ती ठिकाणी घ्यावी. पुढे अशी परिषद दरवर्षी घेऊन वर्षभरात झालेल्या कार्याचा आढावा घ्यावा. चळवळीत काही बदल करावेसे वाटल्यास 'आदिवासी जाहीरनाम्यात' तसा बदल करता येईल.

आदिवासी नोकरदार, आमदार, खासदार, मंत्री इतर सुशिक्षित आदिवासी कार्यकर्ते असे सर्वच या चळवळीचे सभासद होतील. चळवळीला आर्थिक पाठबळ देतील व आदिवासी जाहीरनाम्याला प्रामाणिक राहतील. ६) महाराष्ट्रातील आणि देशातील अत्यंत प्रामाणिकपणे कार्य करणाऱ्या व करू इच्छिणाऱ्या आदिवासी कार्यकर्त्यांची यादी व पत्ते मिळवून त्या सर्वांनादेखील वर्षातून एकदा मध्यवर्ती ठिकाणी एकत्रित आणावे. पुढे मग जागतिक आदिवासींसाठी झटणाऱ्या नेत्यांशी संपर्क साधून त्यांनाही चळवळीची माहिती द्यावी आणि कोणी कितीही दावा केला तरी येथील आदिवासींची वास्तव परिस्थिती जागतिक पातळीवर समजावून द्यावी. ७) पुरेशी वैचारिक क्रांती होऊन देशातला आदिवासी संघटित होऊनही त्याची दुरवस्था संपणार नसेल, तर आदिवासी बहुसंख्य असलेल्या भागांचा सलग भूप्रदेशासाठी स्वतंत्र राज्याची उभारणी करण्याची तयारी करावी की काय? या चळवळीजवळचे परंतु अतिशय महत्त्वाचे आदिवासी राज्य मिळविण्यासाठी पायरी - पायरीने शिस्तबद्ध प्रयत्न करावे लागतील. अशी या चळवळीची अपेक्षा अथवा ध्येय आहे काय? राजकीय सत्ता प्राप्त झाल्यानंतर सर्व प्रश्न सुटतील काय? या गोष्टींचा आज नाही तरी उद्या मात्र जरूर विचार व्हावा, अशी या आदिवासी आत्मसन्मानाच्या चळवळीला विनंती.

# आदिवासी आत्मसन्मानाची चळवळ व मानव मुक्ती लढा

ॲड. माधव बंडू मोरे

प्रथम आदिवासी म्हणजे कोण? त्याची निश्चित कल्पना काय? याचा आपण विचार केला पाहिजे. कारण राज्यकर्त्यांनी सोईनुसार कोणत्या मानव समूहाला कोणता शिक्का मारायचा हे ठरवले जाते. ठरवले गेले आहे. त्याचा आत्मसन्मान कसा मारला जाईल? तो स्वतःची ओळख कसा विसरेल? असा विचार करून आपल्या भाषेतील निवडक हीन शब्द वापरून त्या समूहाचा आपल्या वर्चस्व वादासाठी कसा उपयोग होऊ शकतो असाच प्रयत्न होत आला व झाला आहे.

पुराणकाळात भिल्ल, किरात, निषाद वगैरे जमाती व वाली, सुग्रीव ही माकडे होती तर जांबुवंत हा अस्वल होता असे दाखवले आहे. इंग्रजांनी शिरगणतीत १८९१ पासून १९४१ पावेतो पशूपूजक, निसर्गपूजक, पहाडी जमात, जंगली प्राचीन जमात, गुन्हेगार जमात अशी गणना केली आहे. आता वनवासी, गिरीजन असे 'जंगली' साठी पर्यायी शब्द वापरले जातात. याबाबत जगात पर्यायी विचार झाला आहे काय? व झाला असल्यास भारतात वेगळा विचार समर्थनीय ठरू शकतो काय? असे प्रश्न निर्माण होतात.

"वर्ल्ड कौन्सिल ऑफ इंडिजिनस पिपल" या राष्ट्रसंघाने मान्यता दिलेल्या गैरशासकीय संघटनेने भारत सरकारच्या स्थायी शिष्टमंडळास भारतातील आदिवासींच्या प्रश्नाबाबत विचारले असता भारतात आदिवासी शिल्लक नाहीत सांगून जागतिक पातळीवर भारतातील आदिवासींचे अस्तित्व नाकारले. त्या वेळी "इंडियन कौन्सिल ऑफ इंडिजिनस ट्रायबल पिपल" या भारतातील आदिवासींच्या प्रतिनिधीक संस्थेच्या वतीने प्रो. किस्क, डॉ. निर्मल मिज व आसामचे सभर ब्रह्म चौधरी यांनी जिन्हेवा येथे जाऊन भारतातील आदिवासींच्या अस्तित्वाची जाणीव राष्ट्रसंघाला करून दिली. ही घटना ३ ते ७ ऑगस्ट १९८७ मधील आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यकारी गटाने, सर्वसामान्य व्याख्या नसली तरी सात सभातून आदिवासी प्रतिनिधींच्या उपस्थितीत चार मुख्य लक्षणे निश्चित करून मान्य केली.

१) कोणताही दुसरा मानवसमूह एखाद्या देशात विभागात किंवा क्षेत्रात येण्यापूर्वी त्या ठिकाणी वस्ती करून असलेला

२) सजीव सृष्टीशी एकरूप वेगळी संस्कृती असलेला

३) वर्चस्ववादी नसलेला

४) स्वतःला आदिवासी म्हणून ओळखणारा समूह व त्यांचे वंशज यात जुलूम, छळ, शोषणाचे बळी असलेल्या लोकांचा समावेश आहे.

अशा लोकांच्या आत्मसन्मानाच्या चळवळीचा विचार करावयाचा आहे. चळवळीची सुद्धा तज्ज्ञ लोक "प्रस्थापित संबंध, संस्था, मूल्ये, प्रमाण यात बदल घडवून आणण्यासाठी समर्पित भावनेने चालवलेला संघटीत प्रयत्न" अशी व्याख्या करतात. असा प्रयत्न आदिवासींनी भारतात केला होता काय? असा प्रश्न निर्माण होतो.

संबंध, संस्था, मूल्ये, प्रमाण ही नैसर्गिक गरज असली तरी सत्ता, वर्चस्व, आक्रमण याची निर्मिती आहे. व राज्यकर्त्यांनी सोयीस्कर वाटले तेव्हा त्यात सुधारणा व बदल करण्याचा प्रयत्न झाला आहे. त्यातही वर्चस्व टिकवून ठेवण्याचा हेतू आहेच.

आदिवासी समाज वर्चस्ववादी नाही. जुलूम, जबरदस्ती, दडपण, छळ याचा तो आजही बळी आहे. त्याला राजकीय आर्थिक पद्धतीत सामावून घेण्यात आले नाही व सामाजिक व्यवस्थेत तो एक उपयुक्त अर्ध विकसित मानव प्राणी आहे असेच मानले जाते. म्हणून आदिवासींची चळवळ नजरेत भरण्याइतकी प्रभावी वाटली नाही व इतिहासाने नोंद घेतली नाही तर आश्चर्य वाटण्याचे कारण नाही.

तरी सुद्धा, ॲमेझॉन, फिलीपाईन्स, ब्राझील येथील आदिवासी जमाती सुसंस्कृत करण्याच्या नावाखाली नष्ट करण्यात आल्या. त्यामानाने भारतात एवढे भयानक हीन दर्ज्याचे शोषण दडपण, सांस्कृतिक आक्रमण यातून भाषा, संस्कृती, जीवनपद्धती, कला, संगीत, नृत्ये, रीती रिवाज टिकवून ठेवले. आदिवासी समाजाचे भारतात अस्तित्व कायम राहिले यामागे त्यांच्या पूर्वजांचा मूकसंघर्ष कारणीभूत आहे. ही स्वाभिमानाची चळवळ खास म्हणावी लागेल.

ज्या ज्या वेळी आदिवासींच्या नैसर्गिक स्वातंत्र्यावर बंधने आली, जीवन पद्धतीवर आघात झाला, अपमानित जीवन लादण्यासाठी जुलूम जबरदस्ती झाली, त्या त्या वेळी आदिवासींनी भारतभर बंडखोरी करून राज्यकर्ते व त्यांचे दलाल यांचा घातकी प्रयत्न हाणून पाडला.

मध्य भारतात इंदूर ते नांदूर, बागलान ते बऱ्हाणपूर, श्रीरामपूर ते सुलतानपूर या भागात १८१८ ते १८५८ पावेतो सतत सशस्त्र लढा ४० वर्षे चालू ठेवला. सातपुड्यातील अंबापाणी येथे जुलमी सत्ते विरुद्ध सशस्त्र लढ्यात ५७ आदिवासी अटकेत असता त्यांनी बंदुकीच्या गोळ्या झेलून स्वातंत्र्यासाठी बलिदानाच्या परंपरेत मान मिळवला, त्यावेळी स्त्रियाही मागे नव्हत्या. ४०० स्त्रियांना अटक झाल्याची सरकारी पत्रकात नोंद आहे. ११ एप्रिल १८५८ हा आदिवासींच्या स्वातंत्र्य लढ्याचा व बलिदानाचा दिवस. आदिवासींची आत्मसन्मानाची चळवळ आणखी वेगळी कोणती असू शकेल! खाज्या, भीमा, तंट्या, भागोजी वगैरे वीरांनी या मोहिमेचे नेतृत्व केले. हा आदिवासीचा संघटित लढा होता व आदिवासींचे एकरूप अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी त्याचा उपयोग झाला आहे. इतिहासात नोंद नसली तरी सरकारी पत्रकात दखल घेण्यात आली आहे. शिवाय आदिवासींना स्वाभिमान वाटावा अशा गोष्टी पुढे आणल्या गेल्या नाहीत याला दोष म्हणून उपयोगाचे नाही. आजही अंबापाणीचा परिसर व भागोजी नाईकला पकडून आणण्याचा विडा उचलणाऱ्या कॅप्टन हेन्रिचे, नांदूर शइंगोटीच्या जंगलातील स्मारक आदिवासींच्या स्वाभिमानाच्या चळवळीचा पुरावा देत आहेत.

अशाच प्रकारे मुर्शिदाबाद, कासीम बाजार, मालदा, हुगळी या भागात बागदी-आदिवासींनी तसेच मिदनापूर भागात खेरा, माझी चुवाड या आदिवासींनी जुलूम शोषणा विरुद्ध १६१६ ते १७६७ पावेतो मोगल बादशहा, ईस्ट इंडिया कंपनीचे दलाल, जमीनदार यांना वठणीवर आणण्यासाठी संघटित लढा पुकारला. जे.सी.प्राईज या इंग्रज इसमाने "मिदनापूरचा कोणताही भाग आदिवासी बंडखोरी पासून वाचला नाही." असे लिहून ठेवले आहे. सिंहभूम चाईबासा या भागात १८२३ ते २७ या काळात मेजर रफरेज याने आदिवासींनी आपल्या मताप्रमाणे वागावे म्हणून दबाव आणण्याचा प्रयत्न केला. त्याला झालेल्या

संघटीत प्रतिकारामुळे मुण्डा मानकी यांच्या प्रथा व स्वाशासनाला मान्यता देणे भाग पडले.

संथाल परगणा गॅझेटीअर मध्ये स्वयंस्वाधीन संथाल परगणा स्थापन करण्याची मागणी आहे. संथालच्या कलकत्ता अभियानात १२०० अधिकारी बेपत्ता झाल्याची नोंद आहे. १८५५ ते १८५७ या काळात सशस्त्र लढे चालले. २६१ लोकांना पकडण्यात आले त्यात ४६ दहा वर्षांचे आतील होते. संथाल परगणा व छोटा नागपूर कुळकायदा करायला भाग पाडलेली ही चळवळ होती व ती कोणत्याही राजकीय सत्तेसाठी नव्हती तर स्वातंत्र्यासाठीच होती. कोणत्याही ऐतिहासिक लढ्यात वेगळी नोंद नसली तरी आदिवासी समाजाने महाराणा प्रताप, शिवाजी महाराज यांच्या ऐतिहासिक कामगिरीत आपले योगदान दिले आहे व त्याबद्दल सुद्धा आदिवासींनी अभिमान बाळगायला हरकत नाही. आदिवासी कोणालाही परका मानत नाहीत. मेजर हसलवूड पोलीस सुपरिन्टेडेंट याने खानदेशाच्या कलेक्टरला लिहिलेल्या ता. ५ मे १८५८ च्या पत्रात तो म्हणतो "जंगली पण लढावू, परंपरागत स्वातंत्र्य जपणारे, संशयी, रागीटपणे उदार माणुसकी असलेल्या लोकांनी, ताब्यात सापडलेल्या स्त्रिया व मुले यांच्या रक्ताने कधीही हात माखले नाहीत."

मानव मुक्तिलढ्याच्या संदर्भात परक्याने व्यक्त केलेले मत आदिवासींची मानवता व नैतिकता स्पष्ट करते. परंतु स्वातंत्र्योत्तर काळात शोषित, वंचित उपेक्षीत ठरलेला आदिवासी अस्मितेचा शोध घेऊ लागला. आपली फसवणूक होत आहे असे त्यास वाटून इतिहासात प्रेरणा शोधत आहे.

धुळे जिल्ह्यात गुलाम महाराज, रामदास महाराज यांनी जागृती व संघटित प्रयत्नातून उभी केलेली चळवळ, बिहारमध्ये बिरसामुंडा यांनी सुरू केलेली कायदेभंगाची, शोषण मुक्त समाजासाठी, सशस्त्र चळवळ याबद्दल स्वाभिमान वाटला तर नवल नाही. स्वातंत्र्याच्या काळात नगर, नाशिक, धुळे, जिल्ह्यातून दादासाहेब सौदाणे यांनी जागृती निर्माण केली व जगण्याच्या हक्कासाठी संघटित प्रयत्न केला. अंबरसिंग महाराज यांची सामाजिक न्यायासाठी उभी केलेली चळवळ थंड दिसत असली तरी निखारे जिवंत आहेत.

आज भारतभर आदिवासींच्या चळवळी चालू आहेत. त्यात झारखंड, बोडोलँड, नर्मदा बचाव आंदोलन तसेच ठाणे जिल्ह्यात किसानसभा, भूमिसेना, कष्टकरी संघटना, क्रांतीसेना, ग्रामस्वराज्य समिती तसेच धुळे जिल्ह्यात श्रमिक संघटना, ग्रामस्वराज्य समिती, मजूरसंघर्ष वाहिनी यांच्या माध्यमातून तयार झालेले आदिवासी कार्यकर्ते सतर्क व अनुभवी झाले आहेत.

स्वातंत्र्यानंतरच्या सर्व चळवळी जंगल, जमीन, मजुरी, शोषण सारख्या आर्थिक प्रश्नांवर चालू राहिल्या. परंतु आदिवासींचा आर्थिक प्रश्न हा सामाजिक, सांस्कृतिक वर्चस्वातून निर्माण झाला आहे, असे ठामपणे वाटते. समानता हे आदिवासी अस्मितेचे महत्त्वाचे अंग असून जिवंत वास्तवता आहे.

मानव मुक्ती लढ्याचा विचार करत असता असा लढा कोणत्या कारणाने लढण्याची गरज भासत आहे. ती सर्व कारणे विचारात घेतली पाहिजेत. आदिवासी समाजाला याची पूर्ण जाणीव आहे की मानव मुक्तिलढा एकाकी लढता येणार नाही. तसेच एकाच देशात लढा उभा करून मानवमुक्ती साधणार नाही. आंतरराष्ट्रीय सुपर औद्योगिक विकास, प्रचार व प्रसार माध्यमांत झालेला बदल व दळणवळणाची साधणे यामुळे कोणता देश अलिप्त राहू शकेल? आणि नेमके याच वेळी संयुक्त राष्ट्रसंघाने जागतिक आदिवासींच्या हक्काचा जाहीरनामा प्रसिद्ध करून १० डिसेंबर १९९२ ते १० डिसेंबर १९९३ पावेतो आदिवासी वर्ष साजरे होत आहे.

असे असताना भारतातील आदिवासी आदिम जमातीत मोडत नाहीत असे जगापुढे जाहिररीत्या भारतातील सरकारने आदिवासींचे अस्तित्व नाकारून पर्यायाने भविष्य ठरविण्याचा अधिकार नाकारला आहे. याला सर्व सहमत आहेत असे मानावे काय? हा प्रश्न मानव मुक्ति लढ्याचा भाग नाही काय? जगभर आदिवासींच्या चळवळी चालू असता भारतातील आदिवासींनी अलिप्त राहावे काय? असे प्रश्न उभे राहतात. यांची उत्तरे शोधली पाहिजेत. आज आदिवासींचा भ्रम निरास झाला आहे. सरंजामशाही, साम्राज्यशाही, वसाहतवाद याविरुद्ध बंड पुकारणारा आदिवासी आज देशी वसाहतवादाचा बळी ठरला आहे. परंपरागत जगण्याचे साधन जंगल यावर शासकीय जमीनदारी प्रस्थापित झाली, विकासाच्या नावाखाली विस्थापन, रोजगाराच्या नावाखाली वेठ बिगारी व सुधारणेच्या नावाखाली मानसिक गुलामगिरी लादली जात आहे व आंदोलन चळवळ एवढाच प्रभावी मार्ग आहे असा समज सरकारने पक्का केला आहे.

शोषण मुक्ती, न्याय, हक्क परंपरागत स्वातंत्र्य यासाठी निरनिराळ्या संघटनांच्या माध्यमातून तयार झालेला आदिवासी, राजकीय प्रतिष्ठा, आर्थिक समता व सामाजिक न्याय यासाठी आदिवासी एकता परिषद या माध्यमातून आपली अस्मिता व अस्तित्व विचारात घेऊन मानव मुक्ति लढ्याला साथ देण्यासाठी व स्वतःचे सर्व प्रकारच्या शोषणापासून संरक्षण करण्यासाठी एकत्र येत आहे. यात शंका घेण्यास कारण नाही.

## वर्गणीदारांस सूचना

**ज्यांची वर्गणीची मुदत संपली आहे, त्यांनी पुढील वर्षासाठीची वार्षिक वर्गणी रु. ५०/- फक्त त्वरित पाठवावी, ही विनंती.**

***– संपादक***

## लेखकांसाठी

**'हाकारा' हे आदिवासी प्रश्नांना वाहिलेले एकमेव मराठी नियतकालिक आहे. यातून आदिवासी जीवन, संस्कृती, साहित्य, सण, उत्सव, कला, तसेच आदिवासी कार्यकर्ते व आदिवासींमध्ये काम करणाऱ्या कार्यकर्त्यांचे अनुभव, काही सेवाभावी व्यक्तींची व्यक्तीचित्रणे याशिवाय आदिवासी जीवनासंबंधीच्या कथा, कविता इत्यादी सर्व प्रकारच्या लेखनास प्रसिद्धी दिली जाईल. आपण आपले साहित्य नियमित पाठवीत जावे.**

***– संपादक***

# 'आदिवासी एकता परिषद' शोध आणि बोध

**प्रा. पुष्पा गावित**

आदिवासींच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक प्रश्नांबाबत व्यापक भूमिकेतून संघर्ष करण्यासाठी आणि लढा देण्याच्या उद्देशाने या आदिवासी एकता परिषदेची स्थापना झाली आहे. अखिल महाराष्ट्रातील आदिवासी समाजातील कार्यकर्त्यांनी एकाच व्यासपीठावरून विचार विनिमय करण्यास सुरुवात केली ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. त्याचबरोबर त्यांनी आदिवासी एकता परिषदेला राजकीय स्वरूप न देण्याचा घेतलेला निर्णयही कौतुकास्पद आहे.

आज बदलत्या परिस्थिती बरोबर आदिवासी समाजही बदलत आहे ही अत्यंत चांगली गोष्ट आहे. पण त्याबरोबर आपल्या संस्कृतीलाही मागे लोटत आहे. आपला विकास करण्याच्या प्रयत्नात आदिवासी बांधव असतानाच काही नवशिक्षितांच्या असे लक्षात आले की, आपण आपल्या संस्कृतीचं जतन आणि संवर्धन केलं पाहिजे. आपला इतिहास तो आपल्यापासून अंधारात आहे, आपल्याला अज्ञात आहे, त्याचा शोध आपणच घेतला पाहिजे. ह्या अफाट भूमीवर आदिवासींना तर मूळ रहिवासी आहे असे मानले जाते, तर आपला इतिहास कुठेच कसा वाचण्यात येत नाही? शिकण्यात किंवा शिकवण्यात त्यांचा उल्लेख नसतो. आता आपणच आपल्या संस्कृतीची आणि इतिहासाची ओळख जगाला करून द्यावी ह्या सद्हेतूने या आदिवासी एकता परिषदेची स्थापना करण्यात आली आहे.

मुळातच आदिवासी समाज हा अत्यंत लाजरा बुजरा अबोल. आपल्यापेक्षा वेगळ्या वेषातली व्यक्ती दिसली तरी घाबरून लपत राहणारा हा आदिवासी बांधव आता कुठे बोलू लागला आहे. ह्या गुण्यानायकाला आत्ताच वाचा फुटली आहे. दऱ्या खोऱ्यात राहणाऱ्या सातपुड्याच्या, सह्याद्रीच्या पायथ्याशी, कुशीत वसणाऱ्या ह्या आदिवासींनाही आता दळणवळणाच्या सोयीमुळे शिक्षणाची ज्ञानाची दारे खुली झाली आहेत. मागच्या पिढीपेक्षा आताच्या पिढीला आपल्यातल्या उणिवा जाणवू लागल्या आहेत. इतरांपेक्षा आपण वेगळे का आहोत? प्रस्थापित समाज आपल्याला का हिणावतो? कमी लेखतो? हे प्रश्न तो त्याच्याच मनाला करू लागला आहे. ह्या स्वतंत्र भारताने स्वातंत्र्य, समता, बंधुता हा त्रिसूत्री पुरस्कार सगळ्यांच्या समानतेसाठी केल्यानंतरही आपण असे मागासलेले, आदिवासी म्हणून मागे का पडलो? आपण कुठे कमी पडलो आहोत? ह्या समविचाराने आणि समदुःखाने ग्रासलेल्या कार्यकर्त्यांनी जे विविध स्तरावर कार्य करीत आहेत अशांनी एकत्र येऊन हे एक व्यासपीठ निर्माण केले आणि त्याला सार्थ असे 'आदिवासी एकता परिषद' हे नाव दिले.

पूर्णपणे राजकारणापासून आणि राजकीय प्रभावापासून अलिप्त राहण्याचे, तटस्थ वृत्तीने संघर्ष करण्याचे या परिषदेतील कार्यकर्त्यांनी एकमताने आणि एक दिलाने मान्य केले आहे. आपले प्रश्न आपणच मांडायचे, संघर्ष आपणच करायचा आपला मार्ग आपणच शोधायचा निर्णय ह्या एकता परिषदेतील कार्यकर्त्यांनी घेतला आहे. आरंभ त्यांना आपल्याच समान बांधवाबरोबरच्या संघर्षाने करावा लागेल आणि ते अटळ आहे. जे नोकरी व्यवसायानिमित्त आज शिक्षणाने प्रभावित होऊन शहरात वास्तव्याला आहेत त्यांना आपल्या संस्कृतीची, इतिहासाची लाज वाटते. त्यांचे प्रथम

प्रबोधन करावे लागेल. त्यांच्यातील स्वाभिमान जागृत करावा लागेल आणि त्यांना घेऊनच पुढे पाऊल टाकावे लागेल.

आज आदिवासी समाज जो बदलत्या परिस्थितीनुसार परिवर्तन स्वीकारीत आहे पण आपली संस्कृतीही विस्मृतीच्या गर्तेत लोटत आहे. अशा समाजबांधवांना खरोखर एकत्र आणण्याची गरज आहे आणि ते कार्य या परिषदेमार्फत केले जात आहे. आज आदिवासी बांधव राजकीय, शैक्षणिक, आर्थिक, सामाजिक सर्व क्षेत्रात शासनाच्या सोयी सवलतींच्या कुबड्या घेऊन पुढे जात आहे. तितक्याच किंबहुना त्यापेक्षा दुप्पट जेट वेगाने तो खाली आपटतो. असे का होते? याचाही शोध घेणे महत्त्वाचे ठरेल. नोकरी व्यवसायाच्या निमित्ताने बाहेर पडणारा आदिवासी बांधव प्रस्थापित समाजाशी जुळवून घेऊ शकत नाही आणि आपल्या समाजातील जात बांधव, संस्कृती त्याला नकोशी वाटते. त्यामुळे त्याची परिस्थिती त्रिशंकू सारखी होते. त्यांच्यातील स्वाभिमान जागृत करून त्यांचे प्रबोधन करण्याचे महत्त्वाचे कार्य या आदिवासी एकता परिषदेच्या माध्यमातून प्रामुख्याने केले जावे.

आदिवासी एकता परिषद ज्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक व सांस्कृतिक प्रश्नांच्या व्यापक भूमिकेतून स्थापन झाली आहे त्यासाठी प्रथम त्यांना ह्या सुशिक्षीत पिढीला आपल्या संस्कृतीची ओळख करून द्यावी लागेल. आदिवासी संस्कृती निसर्गपूजक आहे. आदिवासी संस्कृतीत स्त्रीला अत्यंत महत्त्वाचे आणि मानाचे स्थान असते हे आदिवासी समाजबांधवांनी अत्यंत गौरवाने आणि अभिमानाने सांगितले पाहिजे. प्रस्थापित समाजात हुंड्यापायी अनेक मुली, माता, भगिनी जाळल्याच्या आणि त्यांनी छळाला कंटाळून आत्महत्या केल्याचे वृत्तपत्रातून आपण वाचत असतो. आमच्या आदिवासी समाजात असे घडत नाही. घरातली स्त्री खऱ्या अर्थाने अर्धांगी असते. घरात-बाहेर ती पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करीत असते. आदिवासी संस्कृतीत खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता असते. याची जाणीव प्रस्थापित समाजाला करून दिली पाहिजे. आदिवासी बांधव स्वतःला इतरांपेक्षा हीन समजून घेतो, तो बोलण्याचेही धाडस करीत नाही. आपल्या संस्कृतीची तो कशी ओळख करून देईल. यामुळेच आपल्या संस्कृतीपेक्षा इतरांची संस्कृती श्रेष्ठ आहे, त्यांना इतिहास आहे आपल्याला नाही असा मनोमन समज करून आपल्याला हीन समजून घेतो. ही वृत्ती त्याने आता टाकून दिली पाहिजे. स्वाभिमानाने ताठ उभे राहून आपल्या संस्कृतीची ओळख जगाला करून द्यावी आणि आपल्या इतिहासाचा शोध आपणच घ्यावा. या आदिवासी एकता परिषदेच्या व्यासपीठावर सगळ्यांनी एकत्र यावे. त्याच बरोबर आपली संस्कृती आणि स्वाभिमान ही जागृत ठेवावा. याच भूमिकेतून या परिषदेची स्थापना झाली आहे.

विविध क्षेत्रात वेगवेगळ्या ठिकाणी समाज जागृतीचे कार्य करणारे कार्यकर्ते एकाच समाज जाणिवेने प्रेरित होऊन या आदिवासी एकता परिषदेच्या व्यासपीठावर चर्चा करतात पण यामध्ये आदिवासी सुशिक्षित महिलांचे प्रमाण अत्यंत नगण्य आहे. आदिवासी समाजातील स्त्रियासुद्धा आज नोकरीच्या निमित्ताने शहरात आहेत. त्यांनी आपल्या समाजातील स्त्रियांच्या मनातील लाजरे-बुजरेपण, अबोलवृत्ती घालवण्यासाठी प्रयत्न केला पाहिजे. आदिवासी महिला विकास मंडळे स्थापन करून त्यांना समाज जागृतीसाठी प्रेरित केले पाहिजे. एक सामाजिक बांधिलकी समाज कर्तव्य म्हणून पुढे यायला पाहिजे आणि या आदिवासी एकता परिषदेला सहकार्य केले पाहिजे.

एकीकडे आदिवासी समाजात खऱ्या अर्थाने स्त्री-पुरुष समानता आहे असे म्हणत असताना स्त्रिया या सामाजिक चळवळीत मागे का? एकवेळ

*(पुढील मजकूर पेज नं. ३५ वर)*

# निसर्गपुत्रांची स्वायत्त राज्याकडे ओढ

**श्रावण मोडक**

***आदिवासी एकता परिषदेच्या चार राज्यांतील कार्यकर्त्यांचे शिबिर नुकतेच अंकुशविहीर येथे झाले. त्यात विविध समस्यांवर सांगोपांग चर्चा झाली, त्याचा आढावा.***

अक्कलकुवा तालुक्यातील अंकुशविहीर येथे १५ व १६ जानेवारीला आदिवासी एकता परिषदेचे मोठा प्रतिसाद लाभलेले चार राज्यांतील कार्यकर्ता शिबिर झाले. आदिवासींच्या विविध समस्यांचा मूलभूत पातळीवर विचार करणारे हे शिबिर नव्या जाणीवांची जागृती करणारे ठरले. आदिवासींच्या भौतिक विकासासाठी शासनातर्फे सर्वत्र विविध योजना राबविल्या जातात. पण यंत्रणेतील दोषांमुळे त्यांचा म्हणावा तसा उपयोग झालेला नाही. त्यामुळे आतापर्यंत झालेले आदिवासींचे मेळावे, संमेलन आणि अधिवेशन यात त्याच विषयांवर प्रामुख्याने चर्चा होत असे, अंकुशविहीरचे अधिवेशन त्या दृष्टीने वेगळे ठरले. आदिवासींच्या मूलभूत प्रश्नांवर चर्चा करतानाच चारही राज्यांतील सुमारे तीन हजारांहून अधिक आदिवासी आणि विविध चळवळीतील कार्यकर्त्यांचा त्यादृष्टीने सहभाग मिळविण्याचा प्रयत्न या अधिवेशनात झाला. 'जाणीव जागृती शिबीर' असेच या शिबिराचे नाव होते. शिबिराच्या अखेरीस आदिवासींच्या मूलभूत प्रश्नांवर काही मागण्या करणारे ठराव आणि या ठरावांच्या पूर्ततेसाठी गाववार समित्या स्थापन करून कार्य करण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

आदिवासी एकता परिषदेचे यापूर्वी पुण्यात अधिवेशन झाले; खरे तर त्याचवेळी परिषदेची स्थापना झाली. या परिषदेचे अंकुशविहीरचे अधिवेशन हे मोठे पाऊल होते. यावेळी महाराष्ट्र,

### *नेटके संयोजन :*

दोन दिवस झालेल्या या शिबिराचे नेटके संयोजन कौतुकास्पद ठरले. पहिल्या दिवशी एका सत्रात सुमारे पाच हजार आदिवासींची उपस्थिती होती. अगदी त्यांच्या जेवणापासून कोठेही गोंधळ झाला नाही. अर्थात हा प्रतिसादही संयोजकांना चकीत करणारा ठरला. त्यांच्या एकूण संयोजनात तसे कोठेही जाणवले नाही. मात्र बोलण्यात ती बाब स्पष्ट होत होती. विशेष म्हणजे शिबिरात पंचवीस माणसे बसू शकतील, असे व्यासपीठ असूनही त्यावर एकावेळी एकच व्यक्ती असायची. शिबिराचे अध्यक्ष अथवा इतर प्रमुख पदाधिकारीही खालीच श्रोत्यात बसायचे.

### *ठळक अनुपस्थिती :*

या शिबिरात अनेकांची अनुपस्थिती ठळक होती. संपर्कमंत्री सुरूपसिंग नाईक, खासदार माणिकराव गावीत, बापू चौरे, आमदार दिलवरसिंग पाडवी, प्रताप वळवी, गो. शि. चौधरी, गुजरातचे छोटुभाई वसावे शिबिरात नव्हते. भाजपाचे कुंवरसिंग वळवी आणि परिसरातील प्रमुख कार्यकर्ते होते. पण त्यांनी निरीक्षणाची भूमिका घेतली. नर्मदा बचाव आंदोलनाचे महाराष्ट्रातील कोणीच प्रमुख आदिवासी कार्यकर्ते यावेळी नव्हते. वनवासी कल्याण आश्रमाचे कार्यकर्ते होते. पण बिगर आदिवासींना बोलण्याची संधी नव्हती, असे दिसले.

मध्य प्रदेश, गुजरात आणि राजस्थान या राज्यातील कार्यकर्त्यांना बोलाविण्यात आले होते. विविध चळवळीत काम करणारे आदिवासी कार्यकर्ते इतक्या मोठ्या प्रमाणात जमण्याचा हा धुळे जिल्ह्यातील पहिलाच प्रसंग. या शिबिराच्या अध्यक्षस्थानी गुजरातच्या बेलची भागात आदिवासी क्षेत्रात काम करणारे आणि नवनिर्माण आंदोलनाचे एक प्रमुख अशोक चौधरी होते. गांधीवादी विचारसरणीचे चौधरी, डाव्या विचारांचे म्हणून प्रसिद्ध असलेले कवी वाहरू सोनवणे, पद्माकर वळवी, पूर्वी भारतीय जनता पक्षात असलेले अक्कलकुवा पंचायत समितीचे उपसभापती दरबारसिंग पाडवी, ठाण्याच्या क्षेत्रात कार्यरत असणारे काळुराम धोदडे, शिरपूरच्या मजूर संघर्ष वाहिनीचे रमेश वसावे, सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचे डोंगर बागूल, जनता दलाचे हरिभाऊ महाले, पूर्वीच्या जनता दलाचे आणि आता काँग्रेस (आय) मध्ये असलेले आमदार के. सी. पाडवी, नर्मदा बचाव आंदोलनाचे भद्रा गामीत (गुजरात) आणि शंकर ललवडा (मध्य प्रदेश), राजस्थानचे बेलाराम गोगरा अशा विविध विचारसरणीच्या कार्यकर्त्यांचा त्यात सहभाग होता. त्यांच्यात, तरीही, काही मूलभूत प्रश्नांवर एकमत झाल्याचे शिबिराच्या अखेरीस स्पष्ट होणे आवश्यक आहे. शिबिराच्या प्रास्ताविकातच वाहरू सोनवणे यांनी आदिवासींच्या समस्यांचा उहापोह करताना त्याला माणूस म्हणून वागणूक मिळत नसल्याची तक्रार केली. मात्र त्यांच्या या आक्रमक भाषणात बिगर आदिवासी कार्यकर्त्यांना नाकारण्याचा सूर होता. त्या मानाने अध्यक्ष अशोक चौधरी यांच्या भाषणात संयमी सूर होता. आर्य- अनार्य यातील तफावत मांडत त्यांनी आदिवासी कोण हे सांगितले. निसर्गपुत्र असलेल्या आदिवासींच्या सर्वच समस्या जंगल, जमीन आणि पाणी यांच्याशी निगडित असल्याचे सांगत त्यांनी 'प्रकृती ही परमेश्वर' अशी घोषणा दिली. त्यावरूनच संपूर्ण शिबिराचा नूर स्पष्ट झाला. रमेश वसावे यांनी त्यांच्या भाषणात आदिवासींच्या संस्कृतीची खिल्ली उडविण्याच्या वृत्तीवर टीका केली. भोंगऱ्या या आदिवासींच्या विवाहाच्या सोहळ्यात आदिवासी मुले कोणत्याही मुलींची विवाहासाठी निवड करतात, असे सांगून हसले जाते. पण आजचे वधू-वर मेळावे काय आहेत, असा त्यांचा प्रश्न टाळ्या मिळवून गेला. भिल्लांविषयीच्या अहिराणी भाषेत असलेल्या अपमानास्पद म्हणींचा विरसिंग पावरा यांनी निषेध केला. सांगल्या वळवी यांचे शेरोशायरीयुक्त सूत्रसंचालन सगळ्यांनाच खुलवून गेले.

पहिल्या दिवशीच्या इतर सत्रात आदिवासी लढ्यांचा इतिहास व आजची स्थिती या विषयावर चर्चा झाली. काळुराम धोदडे, भांगा वसावा, मगन तडवी, डोंगर बागूल, वसंत नाईक, माजी गृहराज्यमंत्री रमेश वळवी, आमदार के. सी. पाडवी, मुकुंद चौधरी यांनी त्यात सहभाग घेतला. स्वायत्त आदिवासी राज्याची मागणी वळवी यांनी केली. बागूलांनी शिवाजी महाराजांना पहिल्या सुरत लुटीवेळी डांगच्या राजाने कसे रोखले होते, याचा इतिहास मांडला. धोदडे यांनी आदिवासींच्या अतिक्रमित जमिनींचा आणि जमीन हस्तांतराचा प्रश्न मांडला. आदिवासींना राजकारणात मारुती बनवले जाते, पण राम बनविण्याची तयारी कोणाचीच नाही, अशी टीका त्यांनी केली. पहिल्या रात्रीत विविध भागातून आलेल्या आदिवासींच्या सांस्कृतिक कार्यक्रमांनी सर्वांनाच जागविले. त्यात नाच-गाणी-वाद्ये यांचा समावेश होता. बलसाडहून आलेल्या एका गटाचे नृत्य सुमारे चार हजार रसिक आदिवासींची दाद घेऊन गेले. रायसिंग पाडवी यांची आदिवासीला दैनंदिन व्यवहारात सावकार, पोलिस कसा नागवित असतो, यावरची गीतेही लोकांनी उत्स्फूर्त नृत्य करीत गाजविली. दुसऱ्या दिवशीच्या कार्यक्रमाची सुरुवात चर्चासत्राने झाली. त्यासाठी आदिवासींची

अस्मिता आणि एकतेची गरज असा विषय होता. त्यात हरिभाऊ महाले, बेलाराम गोगरा, मोहन पटेल, शंकर तलवडा, भद्रा गामीत, याकुब तडवी, गीता पागी, ॲड. सोबजी गावीत, रामचंद्र गोसावी, पद्माकर वळवी यांची भाषणे झाली. या सत्रातच पद्माकर वळवी यांनी आदिवासींच्या जंगल, जमीन, पाण्याच्या हक्काच्या प्रश्नाचा उहापोह केला. वनकायदा १९२४ मध्ये झाला. त्यापूर्वीपासून वेगवेगळ्या भागातील जंगलात राहणारे आदिवासी या कायद्यामुळे अतिक्रमणदार ठरविण्याच्या सरकारी धोरणाचा त्यांनी समाचार घेतला. वनात आम्ही उपरे आहोत, तर आम्ही आलो कोठून, हे सरकारने सांगावे, असे त्यांनी सांगितले. टोकरे कोळी ही आदिवासी जमात आज नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. ती शासनाच्या या धोरणामुळेच गेली, असे त्यांनी सांगितले. समारोपाच्या सत्राआधी उशीरा आलेल्या प्रतिनिधींची भाषणे झाली. त्यानंतर दोन दिवसातील चर्चेचा आढावा अशोक चौधरी यांनी घेतला. प्रेम, प्रकृती आणि मानवीय संबंध या तीन बाबी प्रस्थापित होण्यासाठी आदिवासींच्या एकतेची आवश्यकता असल्याचे त्यांनी सांगितले. एकता कशी करावयाची, याचे विवेचन करताना त्यांनी ग्रामसमित्यांची कल्पना मांडली. राजकारणात परिषदेने पडू नये, असे सांगताना ते म्हणाले, दहा हजार वर्षापूर्वीच्या समाजात राज्याची कल्पना नव्हती. पण त्यावेळीही आदिवासींचे संबंध सुरळीत होते. आता राज्य करून नव्या जुलुमाचा प्रारंभ आपल्याला करावयाचा नाही. निसर्ग हीच आदिवासींची जननी आहे. त्याचे संरक्षण करणे, हेच आदिवासींचे ध्येय असणे आवश्यक आहे. वाहरू सोनवणे यांनी अध्यक्षीय समारोपानंतर आक्रमक सूर असलेले टाळ्या घेणारे भाषण केले. आजच्या विकसित समाजावर टीका करताना ते म्हणाले, या समाजाच्या शिक्षण पद्धतीत इंजिनिअर झालेला झाडावर चढू शकणार नाही, पण आदिवासी चढतो. तज्ज्ञ डॉक्टर करू शकणार नाही, असे गर्भावस्थेचे निदान आदिवासी करतो. मग प्रगत समाजाच्या लोकांनी आदिवासीवर जुलूम केला, तर तो सहन का करावा? आदिवासींच्या नावाखाली विविध बिगर आदिवासी संस्था निधी घेतात, त्यावरही त्यांनी टीका केली.

स्वायत्त आदिवासी राज्य आणि आदिवासी चळवळीतून बिगर आदिवासी कार्यकर्त्यांना वजा करण्याची भूमिका, हे या शिबिराच्या निमित्ताने पुढे आलेले दोन महत्त्वाचे मुद्दे आहेत. या मुद्यांचे शिबिराच्या अखेरीस ठरावात रूपांतर झालेले नाही. मात्र त्याचा विचार परिषद्रेने करणे त्याविषयीची भूमिका स्पष्ट करणे आवश्यक आहे. शिबिराचे एक प्रमुख संयोजक वाहरू सोनवणे यांनी त्यांच्या प्रास्ताविक आणि समारोपात आदिवासी चळवळीतील निर्णयशक्ती आदिवासींच्या हातातच असावी, अशी भूमिका मांडली आहे. या भूमिकेमुळेच बिगर आदिवासी कार्यकर्ते या चळवळीतून हद्दपार होण्याचा धोका आहे. तो खुद्द आदिवासी चळवळीला किती परवडणारा आहे, याचा विचार होणे आवश्यक आहे. ही भूमिका टाळ्या मिळविणारी जरूर आहे, वरकरणी पटणारीही आहे. पण तिचा खोलात जाऊन विचार करणे आवश्यक आहे. तसे झाल्यास आजवर आदिवासींच्या चळवळीत जीवन झोकून देणारे कार्यकर्ते त्यांच्या मताला स्थानच नसल्याने चळवळीपासून दूर जातील आणि त्यापेक्षा आजही सत्तास्थानात ठिकठिकाणी आदिवासी आहेतच. त्यामुळे या परिषदेचीही मग गरज आहे का? असा प्रश्न विचारात येऊ शकतो. कारण ही नेते मंडळीच आदिवासींचे बहुतांश प्रश्न सोडवू शकतात आणि न सुटणाऱ्या प्रश्नांवरचे धोरणही ठरवू शकतात. एकूणच आदिवासी-बिगर आदिवासी हा वाद निर्माण करणे चळवळीच्या आणि आदिवासींच्या समाजकारणाच्या दृष्टीने चांगले

नाही. अर्थात, परिषदेला राजकारणात पडायचेच असेल तर तो सोयीचा ठरेल. स्वायत्त आदिवासी राज्याची भूमिका यापूर्वी सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाचे संस्थापक शरद पाटील यांनी मांडली आहे. गुजरातेतही काही ठिकाणी या भूमिकेचा उच्चार झाला आहे. देशाच्या या विभागात आदिवासींची जी वस्ती आहे, ती राज्यांच्या सीमावर्ती भागातच आहे. त्याच आधारावर पाटील यांनी एक नकाशाही यापूर्वी प्रसिद्ध केला आहे. त्यानंतर त्या मागणीचा पुढे फारसा विचार झालेला नाही. पण शिबिरात माजी मंत्री रमेश वळवी, राजस्थानातून आलेले बेलाराम गोगरा यांनी ही कल्पना हिरीरीने मांडली. या मागणीचे मूळ आज केंद्रातील सरकारकडे नियंत्रण असलेल्या वनकायद्यामुळे निर्माण झालेले आदिवासींचे अनेक प्रश्न सोडविण्यासाठी करावयाच्या कृतीत आहे, हे त्यांच्या भाषणातूनही स्पष्ट झाले. केंद्रातील सरकारकडून या प्रश्नाकडे धोरणात्मक निर्णयाची एक गरज या दृष्टीने पाहिले जाण्यासाठी यापेक्षा अन्य कृती योग्य ठरू शकते. कारण स्वायत्त आदिवासी राज्यही हे प्रश्न सोडविण्यासाठी केंद्राकडेच जाणार. तेव्हा त्यापेक्षा संघटितपणे हे प्रश्न सोडविणे श्रेयस्कर ठरेल. स्वायत्त राज्यांच्या मागणीवरून सुरू झालेल्या चळवळींचा वाईट इतिहास भारतात आहे. त्या दृष्टीने याचा विचार होणे गरजेचे आहे. या शिबिरात एकूण सतरा ठराव करण्यात आले. शिक्षण आणि जमीन याविषयीचे ठराव महत्त्वपूर्ण आहेत. प्रारंभापासून बोली भाषेत जीवनाचे ज्ञान घेणाऱ्या आदिवासीसाठी शिक्षणाचे माध्यम मात्र प्रगत समाजाच्या भाषेतच आहे. त्यामुळे पहिली ते पाचवी या वर्गासाठी बोली भाषेत शिक्षण असावे, अशी मागणी करण्यात आली. अभ्यासक्रमात आदिवासींना स्थान असावे, ही दुसरी मागणी आणि त्याचबरोबर एकूण अभ्यासक्रम मानवीय संबंधांची माहिती देणाराच असावा, ही मागणीही विचार करावा अशीच आहे. जमिनीच्या प्रश्नांवरच्या मूलभूत मुद्याला हात घालणारे असले तरी शासकीय यंत्रणेत त्याच्या अंमलबजावणीचे स्वरूप कसे होईल, याची आजच खात्री देता येणार नाही. शिबिराचे एक प्रमुख संयोजक पद्माकर वळवी यांनी त्यांच्या भाषणात या प्रश्नाचे मूळ कारण मांडले आहे. त्यावर परिषदेने सखोल अभ्यास करून शासनापुढे मांडणी केली पाहिजे. खुद्द शासकीय यंत्रणेत वरिष्ठ पदावर काम करणाऱ्या आदिवासींना हे कारण माहीत आहेच, असे नाही. त्यामुळे त्याची एकदा विगतवार मांडणी करणे, आदिवासींसाठी आजही कायद्यात नेमकी भूमिका नाही, हा मुद्दा प्रकाशात आणणे आवश्यक आहे. ग्रामसमित्यांची स्थापना हा कृती कार्यक्रम कसा राबविला जातो यावर हे सारे अवलंबून आहे.

*(पेज नं. ३१ वरून पुढे चालू)*

अशिक्षित स्त्रिया एकत्र जमून त्यांच्या एकमेकांच्या सुख दुःखात सहभागी होतील पण एकाच शहरात राहणाऱ्या या आदिवासी महिलांना एकमेकींचा परिचय करून घेण्याची आवश्यकता वाटत नाही असे का? ह्या प्रश्नावर या नोकरी करणाऱ्या महिलांनी चिंतन करणे आजच्या परिस्थितीत आवश्यक वाटते. समाजकार्यापासून या महिला अलिप्त राहू शकतील का? यांच्यामध्ये एवढी उदासीनता का? या प्रश्नावर स्त्री-पुरुष दोघांनीही विचार करण्यासारखा आहे. की, अजूनही या आदिवासी सुशिक्षित महिला 'उमलत्या मूककळ्या' च आहेत त्या स्वकर्तृत्वाने, स्वयंनिर्णयाने कधीच उमलणार नाहीत का? त्या स्त्री-पुरुषांच्या समोर धैर्याने कधीच बोलणार नाही का? या प्रश्नावर सुशिक्षित महिलांनी सद्सद्विवेक बुद्धीने चिंतन करावे. आदिवासी स्त्री-पुरुष एकत्र या व्यासपीठावर आलेत तर खरोखर या आदिवासी एकता परिषदेचे कार्य जोमाने सुरू होईल.



15393 6A

# आदिवासींची चळवळ - समाजपरिवर्तनाची चळवळ

**वाहरू सोनवणे**

आदिवासी एकता परिषदेच्या चार राज्यातील कार्यकर्त्यांचे शिबिर १५ व १६ जानेवारी ९४ ला मेवास अंकुश विहीर (ता. अक्कलकुवा, जि. धुळे) येथे झाले. त्यात विविध विषयांवर सांगोपांग चर्चा झाली, त्याचा आढावा श्रावण मोडक यांनी 'निसर्गपुत्राची स्वायत्त राज्याकडे ओढ' या लेखात घेतलेला आहे. आढावा घेताना शिबिराची यथोचित मांडणी केली आहे. चर्चिलेल्या महत्त्वपूर्ण प्रश्नांची नोंद घेतलेली आहे. ही नोंद घेता घेता मोडक यांनी आपल्या प्रतिक्रिया व्यक्त करताना नुसत्या सूचना केल्या नाहीत, तर शिबिरात व्यक्त झालेल्या मतावरही स्वतःचे मत नोंदविले आहे. मताची नोंदणी करीत असताना मोडक यांनी आदिवासी एकता परिषदेपुढे काही मुलभूत प्रश्न उभे केले आहेत. उभे केलेले प्रश्न आदिवासी चळवळीच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे आहेत. आदिवासी एकता परिषद या प्रश्नांचा निश्चित विचार करील; पण मोडक यांनी मांडलेल्या मुद्द्यांतून काही गैरसमज असल्याचे जाणवते. त्याबाबत स्पष्टीकरण होण्याची गरज जाणवते.

'ठळक अनुपस्थिती' या चौकटीत, चौकट पूर्ण करता करता मोडक म्हणतात, '... पण बिगर... आदिवासींना बोलण्याची संधी नव्हती, असे दिसले,' ... दिसले ते खरे आहे. या खऱ्या दिसण्यामागचा हेतू व दृष्टिकोन काय होता व काय आहे, हे समजून घेतले पाहिजे. येथे बिगर आदिवासींचा द्वेष करण्याचा मुळीच हेतू नाही. द्वेष करणे मुळात आदिवासी संस्कृतीत नाही.

याबाबतचा दृष्टिकोन आणि हेतू समजून घेण्यासाठी, थोडे मागे जावे लागेल. १८ ऑक्टोबर ९२ ला 'आदिवासी विकास भवन' नाशिक येथे आदिवासी कार्यकर्त्यांची राज्यव्यापी बैठक झाली होती. या बैठकीतच 'आदिवासी एकता परिषदे'ची स्थापना करण्यात आली. या बैठकीतही फक्त आदिवासी कार्यकर्त्यांना बोलविण्यात आले होते. त्यात 'पिढ्यान् पिढ्या दबलेला हा समाज कुठे तरी विनासंकोच बोलावा, त्यात आपले विचार, आपल्या व्यासपीठावरून मुक्तपणे मांडावेत. या मुक्तपणातून आदिवासी कार्यकर्त्यांना निर्भयतेची शक्ती मिळावी, असा हेतू होता.

आदिवासी समाजाला, कार्यकर्त्याला, कर्मचाऱ्यांना अधिकाऱ्यांना प्रस्थापित समाज, शासन आणि धर्मव्यवस्थेने दुय्यमच लेखले आहे. या दुय्यमतेच्या व्यवहारातून आदिवासी दबलेला आहे, दुखावलेला आहे आणि अशा परिस्थितीत त्यांच्या वर्चस्ववादी मांडणीच्या पुढे मनमोकळेपणे आदिवासी आपले विचार मांडेलच, असे नाही. म्हणून आदिवासी कार्यकर्त्यांना मुक्तपणे बोलण्याची एक संधी मिळावी आणि या संधीतून त्यांचा दबलेला आवाज बाहेर पडावा, अशी कल्पना होती. या वर्चस्ववादी मूल्यांच्या विरुद्ध आवाज उठवणे म्हणजे बिगर आदिवासींच्या विरुद्ध आवाज उठवणे आणि त्यांचा द्वेष करणे, असे नव्हे. बिगर आदिवासींना शिबिरात बोलण्याची संधी न मिळण्याचे कारण या अर्थाने समजून घेतले पाहिजे.

आदिवासी चळवळीला जरूर योग्य त्या सूचना कराव्यात, सल्ला द्या, मते मांडावीत; पण या



15993 68

सूचना, सल्ला, मताप्रमाणेच आदिवासी चळवळ चालली पाहिजे, अशी पूर्व अट असता कामा नये.

आदिवासींच्या समस्यांबाबत, आदिवासी संस्कृतीबाबत बिगर आदिवासींना अधिक अनुभव आहे आणि मोठा अभ्यास आहे, असे म्हणतात, ते कबूलही आहे. पिढ्यान् पिढ्या ज्ञानपीठावर ज्यांचा कब्जा आहे, लेखनी आणि ग्रंथावर ज्यांचे वर्चस्व आहे आणि यांनाच सर्व संधी मिळत गेली असेल तर तो काय मागे राहणार? अर्थात त्यांचा अभ्यास दांडगा असणारच! म्हणून आदिवासींनी आता आयुष्यभर त्यांचेच ऐकत बसावे का? आदिवासींनी अभ्यासच करू नये का? बोलूच नये का? आता कुठंतरी आदिवासी बोलायला लागला, तर त्याला बोलू दिले पाहिजे. आतापर्यंत तुमचे ऐकले ना? आता आदिवासींचेही ऐकून बघा, पटले तर घ्या; पटत नसेल तर सोडून द्या. पण ऐका तर खरे...!

आढावा घेताना मोडक एका ठिकाणी असेही म्हणतात. '... शिबिराच्या प्रास्ताविकातच वाहरू सोनवणे यांनी आदिवासींच्या समस्यांचा ऊहापोह करताना त्याला माणूस म्हणून वागणूक मिळत नसल्याची तक्रार केली. मात्र त्यांच्या या आक्रमक भाषणात बिगर आदिवासी कार्यकर्त्यांना नाकारण्याचा 'सूर' होता...' बिगर आदिवासी कार्यकर्त्यांना नाकारण्याचा 'सूर' होता.... हा 'सूर' मोडक यांना कोणत्या शब्दाच्या अर्थामध्ये सापडला, हे समजले नाही. आदिवासीत काही दोष आहेत, ते आम्ही दूर करू... पण आदिवासी समाजात फक्त दोषच आहेत, असे सांगून आदिवासींना हिणवणे, दुय्यम लेखणे बरोबर नाही. आदिवासी समाज जीवनातील मानवता दाखविण्यासाठी आदिवासी संस्कृती आणि तथाकथित सभ्य संस्कृती यांच्यात तुलनात्मक दृष्टीने मानवता अधिक कुठं आहे. हे दाखविण्यासाठी तुलना करताना तथाकथित सभ्य संस्कृतीच्या त्रुटी उघड्या पडत असतील, तिथे बिगर आदिवासी विरुद्ध सूर होता, असे समजण्याचे कारण नाही. उदा. आदिवासीत हुंडा नाही. सासू-सासऱ्याच्या किंवा नवऱ्याच्या छळाला कंटाळून आदिवासी स्त्रिया आत्महत्या करीत नाहीत. आदिवासी जीवन... परंपरेत आत्महत्येची रीतच नाही. पण तथाकथित सुसंस्कृत समाजात हुंड्याच्या नावाने स्त्रीला जिवंत जाळले जाते.

आदिवासी संस्कृती माणसांवर माणूस म्हणून विश्वास ठेवते आणि तथाकथित सभ्य संस्कृती कागदावर विश्वास ठेवते. तेव्हा माणसावर माणूस म्हणून विश्वास ठेवणारी संस्कृती चांगली, की कागदावर विश्वास ठेवणारी संस्कृती चांगली? अशा तऱ्हेने तथाकथित सभ्य संस्कृतीमधील विषमतावादी मूल्यांच्या विरुद्ध बोलणे म्हणजे बिगर आदिवासी कार्यकर्त्यांच्या विरुद्ध 'सूर' काढणे असा नव्हे.

एका ठिकाणी परत मोडक म्हणतात, ... शिबिराचे एक प्रमुख संयोजक वाहरू सोनवणे यांनी त्यांच्या प्रास्ताविक आणि समारोपात आदिवासी चळवळीतील निर्णयशक्ती आदिवासींच्या हातातच असावी, अशी भूमिका मांडली आहे. या भूमिकेमुळेच बिगर आदिवासी कार्यकर्ते या चळवळीतून हद्दपार होण्याचा धोका आहे. तो खुद्द आदिवासी चळवळीला किती परवडणारा आहे, याचा विचार होणे आवश्यक आहे. इथं एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी, की आदिवासी चळवळीतील निर्णय शक्ती आदिवासींच्या हातातच असावी, 'ही भूमिका आम्ही मांडतो, हे खरे आहे. ही भूमिका जेव्हा आम्ही मांडतो तेव्हा ही भूमिका फक्त आदिवासींसाठीच असावी, असे आम्ही मानीत नाही, तर राजकीय, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिकदृष्ट्या जो जो समाज घटक दबलेला आहे, त्यांना त्यांना तो अधिकार हवा. उदा. - दलितांच्या प्रश्नांच्या बाबतीत दलितांनीच निर्णय

घ्यायला हवा; त्यात हस्तक्षेप करता कामा नये. स्त्रियांच्या प्रश्नांच्या बाबतीत स्त्रियांनीच निर्णय घ्यायला पाहिजे, तिथं कोणताही पुरुष हस्तक्षेप करता कामा नये. शेतमजुरांच्या प्रश्नाच्या बाबतीत शेतमजुरांनीच निर्णय घ्यायला पाहिजे. दुसरा हस्तक्षेप करता कामा नये. ते ते घटक याबाबत कदाचित चुकतीलही; पण आपल्या प्रश्नांबाबत आपणच विचार करतील. आपले प्रश्न आपणच सोडवतील. दुसऱ्यांवर अवलंबून राहणार नाहीत.'

ज्यावेळी आदिवासींवर संकट ओढावले, संरक्षण आणि विकासासाठी आदिवासींना आधाराची गरज होती तेव्हा जीवाची बाजी लावून बिगर आदिवासी कार्यकर्त्यांनी आदिवासींना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला. (हे केव्हा, बिगर आदिवासी कार्यकर्त्यांचे नेतृत्व मान्य केले तेव्हा!) त्यांच्या त्या प्रामाणिकपणाचा, त्यांच्या त्या धडपडीची आम्ही कदर करतो. त्यांनी केलेल्या कामाची जाणीव ठेवूनसुद्धा आम्हाला असे वाटते, की त्या काळात त्या परिस्थितीत आदिवासींना संरक्षणाची आणि आधाराची गरज होती, तोपर्यंत ठीक; पण त्या कामाच्या पुण्याईवर जर पुढे कोणी आदिवासींवर आपला अधिकार सांगत असतील तर ते बरोबर होणार नाही. कोणत्याही कार्यकर्त्याचा हेतू, गुलामाला गुलामगिरीतून मुक्त करण्याचा असावा. एक इंग्रजी म्हण आहे. 'कोणताही मनुष्य स्वतःच्या सन्मानाची किंमत देऊन उपकृत बनू शकत नाही. कोणतेही राष्ट्र आपल्या सार्वभौमत्वाची किंमत देऊन उपकृत राहू शकत नाही. कोणतीही स्त्री शिलाची किंमत देऊन उपकृत राहू शकत नाही.'

श्रावण मोडक एका ठिकाणी असेही म्हणतात, की आजही सत्तास्थानात ठिकठिकाणी आदिवासी आहेतच, त्यामुळे या परिषदेची मग गरज आहे का, असा प्रश्न आदिवासी एकता परिषदेपुढे उभा केलेला आहे. आजही सत्तास्थानात आदिवासी समाजाचा प्रतिनिधी कोणीही नाही. आज जे जे सत्तास्थानात दिसतात ते ते आदिवासी समाजाचे प्रतिनिधी म्हणून नसून 'ते' त्या त्या पक्षाचे प्रतिनिधी असतात, हे इथं लक्षात घ्यायला हवे, म्हणजे गोंधळ होण्याचे कारण उरणार नाही. ते आदिवासीच असले तरी त्या त्या पक्षामार्फत त्या त्या सत्तास्थानात गेलेले असतात. म्हणून त्यांची बांधिलकी त्या पक्षाच्या धोरणाला असते न की समाजाच्या धोरणाला. 'एकूणच आदिवासी - बिगर आदिवासी वाद निर्माण करणे चळवळीच्या आणि आदिवासी समाजकारणाच्या दृष्टीने चांगले नाही...'

चांगले नाही, हे आम्हालाही पटते. हा वाद आदिवासी - बिगर आदिवासी असा नसून मूल्यांचा दृष्टिकोनाचा आणि नेतृत्वाचा प्रश्न आहे. आदिवासी हमखास चुकतील, अशी ज्यांची ठाम भूमिका आहे, ज्यांना आदिवासी नेतृत्व मान्यच नाही, तेच असे म्हणण्याचे धाडस करू शकतील, की चळवळीत बिगर आदिवासींना स्थान नसेल तर हद्दपार होतील,' कोणीही फक्त स्थानासाठीच आदिवासीत काम करीत नाही, तर आदिवासीत काम करणे त्यांची भूमिका असते, त्यांना ते काम पटलेले असते.

समाजपरिवर्तनाची ही एक चळवळ आहे; फक्त मलमपट्टीवर समाधान मानून घ्यायची चळवळ नाही. आदिवासी मुक्ती, मानवमुक्तीच्या दिशेने गतिमान होऊन मूलभूत बदल घडविणारी ही चळवळ आहे, असे आम्ही मानतो. ज्या चळवळीत विषमतावादी वर्चस्ववादी मूल्यांना स्थान नसणार. जिथे सुख आणि समृद्धी असेल, मानवी प्रतिष्ठा असेल, प्रेम असेल, एक विश्वास असेल, अशा विश्वासपूर्ण जीवनाकडे चळवळीची वाटचाल असेल.

# आदिवासी एकता परिषदेची स्थापना कशासाठी?

**कालिदास कोकणी**

आदिवासी एकता परिषदेची स्थापना का झाली? या संदर्भात अनेक पुरोगामी, सामाजिक चळवळीतील कार्यकर्त्यांच्या प्रतिक्रिया ऐकायला मिळाल्या आहेत. परंतु या आदिवासींना 'आदिवासी एकता परिषदेची गरज का भासावी?' याचे उत्तर आदिवासी कार्यकर्त्यांमध्ये पुरोगामी कार्यकर्त्यांनी शोधण्याचा प्रयत्न केला. परंतु आपण कसे आहोत? आपलेही काही चुकले का? असे त्यांना कधीच वाटत नाही. याच्यावर प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हणतात की, आदिवासी एकता परिषदेच्या निमंत्रकांना मोठे व्हायचे आहे आणि त्यांनी मोठे का होऊ नये या संदर्भात गप्प असतात. आता आदिवासी त्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी समर्थ झाला आहेत. त्याला त्यांची जाणीव झाली. या आदिवासी एकता परिषदेचे प्रतिनिधी बहुतेक करून कोणत्या ना कोणत्या पुरोगामी चळवळीशी संबंधित होते आणि आहेत. त्यांना स्वतःला देशमुखी, ब्राह्मणी, उच्चपदी पुरोगामी समजणारे नेते, या आदिवासी कार्यकर्त्यांना कधीच आत्मसन्मानाची वागणूक दिली नाही. याचा विचार त्यांनी करावा! आदिवासी एकता परिषदेची भूमिका कशी असावी यासाठी एक वर्षापासून आदिवासी एकता परिषदेचे प्रतिनिधी, कार्यकर्ते विचार करीत आहेत. यासंदर्भात अनेक वैचारिक शिबिरे त्यांनी आयोजित केली आहेत. ठाणे, नाशिक, औरंगाबाद, शहादा येथील शिबिरे पार पडली आहेत. आदिवासी एकता परिषदेची भूमिका ठरण्याचा शेवटचा टप्पा आला आहे. यासाठी मुंबईत १५ व १६ सप्टेंबर रोजी एस. एम. जोशी प्रतिष्ठानतर्फे विचारवंतांचे आणि साहित्यिकांचे विचारमंथन होणार आहे. २ ऑक्टोबरला मुंबईत पुरोगामी चळवळीतील बिगर आदिवासी कार्यकर्त्यांची बैठक होईल आणि ९ व १० ऑक्टोबर रोजी हमाल मापाडी भवन पुणे येथे पुरोगामी चळवळीतील आदिवासी आणि बिगर-आदिवासींची बैठक आदिवासी एकता परिषदेने बोलाविली आहे. या बैठकीत आदिवासी एकता परिषदेची भूमिका निश्चित होणार आहे.

आदिवासी एकता परिषदेचे निमंत्रक आणि प्रतिनिधींची थोडक्यात मांडणीतून असे सिद्ध होते की, ही चळवळ आदिवासींच्या आत्मसन्मानाची, अस्मितेची, संस्कृतीची, स्त्री-पुरुष विषमतेची, समाजव्यवस्थेची आणि आर्थिक, धर्मांधतेच्या विरोधात ही एकता परिषद उभी राहण्याचा प्रयत्न करीत आहे. परंतु कोणाच्या समन्वयाने आणि सहकार्याने असे प्रश्न लढवावेत. काही जाती- जमातीचे प्रश्न सारखे आहेत. ज्यांना खरोखरच या समाज व्यवस्थेमध्ये यातना सहन कराव्या लागल्या आहेत आणि अजूनही दरी-खोरीतच आपले जीवन खितपत पडले आहेत. त्यांचा विकास वर्षानुवर्ष का होऊ शकला नाही. त्यांच्यावर अत्याचार, शोषण, आर्थिक पिळवणूक करणारा वर्ग कोणता? हे प्रश्न अजूनही जसेच्या तसेच आहेत. फक्त 'अरे-रे-रे बिचारे आदिवासी!' त्यांच्यापुढे आदर्शवाद ठेवून दुःखाबद्दल सांत्वन करण्याचा प्रयत्न होतो. तो शैक्षणिकदृष्ट्या, आर्थिकदृष्ट्या, सामाजिकदृष्ट्या मागे आहे. सर्वात जास्त त्यांचीच पिळवणूक होते. संघटीत नाही. त्यांची हाक शासनापर्यंत ऐकू येत नाही. जो

आदिवासी समाज संघटित झाला तो पुरोगामी तथाकथित बुद्धीजीवी, काँग्रेस सत्ताधाऱ्यांच्या आणि जातीयवादी शक्तींच्या कचाट्यात सापडला. याचा उपयोग त्यांनी राजकारणासाठी केला आणि पुरोगाम्यांनी स्वतःची प्रतिष्ठा जोपासण्यासाठी केला. त्यांना आत्मसन्मानाने कधीच वागवले नाही. त्यामुळे आज आदिवासी समाज आदिवासी एकता परिषदेच्या नावाने उभा राहण्याचा प्रयत्न करीत आहे. या आदिवासी एकता परिषदेच्या निमंत्रकांनी पुरोगामी चळवळीत हयात घातली आहे. परंतु ते कधीच या पुरोगामी चळवळीचे नेते होऊ शकलेले नाहीत. फक्त वरून आदेश पाळण्याच्या संपात सामील होण्याचा, मोर्च्यात सहभागी होण्याचा प्रामाणिकपणा त्यांनी पार पाडला. त्यांच्या नंतरचा येणारा शाहू कार्यकर्ता त्यांचा नेता होतो आणि आदिवासी त्या चळवळीचा पदाधिकारी असला तरी आदिवासी पदाधिकाऱ्याने घेतलेला निर्णय तो मान्य करायला तयार नसतो. आपल्या बौद्धीक क्षमतेच्या आधारावर आदिवासी कार्यकर्त्यांवर दबाव आणणे, स्वतःचे आत्मगौरवीकरण करणे आणि दुसऱ्याची प्रतारणा करणे. एखादा कार्यकर्ता आपल्या गटाव्यतिरिक्त किंवा मर्जीव्यतिरिक्त असेल तर त्या कार्यकर्त्याबाबत हिणकस विधान करणे, पक्ष किंवा संघटना आपल्यामुळे चालते. "बैलगाडी खाली कुत्रा चालतो, त्याला वाटते आपणच बैलगाडी ओढतो की काय? असेही कार्यकर्ते असतात. आदिवासी कार्यकर्ता एखादा धोरणात्मक प्रश्न पोटतिडकीने सोडण्याचा प्रयत्न करीत असेल तर त्याच्याकडे दुर्लक्ष करणे, धोरणात्मक प्रश्न आणि धोरणात्मक निर्णय मीच घेऊ शकतो; असे सर्वसामान्य लोकांना भासवतो. प्रतिष्ठेचा प्रश्न तो स्वतःच बनतो. या आदिवासी कार्यकर्त्यांना काय कळते. काही अनुभव मी स्वतःच अनुभवले आहेत. एखादा कार्यकर्ता आपले नेतृत्व मान्य करीत नसेल तर त्याला हिणकस वागणूक देऊन त्याची बदनामी कशी करता येईल, याचे पूर्वनियोजित कट रचणे, त्याला पक्षातून नामोहरम करणे, एखाद्या आदिवासी कार्यकर्त्याला धरून आदिवासी कार्यकर्त्यांच्या विरोधी कसा उभा राहील याची व्यवस्था पक्षांतर्गत करणे आणि स्वतः सहीसलामत राहण्याचे दाखवणे. डाव्या चळवळीची भूमिका जरी व्यापक असली तरी सर्वसामान्य आदिवासी कार्यकर्त्यांमध्ये रुजण्यासाठी एक शतक तरी लागेल.

आदिवासी एकता परिषदेचे शिबीर मी देखील केलेत. पुरोगामी चळवळीत काम करणाऱ्या आदिवासी कार्यकर्त्यांच्या प्रतिक्रिया ऐकल्यात त्या अशा की, आदिवासीचे आर्थिक शोषण, अत्याचार यासाठी संघर्ष केला जातो. हल्लीच्या काळात भाजपसारखा जातीयवादी पक्ष देखील या आदिवासींच्या प्रश्नांसाठी रस्त्यावर येत आहे. पुरोगामी चळवळीत आदिवासी कार्यकर्त्याला आत्मसन्मानाने वागवले जात नाही. भाजपसारख्या जातीयवादी पक्षाची तर दुटप्पी भूमिका आहे. असा सर्व आदिवासी कार्यकर्त्यांचा सूर होता. आदिवासी आत्मसन्मानाचा प्रश्न, अस्मितेचा प्रश्न किंवा नेतृत्वाचा प्रश्न, व्यावहारिक किंवा तात्त्वीक असला तरी त्याची वैचारिक पातळीवर विचार करण्याची गरज आहे. आदिवासी समाज हा वेगळ्या पक्षामध्ये जनसंघटनामध्ये समाविष्ट झाला आहे. आदिवासी राखीव मतदार संघामधून भाजपसारख्या जातीयवादी पक्षाचे उमेदवार निवडून जातात. मध्य प्रदेशातील आदिवासी जिल्ह्यामधून आदिवासी आमदार, खासदार निवडून मध्य प्रदेशात सत्ता प्रस्थापित होते. भाजप आणि त्यांच्या जनसंघटना आदिवासी आणि दलित विरोधी आहेत. आदिवासींचे वनवासीकरण करून आदिवासींना निर्वासित बनवण्याचा प्रयत्न आहे. समाजव्यवस्था जशीच्या तशी ठेवून सत्ता काबीज

करण्याचा प्रयत्न आदिवासी समाजाने वेळीच ओळखला पाहिजे. परंतु आदिवासी सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या इतका मागे आहे की, जी जनसंघटना त्यांच्या शोषण आणि अत्याचाराच्या विरोधात संघर्ष करते. त्यांच्या बाजूने हा समाज उभा राहतो. याचा अर्थ आदिवासींचे राजकीयकरण झाले पाहिजे होते ते झाले नाही. म्हणून त्यात सामाजिकदृष्ट्या आंधळेपणा आला आहे. त्यासाठी प्रथम या आदिवासींचे राजकीयकरण झाल्याशिवाय ते सर्वसमावेशकांचे प्रतिनिधित्व करूच शकत नाही. म्हणून आदिवासी एकता परिषदेची गरज निमंत्रकांना वाटली. क्रांतीची भाषा आपण नंतर बोलू परंतु त्यांना एकसंघाने उभे राहू द्या. कॉ. वाहरू सोनवणे, कॉ. काळूराम दोधडे व कॉ. डोंगर बागूल यांचा पूर्णपणे डाव्या पक्षसंघटनांशी संबंध होता आणि आहे. डाव्या विचारांचा पगडा त्यांच्या डोक्यात आहे. हे निश्चित! 'ते' काय दलित-भटक्या विमुक्त समाजाला दोषी धरीत नाही तेही तथाकथित ब्राह्मणीकाठ्यातून सुटू शकले नाहीत.

दलित-आदिवासी, भटक्या-विमुक्त समाजापुढे आंबेडकरी चळवळीचा आदर्श आहे. कोणत्याही मागासवर्गीय चळवळींना फुले-आंबेडकरांचे आणि आदिवासीमधील स्त्रीसत्ताक परंपरेला आणि संस्कृतीला धरूनच आदिवासी एकता परिषद वाटचाल करेल. दलित जनता एकसंघ आहे. परंतु त्यांचे नेते एकसंघ नाहीत. आंबेडकरी चळवळीतील नेत्यांचे तीनतेरा का झाले? या संदर्भात जर विचार केला तर आंबेडकरी चळवळीवर टीका करणारी आणि बदनाम करणारी मंडळी पुरोगामी होती. कोणावर कम्युनिस्टांचे हस्तक म्हणून आरोप केला तर कोणाला काँग्रेसचा हस्तक! जी एकसंघाने दलित चळवळ उभी होती तिचे आज असंख्य गट या महाराष्ट्रात निर्माण झालेत. पुरोगामी चळवळीतील कार्यकर्ते स्वतःची ब्राह्मणी वृत्ती टाकू शकले नाहीत. डी-कास्ट होणे दूरच.

कम्युनिस्ट आणि पुरोगामी शक्ती ज्यावेळी उभी राहिली त्यावेळी एकमेव विरोधक शक्ती काँग्रेस राहिली. जातीयवादी शक्तींचे रोपटे आर. एस. एस. जनसंघाच्या नावाने वाढत राहिले. याच कम्युनिस्टांनी आणि पुरोगामींनी जातीयवादी शक्ती वाढवली, पुरोगामी आणि कम्युनिस्ट आता काँग्रेसच्या बाजूने उभे राहिले तर बहुजन समाज जातीयवादी शक्तीमध्ये समाविष्ट झाला. पुरोगामी आणि कम्युनिस्ट स्वतःच्या पक्षांतर्गत भांडत राहिले म्हणून जातीयवादी शक्तीच्या विरोधात उभे राहण्यास अपयश आले. या शक्तीपासून अलग पाडण्यासाठी आदिवासी एकता परिषदेची आवश्यकता आहे. ९ व १० ऑक्टोबर रोजी आदिवासी एकता परिषदेची भूमिका स्पष्ट झाल्यावर आदिवासी एकता परिषद जाहीरनामा प्रसिद्ध करेल व कृती कार्यक्रमाला सुरूवात करेल. नोव्हेंबरमध्ये आदिवासी क्रांतीवीर बिरसा मुंडा यांची जयंती साजरी झाल्यानंतर शहादा ते अलिबाग पर्यंत प्रबोधन सायकली रॅली निघेल. पुढील कृती कार्यक्रम हाती घेईल हीच अपेक्षा उपेक्षितांची आहे.

# साभार

या अंकात संकलित व पुनर्मुद्रित केलेले लेख हे खालील वृत्तपत्रातून साभार घेतले आहेत.

१) **'आदिवासी एकता परिषदेची स्थापना कशासाठी?'**

- 'दै. मुलुख मैदान' - १९ सप्टेंबर १९९३.

२) **'ओळख आदिवासींची' (भाग - १ ते ५)**

- 'दै. लोकमत' - दि. ११, १४, १५, १६, १७ जानेवारी १९९४.

३) **'आदिवासी आत्मसन्मानाची चळवळ'**

- 'दै. सकाळ, नाशिक' दि. १५ जाने. १९९४.

४) **'निसर्गपुत्रांची स्वायत्त राज्याकडे ओढ'**

- 'दै. सकाळ, नाशिक' दि. ३० जाने. १९९४.

५) **'आदिवासींची चळवळ - समाजपरिवर्तनाची चळवळ'**

- 'दै. सकाळ, नाशिक' दि. २ मार्च १९९४.

६) **'आदिवासींची चळवळ : अस्मिता अन् समस्या' (भाग १ ते ४)**

- 'दै. मुलुख मैदान' दि. २, ३, ४, ५ एप्रिल १९९४.

**- संपादक**

# सूची


अंक पहिला : जानेवारी-मार्च ........ १९८० - जबरन जोत जंगल जमीन
अंक दुसरा : एप्रिल-जून ........ १९८० - आदिवासी व शिक्षण
अंक तिसरा : जुलै-सप्टेंबर ........ १९८० - आदिवासी व वनसंवर्धन
अंक चौथा : ऑक्टोबर-डिसेंबर ........ १९८१ - आदिवासी साहित्य व कला
अंक पाचवा : जानेवारी-मार्च ........ १९८१ - दलितांना सवलती व राखीव जागा माहिती
अंक सहावा : एप्रिल-जून ........ १९८१ - आदिवासी व आरोग्य
अंक सातवा : ऑक्टोबर-डिसेंबर ........ १९८१ - रोजगार हमी योजना
अंक नववा : ऑक्टोबर-डिसेंबर ........ १९८१ - उत्तारा खंड अभ्यास मोहीम
अंक दहावा : एप्रिल-जून ........ १९८२ - धरणे व विकास
अंक अकरा-बारा : जुलै-डिसेंबर ........ १९८२ - जंगल व्यवस्थापन
अंक तेरावा : जानेवारी-मार्च ........ १९८३ - आदिवासी व दारू
अंक चौदावा : एप्रिल-जून ........ १९८३ - आदिवासींच्या सामाजिक / राजकीय चळवळी
अंक पंधरावा : जुलै-सप्टेंबर ........ १९८३ - प्रा.सरदार गौरव अंक/आदिवासी साहित्य
अंक सोळावा : ऑक्टोबर-डिसेंबर ........ १९८३ - आदिवासी साहित्य व सामाजिक प्रश्न
अंक सतरा-अठरा : जानेवारी-जून ........ १९८४ - आदिवासींमधील स्वयंसेवी कार्य
अंक एकोणिसावा : जुलै-सप्टेंबर ........ १९८४ - आदिवासी स्त्री
अंक विसावा : ऑक्टो.-डिसेंबर ........ १९८४ - आदिवासींचे आरोग्य व शिक्षण
अंक एकविसावा : जानेवारी-मार्च ........ १९८५ - आदिवासी संघटन
अंक बाविसावा : एप्रिल-जून ........ १९८५ - जमीन हस्तांतर
अंक तेविसावा : जुलै-सप्टेंबर ........ १९८५ - आदिवासी महिला
अंक चोविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर ........ १९८५ - आदिवासी व सरकार
अंक पंचविसावा : जानेवारी-मार्च ........ १९८६ - जंगल व धरण
अंक सव्विसावा : एप्रिल-जून ........ १९८६ - आदिवासी कला
अंक सत्ताविसावा : जुलै-सप्टेंबर ........ १९८६ - आदिवासी व वेठबिगारी
अंक अठ्ठाविसावा : ऑक्टोबर-डिसेंबर ........ १९८६ - आदिवासीविषयक ग्रंथ मानवशास्त्र परिचय
अंक एकोणतिसावा : जानेवारी-मार्च ........ १९८७ - भटक्याविमुक्त जमातींचे प्रश्न
अंक तिसावा : एप्रिल-जून ........ १९८७ - आदिवासी आणि सांस्कृतिक बदल
अंक एकतीस-बत्तीस : जुलै-डिसेंबर ........ १९८७ - राष्ट्रीय वननीतीचा प्रश्न
अंक तेहतीस : जानेवारी-मार्च ........ १९८८ - सवलती अपहरणाची समस्या
अंक चौतीस : एप्रिल-जून ........ १९८८ - आदिवासी साहित्य
अंक पस्तीस-छत्तीस : जुलै-डिसेंबर ........ १९८८ - आदिवासी समाज व संस्कृती
अंक सदतीस-अडतीस : जानेवारी-जून ........ १९८९ - डॉ. वेरीअर एलवीन विशेषांक
अंक एकोणचाळीस-चाळीस : जुलै-डिसेंबर ........ १९८९ - व्यवसाय मार्गदर्शन
अंक एकेचाळीस-बेचाळीस : जानेवारी-जून ........ १९९० - महाराष्ट्रातील आदिवासींची परिस्थिती
अंक त्रेचाळीस : जुलै-सप्टेंबर ........ १९९० - जागतिक आदिवासी
अंक चव्वेचाळीस : ऑक्टोबर-डिसेंबर ........ १९९० - गं.बा. सरदार स्मृति विशेषांक
अंक पंचेचाळीस-सेहचाळीस : जानेवारी-जून ........ १९९१ - आदिवासी साहित्य संमेलन विशेषांक
अंक सत्तेचाळीस : जुलै-सप्टेंबर ........ १९९१ - आदिवासींच्या विकासात्मक व सांस्कृतिक समस्या
अंक अठ्ठेचाळीस : ऑक्टोबर-डिसेंबर ........ १९९१ - आदिवासी जीवन व संस्कृती
अंक एकोणपन्नास-पन्नास : जानेवारी-जून ........ १९९२ - सर्वसाधारण आदिवासी
अंक एक्कावन-बावन : जुलै-डिसेंबर ........ १९९२ - अनुताई वाघ विशेषांक
अंक त्रेपन-चोपन्न : जानेवारी-जून ........ १९९३ - आदिवासी धर्म, सण व उत्सव
अंक पंचावन्न-छप्पन : जुलै-डिसेंबर ........ १९९३ - धरण-विस्थापन व पुनर्वसन
अंक सत्तावन्न : जाने-मार्च ........ १९९४ - सर्वसाधारण आदिवासी

Registered with the Registrar of News Papers of India Under No. 35835/80

## महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद

आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत संशोधन, चर्चा व प्रकाशन, कार्यकर्त्यांचे शिबिराद्वारे प्रशिक्षण. शासकीय, राजकीय व रचनात्मक कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांना एकत्र व्यासपीठावर आणून त्यांच्यात आदिवासी व दलितांच्या समस्यांबाबत आणि विकासाबाबत सुसंवाद घडवून आणणे.

मानव विज्ञान व सामाजिक शास्त्रे यांच्या शिक्षकांना व विचारवंताना, मुख्यत: आदिवासींबाबत अभ्यासकांना एकत्र आणणे.

मानव विज्ञानाच्या सर्व शाखांत अध्ययन, संशोधन, प्रकाशन.

या उद्देशाने 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' स्थापन करण्यात आली आहे. याच उद्देशाचे मूर्त स्वरूप म्हणून 'हाकारा' सुरू करण्यात आला आहे. परिषदेचे सदस्यत्व स्वीकारून आपणही या कार्यात सहभागी व्हावे. (संस्थांना फक्त 'हाकारा' चे वार्षिक सदस्यत्व मिळेल)

## मानव विज्ञान परिषदेचे सदस्यत्व

आजीव सभासद ५०० रुपये (फक्त व्यक्तींसाठी)

हाकारा वार्षिक सभासद ५० रुपये (व्यक्ती व संस्था दोन्ही)

परिषदेच्या सभासदांना 'हाकारा' विनामूल्य पाठविला जातो. आपले सदस्यत्व आणि वार्षिक वर्गणी कृपया खालील पत्त्यावर 'महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद' (दि महाराष्ट्र असोसिएशन ऑफ अॅन्थ्रॉपॉलाजिकल सायन्सेस) यांचे नावे डिमांड ड्राफ्ट अथ वा मनीऑर्डरने पाठवावी. मनीऑर्डर करताना फॉर्ममागे कृपया आपले पूर्ण नाव व पूर्ण पत्ता लिहिण्यास विसरू नये.

**पत्रव्यवहाराचा पत्ता :**

रा. के. मुटाटकर, सचिव
महाराष्ट्र मानव विज्ञान परिषद
६४, आनंद पार्क, औंध,
पुणे - ४११ ००७.

**आपल्या क्रियाशील सहकार्याची अपेक्षा आहे.**

हाकारा त्रैमासिकास महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ व भारतीय सामाजिकशास्त्र अनु-संध ान परिषद, पश्चिम विभागीय केंद्र यांचेकडून अर्थसहाय्य मिळाले आहे.

Omega Offset, Bgm. Ph:424124